वर्ष: 6 अंक: 21

1-15 मे, 2026 (विनामूल्य)

# न्यू इंडिया समाचार



## अर्धी लोकसंख्या, पूर्ण अधिकार

# आरक्षणावर सरकार ठाम

महिला शक्तीच्या हक्कांवर आकडेवारीने लावला ब्रेक, केंद्र सरकार 33% आरक्षणाच्या संकल्पावर ठाम... अर्ध्या लोकसंख्येच्या अधिकारांचा लढा आता निर्णायक वळणावर...

ई - प्रतीसाठी
QR स्कॅन करा

आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन | 15 मे


# कौटुंबिक मूल्यांचा विशेष सोहळा

*सक्षम राष्ट्राच्या निर्मितीमध्ये कुटुंब म्हणजे एक अत्यंत महत्वाची संस्था आहे. कुटुंब, व्यक्तींच्या विकासासोबतच समाजाच्या विकासातही योगदान देत असते. भारतात कुटुंब आणि नात्यांचा प्रचंड आदर केला जातो. आंतरराष्ट्रीय कुटुंब दिनानिमित्त हे सांगणे देखील गरजेचे आहे की, भारत जगाला कुटुंब मानतो. पंतप्रधान मोदी अनेक प्रसंगी बोलले आहेत - आमचा एकच मूळ मंत्र आहे - वसुधैव कुटुंबकम्...*

**आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन 2026 ची संकल्पना - कुटुंब, विषमता आणि बाल कल्याण, अशी आहे.**

15 मे रोजी साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन म्हणजे, जगभरातील कुटुंबे, लोक, समाज आणि संस्कृतींचे महत्व अधोरेखित करणारा सोहळा साजरा करण्याची संधीच आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या महासभेतील एका ठरावानंतर आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन साजरा केला जाऊ लागला. जगभरातील लोकांना कुटुंबाशी जोडून ठेवणे आणि कुटुंबाशी संबंधित मुद्द्यांवर समाजात जागरूकता निर्माण करणे हा यामागचा उद्देश आहे.



*140 कोटी देशवासीय हेच माझे कुटुंब आहे. आज देशातील करोडो मुली - माता - बहिणी हेच मोदींचे कुटुंब आहे. ज्यांचे कोणी नाही, ते देखील मोदींचे आहेत आणि मोदी त्यांचा आहे. माझा भारत - माझे कुटुंब, याच भावनेला व्यापक करत, मी स्वप्ने दृढनिश्चयाने साकार करण्यासाठी, तुमच्यासाठी जगत आहे, तुमच्यासाठी संघर्ष करत आहे आणि संघर्ष करत राहीन.*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## पंतप्रधान मोदी 140 कोटी देशवासियांना कुटुंब मानतात

- 15 ऑगस्ट, 2023 रोजी बंधु-भगिणींनो किंवा देशवासियांनो या ऐवजी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून 140 कोटी कुटुंबीय असे संबोधत, पंतप्रधान मोदी यांनी भाषण केले.
- पंतप्रधान मोदी यांनी मार्च, 2024 मध्ये 140 कोटी कुटुंबीयांच्या नावे पत्र लिहिले.
- सैनिकांना कुटुंब मानतात, दरवर्षी त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करण्यासाठी जातात.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जेव्हा एका कार्यक्रमात विचारले गेले - त्यांचे वारस म्हणून कोणी नाही, तर ते इतकी मेहनत कोणासाठी करत आहेत? त्यांनी सांगितले - माझ्या कुटुंबात 140 कोटी लोक आहेत, म्हणूनच मला जास्त मेहनत करावी लागते!

न्यू इंडिया
समाचार
वर्ष: 6, अंक: 21 । 1-15 मे, 2026

मुख्य संपादक
धीरेंद्र ओझा
प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
संतोष कुमार

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
पवन कुमार

सहाय्यक सल्लागार संपादक
अखिलेश कुमार
चंदन कुमार चौधरी

भाषा संपादन
सुमित कुमार (इंग्रजी)
रजनीश मिश्रा (इंग्रजी)
नदीम अहमद (उर्दू)

वरिष्ठ डिझायनर
फूलचंद तिवारी

डिझायनर
अभय गुप्ता
सत्यम सिंह



**13 भाषांमध्ये उपलब्ध असलेले न्यू इंडिया समाचार वाचण्यासाठी क्लिक करा.**

https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

**न्यू इंडिया समाचारचे जुने अंक वाचण्यासाठी क्लिक करा**

https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

न्यू इंडिया समाचारसंबंधीच्या सातत्यपूर्ण अपडेट्ससाठी फॉलो करा : @NISPIBIndia

# आतल्या पानांवर...




नवा भारत आणि
**महिला नेतृत्व**
मुखपृष्ठ कथा

केंद्र सरकारने लोकशाहीच्या पवित्र मंदिरात 16 ते 18 एप्रिल दरम्यान आयोजित विशेष अधिवेशनातून पुन्हा एकदा हा उद्घोष केला की, महिला शक्तीच्या नेतृत्वाखालील विकासाच्या वाटचालीवर सरकार ठाम आहे. नवा भारत आता त्या पहाटेच्या दिशेने वाटचाल करू लागला आहे, जिथे प्रत्येक महिला केवळ स्वप्ने पाहणार नाही, तर ती साकार करून देशाच्या भविष्याला आपले धैर्य, संकल्प आणि सर्जनशीलतेने उजळवून टाकेल... | 12-34

पंतप्रधानांचे देशाला उद्देशून संबोधन | 35-36

**महात्मा ज्योतिराव फुले**
**भारताचे दिव्य मार्गदर्शक**



थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या 200 व्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विशेष लेख... | 6-7

ऑपरेशन सिंदूरची एक वर्षपूर्ती

**आत्मनिर्भर संरक्षण यंत्रणेच्या नव्या युगाचा प्रारंभ**



ही केवळ एका लष्करी मोहिमेची नव्हे, तर भारताच्या निर्णायक सुरक्षा धोरणाची, सशस्त्र दलांच्या अदम्य शौर्याची वर्षपूर्ती आहे | 8-11

**वृत्त सारांश** | 4-5

**खरीप हंगाम 2026 साठी खतांवर अनुदान**
केंद्रीय मंत्रिमंडळाने जयपूर मेट्रोच्या विस्तारालाही दिली मंजुरी | 37-39

**कुटुंब सुरक्षित, भविष्य सुनिश्चित**
पीएमएसबीवाय, पीएमजेजेबीवाय, एपीवाय या प्रमुख योजनांची 11 वर्षे | 40-43

**प्रगती आणि निसर्गाचा कॉरिडॉर, दिल्ली-डेहराडून द्रुतगती मार्ग**
पंतप्रधान मोदी यांनी दिल्ली-डेहराडून आर्थिक कॉरिडॉरचे केले उद्घाटन | 44-45

**राज्यसभेत 110% आणि लोकसभेत 93% झाले कामकाज**
संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज अनिश्चित काळासाठी संस्थगित | 50-52

**तत्वज्ञान आणि तंत्रज्ञान दोन्हींच्या बाबतीत समृद्ध कर्नाटक**
पंतप्रधान मोदी यांनी केले श्री गुरु भैरवैक्य मंदिराचे उद्घाटन | 53

**व्यक्तिमत्व : मेजर होशियार सिंह**
ज्यांना घाबरून पळाले होते पाकिस्तानी सैन्य | 54

1 मे कामगार दिनानिमित्त विशेष

**भारतासाठी आता श्रमेव जयते**

आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त कामगारांच्या सक्षमीकरणासाठी होत असलेल्या प्रयत्नांवर सादर आहे एक विशेष अहवाल... | 46-49





**प्रकाशक: कंचन प्रसाद,** महासंचालक, सीबीसी (केंद्रीय संचार ब्यूरो), **पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता :** खोली क्र. - 1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली - 110003. **ईमेल- response-nis@pib.gov.in आर. एन. आय. नंबर DELHIN/2020/78812**

# संपादकाच्या लेखणीतून...

## महिला आरक्षण लागू करण्यासाठी सरकार वचनबद्ध

### आरक्षण प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने अविरत प्रयत्न सुरू

सप्रेम नमस्कार,

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥

*अर्थात जिथे स्त्रियांची पूजा केली जाते , तिथे देवतांचा वास असतो. जिथे असे घडत नाही, तिथे सर्व कार्ये निष्फळ ठरतात.*

भारतीय परंपरेत महिलांना शक्ती, सृजन आणि नेतृत्वाचा आधार मानले गेले आहे. आज याच विचाराने धोरणात्मक स्वरूप धारण केले असून, महिलांकडे केवळ लाभार्थी म्हणून नव्हे, तर विकासासाठीची आघाडीवरील शक्ती म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. मागील वर्षांमध्ये हे ठळकपणे दिसून आले की, जेव्हा संधी, संसाधने आणि निर्णयामध्ये भागीदारी मिळते, तेव्हा महिला शक्ती प्रत्येक क्षेत्रात नवनवी शिखरे गाठून दाखवते.

सैन्यापासून ते स्टार्टअपपर्यंत, क्रीडा क्षेत्रापासून ते विज्ञान आणि संशोधनापर्यंत, देशाच्या कन्या आपली प्रतिभा आणि परिश्रमाने नवे आयाम प्रस्थापित करत आहेत. हा बदल केवळ प्रतिकात्मक नाही, तर धोरणात्मक प्राधान्यक्रमांचा परिणाम आहे, ज्याअंतर्गत महिलांची भागीदारी आणि नेतृत्वाला केंद्रस्थानी ठेवले गेले आहे.

महिला आरक्षण वास्तवात आणण्याचे प्रयत्नही याच व्यापक विचारांचा भाग आहेत. संसदेत आवश्यक पाठबळ मिळालेले नसताही, सरकार महिलांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी वचनबद्ध आहे.

अमृत काळामध्ये विकसित भारताची संकल्पना तेव्हाच साकार होईल, जेव्हा महिला शक्तीच्या परिपूर्ण उत्कर्षाची सुनिश्चिती होईल. ही केवळ सरकारची जबाबदारी नसून, समाजातील प्रत्येक घटकाचे हे कर्तव्य आहे की, त्यांनी महिलांचा सन्मान, समान संधी आणि नेतृत्वाला पुढे न्यायला हवे. हाच सर्वसमावेशक विकासाचा मार्ग आहे आणि हाच राष्ट्राच्या वास्तवातील प्रगतीचा पाया आहे. याच अनुषंगाने, महिलांच्या नेतृत्वातील विकासाची 12 वर्षांची वाटचाल ही यावेळच्या अंकाची आपली मुखपृष्ठ कथा ठरली आहे.

याव्यतिरिक्त, व्यक्तिमत्व या श्रेणीमध्ये परमवीर चक्र विजेते मेजर होशियार सिंह, केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय, प्रमुख योजनांमध्ये पीएमएसबीवाय, पीएमजेजेबीवाय, एपीवाय योजनांची 11 वर्षे, 1 मे रोजीचा कामगार दिन आणि ऑपरेशन सिंदूरला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त विशेष लेखन, महात्मा ज्योतिराव फुले यांच्यावरील विशेष लेखासह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंधरवड्यातील कार्यक्रमांचा यात अंतर्भाव केला गेला आहे.

याचबरोबरीने, नियतकालिकाच्या आतील पानावर 15 मे रोजी साजरा होणार असलेल्या आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन आणि मलपृष्ठावर 7 मे रोजी साजरा होणार असलेल्या सीमा रस्ते संघटनेच्या स्थापना दिनानिमित्तच्या विशेष लेखनाचाही यात अंतर्भाव आहे.

आपल्या सूचना आम्हाला पाठवत राहा.

धीरेन्द्र

(धीरेंद्र ओझा)

हे नियतकालिक हिंदी, इंग्रजी आणि इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध आहे. इथे वाचा / डाउनलोड करा.
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

# तुमची मते...




## परमवीर चक्र विजेत्याच्या प्रेरणादायी कथेचा पडला प्रभाव

मी न्यू इंडिया समाचार या लोकप्रिय नियतकालिकाचा नियमित वाचक आहे. 1-15 मार्च, 2026 च्या बंगाली आवृत्तीमध्ये परमवीर चक्र विजेते रायफलमॅन संजय कुमार यांच्या शौर्याबद्दल प्रसिद्ध झालेल्या लेखाचा माझ्यावर मोठा प्रभाव पडला. त्या लेखाच्या संदर्भात, मी माझ्या आयुष्यातील एक अत्यंत अभिमानाचा आणि संस्मरणीय क्षण सामायिक करू इच्छितो. 8 डिसेंबर, 2000 रोजी जम्मू छावणीत, मला रायफलमॅन संजय कुमार यांना वैयक्तिकरित्या भेटण्याची विशेष संधी मिळाली होती. भारताच्या शूरवीरांच्या कथा सामायिक करून आम्हाला सतत प्रेरित करत आल्याबद्दल धन्यवाद.

**debu.mohorrier@gmail.com**

## भारताच्या विकासाची नेमकी माहिती

पूर्वी मला न्यू इंडिया समाचार नियतकालिक नियमित मिळत असे. या नियतकालिकाच्या माध्यमातून आम्हाला भारताच्या प्रगतीची नेमकी माहिती मिळते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात होत असलेल्या विकासाची माहिती मिळत आहे. हे देशवासियांचा उत्साह वाढवणारे आहे. यामुळे देशाचा सन्मान आणि प्रतिष्ठा वाढत आहे. नियतकालिकाच्या माध्यमातून आमच्यापर्यंत माहिती पोहोचवल्याबद्दल तुम्हाला आणि तुमच्या चमूला धन्यवाद.

**विजय मोहरीर**

**vastutejomay58@gmail.com**

## गुंतागुंतीच्या विषयांवरही सुलभ सोप्या भाषेतून माहिती

मी एक वाचक म्हणून न्यू इंडिया समाचारचा 01-15 मार्च 2026 चा अंक वाचल्यानंतरचा माझा अनुभव सामायिक करू इच्छितो. हा अंक अत्यंत माहितीपूर्ण, सुलभ सोपा आणि रंजक वाटला. या नियतकालिकात देशाची प्रगती, नवीन योजना आणि समकालीन विषय अतिशय सुलभ सोप्या भाषेत मांडले गेले आहे. पायाभूत सुविधांचा विकास, सायबर सुरक्षा, आरोग्य सेवा, 6G तंत्रज्ञान, रेल्वे आणि अंतराळ क्षेत्रात होत असलेल्या प्रगतीबद्दल वाचून देशाच्या प्रगतीचे स्पष्ट चित्र समोर येते. विशेषतः मला ही गोष्ट आवडली की, गुंतागुंतीचे विषयही सोप्या पद्धतीने समजावून सांगितले गेले आहेत, यामुळे सामान्य वाचकालाही ते सहजपणे समजून घेता येतात. यासोबतच, यात दिलेली माहिती अधिकृत आणि उपयुक्त आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे नियतकालिक खूप फायद्याचे आहे, कारण यात चालू घडामोडींची माहिती संक्षिप्त आणि सुस्पष्ट स्वरूपात मिळते. एक वाचक म्हणून मी सांगू शकतो की, हा अंक ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी आहे. भविष्यातही असेच उपयुक्त अंक प्रकाशित होत राहतील, हीच अपेक्षा आहे.

**अभिजीत यश भारती**

**abhijeetyashbharti@gmail.com**

## नेपाळी भाषेतही प्रकाशित व्हावे, उत्कृष्ट नियतकालिक...

न्यू इंडिया समाचार हिंदीसह 13 भारतीय भाषांमध्ये छापण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याचे जाणून आनंद झाला. या माध्यमातून वाचकांना देशात विविध क्षेत्रांमध्ये होत असलेल्या विकास आणि सरकारच्या लोककल्याणकारी योजना समजून घेण्याची संधी मिळते. माझी अशी नम्र विनंती आहे की, शक्य असल्यास नेपाळी भाषेतही हे नियतकालिक छापण्याची व्यवस्था करावी. आपण माझी विनंती नक्कीच विचारार्थ घ्याल आणि त्यावर योग्य निर्णय घ्याल हा विश्वास आहेच.

**बिर्ख खडका डुवर्सेली**

**birkhakd@gmail.com**

पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता : खोली क्रमांक - 1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली - 110003.

ईमेल- response-nis@pib.gov.in

# व्यावसायिक फास्ट ब्रीडर रिॲक्टर चालवणारा भारत... बनणार रशियानंतरचा जगातील दुसरा देश

भारताने आपल्या अणुऊर्जा कार्यक्रमाअंतर्गत एक महत्त्वाचे यश प्राप्त केले आहे. तामिळनाडूतील कल्पक्कम इथे स्वदेशी बनावटीच्या आणि विकसित केलेल्या प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिॲक्टरने (**PFBR**) यशस्वीरित्या आपली पहिली क्रिटीकेलिटी (स्व-धारित अणु साखळी अभिक्रियेची स्थिती) गाठली आहे. या यशामुळे, भारताने अधिकृतपणे आपल्या त्रीस्तरीय अणुऊर्जा कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात प्रवेश केला आहे. ही संकल्पना सर्वात आधी भारताच्या अणु कार्यक्रमाचे शिल्पकार डॉ. होमी जहांगीर भाभा यांनी मांडली होती. आता हा टप्पा पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर भारत, रशियानंतर व्यावसायिक फास्ट ब्रीडर रिॲक्टर चालवणारा जगातील दुसरा देश ठरणार आहे. **PFBR** च्या माध्यमातून युरेनियम संसाधने अधिक चांगल्या रितीने उपयोगात आणणे शक्य होईल. थोरियमचे देशातील विपुल साठे वापरात आणण्याचा मार्गही यामुळे प्रशस्त होईल. कमी इंधनात जास्त ऊर्जा देण्याची या 500 मेगावॅटच्या रिॲक्टरची क्षमता आहे.



## पवन ऊर्जा क्षेत्रात आतापर्यंतची सर्वाधिक वार्षिक वाढ

पवन ऊर्जा क्षेत्रात भारताने 2025-26 या आर्थिक वर्षात आतापर्यंतची सर्वोच्च वाढ नोंदवली आहे. एका वर्षाच्या काळात देशात 6.05 गिगावॅट नवीन पवन ऊर्जा क्षमता जोडली गेली आहे. 2024-25 या मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत यावेळी पवन ऊर्जेच्या क्षमतेत सुमारे 46% वाढ झाली आहे. यापूर्वी 2016-17 मध्ये 5.5 गिगावॅट क्षमतेचा विक्रम प्रस्थापित झाला होता. या नवीन यशासोबतच आता



भारताची एकूण स्थापित पवन ऊर्जा क्षमता 56 गिगावॅटपेक्षा जास्त झाली आहे. गुजरात, कर्नाटक आणि महाराष्ट्राने पवन ऊर्जेच्या उत्पादन आणि नवीन क्षमता जोडण्यात आघाडी घेतली आहे. भारताने 2030 पर्यंत 500 गिगावॅट बिगर जीवाश्म इंधन क्षमतेचे समोर ठेवलेले उद्दिष्ट साध्य करण्यात हे यश मोठी भूमिका बजावणार आहे. भारताने आपल्या धोरणांमुळे आज जगातील प्रमुख पवन ऊर्जा बाजारपेठांमध्ये स्थान मिळवले आहे. तर दुसरीकडे नवीकरणीय ऊर्जा सांख्यिकी 2026 नुसार, नवीकरणीय ऊर्जा स्थापित क्षमतेच्या बाबतीत भारत, ब्राझीलला मागे टाकून जगात तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. भारताने 2025-26 या आर्थिक वर्षा दरम्यान बिगर जीवाश्म ऊर्जा क्षमतेत एकूण 55.3 गिगावॅटची वाढ केली आहे. 31 मार्च 2026 पर्यंत देशात बिगर जीवाश्म इंधन स्रोतांच्या माध्यमातून एकूण 283.46 गिगावॅट इतकी क्षमता स्थापित केली गेली आहे.

## युद्धनौका 'आयएनएस तारागिरी' भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल

एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात प्रोजेक्ट 17-**A** श्रेणीतील चौथी शक्तिशाली युद्धनौका, आयएनएस तारागिरी आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम इथे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल केली गेली. ही युद्धनौका आधुनिक नौदलीय जहाज बांधणीचा उत्कृष्ट नमुना आहे, या युद्धनौकेचे रेखांकन युद्धनौका डिझाइन ब्युरोद्वारे केले गेले आहे. 75% पेक्षा जास्त स्वदेशी साधन सामग्रीच्या वापरातून बनवलेली तारागिरी, भारताची जहाज बांधणी क्षमता आणि भक्कम सार्वजनिक खाजगी क्षेत्राच्या भागीदारीचे उत्कृष्ट उदाहरण ठरले आहे. शत्रूच्या हालचालींवर लक्ष ठेवणे तसेच, आपली सुरक्षा सुनिश्चित करणे आणि गरज पडल्यास त्वरित प्रत्युत्तर देण्यासाठी डिझाइन केलेल्या यंत्रणांनी ही युद्धनौका सुसज्ज आहे. या युद्धनौकेवर अत्याधुनिक रडार, सोनार आणि ब्रह्मोस तसेच जमिनीवरून हवेत मारा करू शकणारी क्षेपणास्त्रे आहेत, यामुळे या युद्धनौकेची कार्यान्वय क्षमेत मोठी भर पडली आहे.



## गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेसवर 18 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल

गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेसने (**GeM**) 18.4 लाख कोटी रुपयांच्या उलाढालीचा टप्पा गाठला आहे. 2025-26 या आर्थिक वर्षादरम्यान एकूण मागणीच्या नोंदणीपैकी 68 टक्के मागणीच्या नोंदण्या सूक्ष्म आणि लघु उद्योगांना मिळाल्या आहेत. याचे प्रमाण एकूण मूल्याच्या 47.1 टक्के इतके होते. या स्थळावर 11 लाखांपेक्षा जास्त सूक्ष्म आणि लघु उद्योग नोंदणीकृत आहेत. आर्थिक वर्ष 2025-26 दरम्यान या उद्योगांना 2.36 लाख कोटी रुपये मूल्याच्या 51 लाखांपेक्षा जास्त मागणीच्या नोंदण्या प्राप्त झाल्या, मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत हे प्रमाण 20 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. या पोर्टलवर महिलांच्या नेतृत्वाखालील 2.1 लाखांपेक्षा जास्त नोंदणीकृत सूक्ष्म आणि लघु उद्योग आहेत. या उद्योगांनाही 28,000 कोटी रुपयांपेक्षा जास्तीच्या मागणीपर नोंदण्या प्राप्त झाल्या आहेत.


## काशीमध्ये जगातील पहिले विक्रमादित्य वैदिक घड्याळ




भारतीय काल गणनेच्या अभिमानाची छाप काशीच्या पवित्र भूमीवर उमटली आहे. काशीच्या कालजयी परंपरेने पुन्हा एकदा इतिहास रचला असून, श्री काशी विश्वनाथ मंदिराच्या पवित्र भूमीवर जगातील आगळेवेगळे विक्रमादित्य वैदिक घड्याळ स्थापित करण्यात आले आहे. हे अद्भूत घड्याळ आपल्याला आधुनिक सेकंद आणि मिनिटांच्या मर्यादांच्या पलीकडे नेत सनातन काल गणनेशी जोडणारे घड्याळ आहे. आता प्रत्येक क्षणी तिथी, नक्षत्र, योग, करण आणि भद्रा यांचे अचूक ज्ञान मिळून शकेल, त्याचबरोबरीने ग्रहांच्या गोचरची माहितीही मिळू शकेल. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत 30 मुहूर्तांमध्ये विभागलेले वेळेच्या या स्वरूपातून आपल्या ऋषीमुनींच्या दृढ वैज्ञानिक दृष्टीकोनाची प्रचिती देईल. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत 30 मुहूर्तांमध्ये विभागलेला प्रत्येक क्षणही हे घड्याळ दाखवेल, कारण हे घड्याळ केवळ वेळेची नाही तर, संस्कृतीची अनुभूती करून देणारे आहे.

### DLC अभियान 4.0

## निवृत्तीवेतनधारकांच्या कल्याणासाठी आतापर्यंतची सर्वात मोठी मोहीम



निवृत्तीवेतन आणि निवृत्तीवेतनधारक कल्याण विभागाच्या (**DoPPW**) वतीने नोव्हेंबर 2022 पासून हयातीचा दाखला सादर करण्याच्या प्रक्रियेच्या संगणकीकरणाची मोहीम राबवत आहे. या मोहिमेअंतर्गत देशभरातील चिन्हांकित शहरांमध्ये दरवर्षी 1 ते 30 नोव्हेंबर दरम्यान शिबिरे आयोजित केली जातात. या मोहिमेअंतर्गत देशभरातील 2,000 शहरे आणि जिल्ह्यांमध्ये 75,000 शिबिरे आयोजित करण्यात आली. या काळात 1.91 कोटींपेक्षा जास्त डिजिटल हयातीचे दाखले (**DLC**) तयार करण्यात आली, यात 1.16 कोटींपेक्षा जास्त डिजिटल हयातीचे दाखले (60%) चेहरा प्रमाणीकरण (फेस ऑथेंटिकेशन) तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केली गेली. निवृत्तीवेतनधारकांसाठीची ही डिजिटल हयातीचे दाखल्यांची ही सुविधा आधार क्रमांकावर आधारित डिजिटल सेवा आहे, या माध्यमातून त्यांना स्मार्टफोनच्या उपयोगाने घरबसल्या, चेहरा प्रमाणीकरणाची सुविधा वापरून हयातीचा दाखला सादर करण्याची सोय उपलब्ध होते.

# महात्मा ज्योतिराव फुले भारताचे दिव्य मार्गदर्शक



नरेंद्र मोदी
पंतप्रधान

*यावर्षी 11 एप्रिल रोजी थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या 200 व्या जयंती महोत्सवाचा प्रारंभ झाला आहे. या विशेष प्रसंगाचे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक लेख लिहून सामायिक केले आहे की, महात्मा फुले आजही अनेक लोकांसाठी प्रेरणास्थान आहेत आणि शिक्षण, ज्ञान तसेच लोककल्याणावर त्यांचा दिलेला भर आजच्या वर्तमान काळासाठीही अत्यंत प्रासंगिक आहे...*

थोर समाजसुधारक महात्मा फुले यांचे जीवन नितीमूल्याधारीत धैर्य, आत्मचिंतन आणि समाजाच्या हितासाठी असलेल्या दृढ समर्पण भावनेचे प्रेरक उदाहरण आहे. महात्मा फुले यांचे स्मरण केवळ त्यांच्या संस्था किंवा आंदोलनांसाठीच केले जात नाही, तर त्यांनी लोकांच्या मनात जी आशा आणि आत्मविश्वास जागवला, त्याचा व्यापक प्रभाव आपण आजही अनुभवतो आहोत. त्यांचे विचार देशवासियांसाठी प्रेरणादायी आहेत.

महात्मा फुले यांचा जन्म 1827 मध्ये महाराष्ट्रातील एका अतिशय सामान्य कुटुंबात झाला. मात्र आयुष्याच्या सुरुवातीच्या टप्प्यावरची आव्हाने त्यांचे शिक्षण, धैर्य आणि समाजाप्रती असलेल्या समर्पणाला कधीही रोखू शकली नाहीत. त्यांनी कायम असे मानले की, कितीही संकटे आली तरी माणसाला मेहनत करायला हवी, ज्ञान मिळवायला हवे आणि समस्यांकडे दुर्लक्ष न करता त्यांचे निराकरण करायला हवे. लहानपणापासूनच महात्मा फुले अतिशय जिज्ञासू वृत्तीचे होते आणि आपल्या वयाच्या इतर मुलांच्या तुलनेत ते कितीतरी अधिक पुस्तके वाचायचे. ते म्हणायचे देखील, आपण जेवढे जास्त प्रश्न विचारतो, त्यातून तितकेच जास्त ज्ञान मिळत असते. एक गोष्ट स्पष्ट आहे की, लहानपणापासून असलेली ही जिज्ञासू वृत्ती त्यांच्या संपूर्ण जीवनप्रवासात टिकून राहिली.

महात्मा फुले यांच्या जीवनात शिक्षण हे सर्वात महत्त्वाचे ध्येय बनले. ज्ञान ही कोणत्याही एका वर्गाची मालमत्ता नसून, ती एक अशी शक्ती आहे जी सर्वांसोबत सामायिक केली पाहिजे, असे त्यांचे मत होते. जेव्हा समाजातील मोठ्या घटकाला शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते, त्याकाळी त्यांनी मुलींसाठी आणि वंचित वर्गासाठी शाळा सुरु केल्या. ते म्हणायचे, मुलांमध्ये आईमुळे ज्या सुधारणा घडून येतात, त्या अत्यंत महत्त्वाच्या असतात. म्हणूनच जर शाळा सुरु करायच्या असतील, तर त्या सर्वात आधी मुलींसाठी सुरु करायला हव्यात. त्यांनी शिक्षणाला न्याय आणि समानतेचे माध्यम बनवले.

**लहानपणापासूनच महात्मा फुले अतिशय जिज्ञासू वृत्तीचे होते आणि आपल्या वयाच्या इतर मुलांच्या तुलनेत ते कितीतरी जास्त पुस्तके वाचायचे. ते म्हणायचे देखील की, आपण जेवढे जास्त प्रश्न विचारतो, त्यातून तितकेच जास्त ज्ञान मिळत असते.**

शिक्षणाप्रती असलेला त्यांचा दृष्टिकोन आपल्याला आजही खूप प्रेरणा देतो. गेल्या दशकभरात भारताने युवा वर्गाच्यादृष्टीने संशोधन आणि नवोन्मेषाला मोठे प्राधान्य दिले आहे. एक अशी परिसंस्था घडवण्याचा प्रयत्न केला गेला आहे, जिथे

पंतप्रधान यांचा संपूर्ण लेख वाचण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करावे.

**सावित्रीबाई फुले यांचा आदरपूर्वक उल्लेख केल्याशिवाय महात्मा फुले यांचे स्मरण अपूर्ण आहे. त्या स्वतः भारताच्या महान समाजसुधारकांपैकी एक होत्या.**

युवा वर्गाला प्रश्न विचारण्यासाठी, नवीन गोष्टी शिकण्यासाठी आणि नवोन्मेषासाठी प्रेरणा मिळू शकेल. ज्ञान, कौशल्ये आणि संधींमध्ये गुंतवणूक करून भारत आपल्या युवकांना देशाच्या प्रगतीचा आधारस्तंभ बनवत आहे.

आपल्या शैक्षणिक ज्ञानाच्या आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर महात्मा फुले यांनी कृषी, आरोग्य आणि ग्रामीण विकास यांसारख्या क्षेत्रांमधील सखोल माहिती मिळवली. ते म्हणायचे की शेतकरी आणि मजुरांवरील अन्याय समाजाला दुर्बल बनवतो. सामाजिक विषमतेमुळे शेतातील आणि गावातील लोकांचे जीवन कसे प्रभावित होते हे त्यांनी पाहिले. त्यामुळे, त्यांनी गरीब, उपेक्षित आणि दुर्बळ घटकांना सन्मान मिळवून देण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. तसेच, त्यांनी सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले.

महात्मा फुले म्हणाले होते, 'जोपर्यंत समाजातील सर्वांना समान अधिकार मिळत नाहीत, तोपर्यंत खरे स्वातंत्र्य मिळत नाही. "हाच विचार प्रत्यक्षात साकारण्यासाठी त्यांनी अनेक संस्थांची स्थापना केली. त्यांचा सत्यशोधक समाज, आधुनिक भारताच्या सर्वात महत्वपूर्ण समाज सुधारणा चळवळींपैकी एक होता. ही चळवळ सामाजिक सुधारणा, सामुदायिक सेवा आणि मानवी प्रतिष्ठेला चालना देण्यात अग्रेसर होती. हा महिला, युवक आणि गावात राहणाऱ्या लोकांचा बुलंद आवाज बनला. या चळवळीतून त्यांचा हा विश्वास दिसून येतो की समाजाच्या बळकटीकरणासाठी न्याय, प्रत्येक व्यक्तिप्रति सन्मान आणि सामूहिक प्रगती आवश्यक आहे.

त्यांचे वैयक्तिक आयुष्य देखील धैर्याचे उदाहरण होते. सतत लोकांमध्ये राहून काम करण्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर देखील झाला. परंतु गंभीर आजारही त्यांचा निर्धार डगमगवू शकला नाही. पक्षाघाताचा गंभीर झटका आल्यानंतरही त्यांनी आपले काम आणि समाजासाठी संघर्ष सुरूच ठेवला. त्यांचे शरीर अशक्त झाले, मात्र समाजाप्रती असलेली त्यांची निष्ठा कधीही डगमगली नाही. आजही कोट्यवधी लोक त्यांच्या आयुष्याच्या या पैलूतून प्रेरणा घेतात.

सावित्रीबाई फुले यांचा आदरपूर्वक उल्लेख केल्याशिवाय महात्मा फुले यांचे स्मरण अपूर्ण आहे. त्या स्वतः भारतातील महान समाज सुधारकांपैकी एक होत्या. भारतातील पहिल्या महिला शिक्षकांपैकी एक असलेल्या सावित्रीबाईंनी मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. महात्मा फुले यांच्या निधनानंतरही त्यांनी हे कार्य चालू ठेवले. 1897 च्या प्लेगच्या साथीच्या काळात, त्यांनी रुग्णांची इतकी सेवा केली की त्या स्वतः त्या आजाराला बळी पडल्या आणि त्यांचे निधन झाले.

वेळोवेळी या भारतभूमीला अशा महान व्यक्ती लाभल्या आहेत, ज्यांनी आपल्या विचारांनी, त्यागाने आणि कृतीने समाजाला सशक्त केले. त्यांनी बदलाची वाट पाहिली नाही, उलट ते स्वतःच बदलाचे माध्यम बनले. अनेक दशकांपासून आपल्या देशात सामाजिक सुधारणेचा आवाज अशा लोकांमधून उठला आहे, ज्यांनी दुःखाला आपले भाग्य न मानता ते दूर करण्यासाठी प्रयत्न करत राहिले. महात्मा ज्योतिराव फुले हे असेच एक महान व्यक्तिमत्व होते.

मला 2022 मधील माझा पुणे दौरा आठवतो, जेव्हा मी शहरातील महात्मा फुले यांच्या भव्य पुतळ्याला आदरांजली वाहिली होती. त्यांच्या 200 व्या जयंती वर्षाची सुरुवात करत असताना, आपण त्यांचे विचार अंगीकारूनच त्यांना खरी आदरांजली वाहू शकतो. आपण शिक्षणाप्रती आपला संकल्प अधिक दृढ केला पाहिजे. अन्यायाबद्दल संवेदनशील बनायला पाहिजे आणि समाज आपल्या प्रयत्नांतूनच स्वतःमध्ये सुधारणा करू शकतो यावर विश्वास ठेवला पाहिजे. त्यांचे जीवन आपल्याला शिकवते की, समाजाच्या शक्तीला जनहित आणि नैतिक मूल्यांशी जोडून भारतात क्रांतिकारक बदल घडवून आणता येतात. म्हणूनच आजही त्यांचे विचार कोट्यवधी लोकांमध्ये नवी आशा जागवतात. 200 वर्षांनंतरही, महात्मा ज्योतिराव फुले हे केवळ इतिहासातील एक नाव नाही तर भारताच्या भविष्याचे मार्गदर्शकही आहेत. ▪




ऑपरेशन सिंदूर

# आत्मनिर्भर संरक्षण प्रणालीच्या एका नव्या युगाची सुरुवात

*ऑपरेशन सिंदूरला एक वर्ष पूर्ण होणे हा केवळ एका लष्करी कारवाईचा वर्धापनदिन नाही, तर ते भारताचे निर्णायक सुरक्षा धोरण, सशस्त्र दलांचे अदम्य शौर्य आणि दहशतवादाविरोधात शून्य सहनशीलतेप्रती भारताच्या निःसंदिग्ध वचनबद्धतेचेही प्रतीक आहे. गेल्या एका वर्षात, या मोहिमेने केवळ देशाची सामरिक क्षमता आणि जलद प्रतिसाद देण्याची शक्तीच अधोरेखित केली नाही, तर आत्मनिर्भर संरक्षण प्रणाली, आधुनिक तंत्रज्ञान आणि राष्ट्रीय संकल्पाच्या एका नवीन युगाचाही उद्घोष केला आहे.*

ऑपरेशन सिंदूर भारताच्या संरक्षण इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय ठरला आहे. ही मोहीम लष्करी अचूकता, तिन्ही दलांमधील उत्कृष्ट समन्वय आणि प्रबळ राष्ट्रीय निर्धाराचे प्रतीक म्हणून उदयाला आली. हिमालयाच्या खडतर उंचीवरील आव्हानांना तोंड देणे असो, सागरी सीमांची सुरक्षा सुनिश्चित करणे असो, किंवा हवाई घुसखोरीचा कोणताही प्रयत्न हाणून पाडणे असो, भारताने प्रत्येक आघाडीवर आपली सज्जता, दृढनिश्चय आणि एकता दाखवून दिली.याच दिशेने पुढे वाटचाल करत , पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, ऑपरेशन सिंदूरनंतर मिशन सुदर्शन चक्र यावर देखील वेगाने काम केले जात आहे. शत्रूकडून भारतावर होणारा कोणताही हल्ला किंवा हल्ल्याचा प्रयत्न अगदी प्राथमिक स्तरावरच हाणून पाडण्यासाठी एक मजबूत आणि आधुनिक शस्त्र सुरक्षा प्रणाली विकसित करणे, हे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे.

> “ भारतात यापूर्वीही दहशतवादी घटना घडल्या आहेत, पण तेव्हा त्यांचे सूत्रधार निर्धास्त रहायचे आणि कोणत्याही भीतीशिवाय भविष्यातील हल्ल्यांचे नियोजन करायचे. आता परिस्थिती बदलली आहे. आज प्रत्येक हल्ल्यानंतर सूत्रधाराची झोप उडते, कारण त्याला माहीत आहे की भारत चोख प्रत्युत्तर देईल आणि अचूक कारवाई करून धोके नष्ट करेल. भारताने एक 'न्यू नॉर्मल ' स्थापित केले आहे.
>
> **–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**





## ड्रोन सामर्थ्य.. उदयोन्मुख स्वदेशी उद्योग

भारतीय ड्रोन महासंघ (डीएफआय) ही 550 हून अधिक ड्रोन कंपन्या आणि 5,500 ड्रोन पायलट्सचे प्रतिनिधित्व करणारी एक प्रमुख उद्योग संघटना आहे.2030 पर्यंत भारताला जागतिक ड्रोन केंद्र बनवण्याचे त्याचे उद्दिष्ट आहे. ते जगभरात भारतीय ड्रोन आणि ड्रोनविरोधी तंत्रज्ञानाच्या रचना, विकास, उत्पादन आणि निर्यातीला प्रोत्साहन देते.

## भारतीय ड्रोन बाजारपेठ

**11** अब्ज डॉलर्सपर्यंत 2030 पर्यंत पोहोचण्याचा अंदाज

**12.2%** जागतिक ड्रोन बाजारपेठेत भारताचा वाटा



*ऑपरेशन सिंदूर दरम्यान, जगाने आकाश क्षेपणास्त्र प्रणाली, ब्रह्मोस, आकाश तीर हवाई सुरक्षा नियंत्रण प्रणाली आणि इतर स्वदेशी उपकरणांचे सामर्थ्य पाहिले . या मोहिमेच्या यशाचे श्रेय शूर सशस्त्र दलांबरोबरच नवोन्मेष, रचना आणि उत्पादन या क्षेत्रांमध्ये आघाडीवर राहून काम करणाऱ्या 'उद्योग योद्ध्यां'ना जाते.*

***–राजनाथ सिंह, संरक्षण मंत्री***

ऑपरेशन सिंदूर दरम्यान, भारतीय लष्कराने दहशतवादी तळांवर हल्ला करून अनेक संकटे उधळून लावली. यात स्वदेशी अत्याधुनिक प्रणालींनी राष्ट्रीय संरक्षणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ड्रोन युद्ध असो, बहुस्तरीय हवाई सुरक्षा असो किंवा इलेक्ट्रॉनिक युद्ध असो, ऑपरेशन सिंदूर हा लष्करी कारवायांमध्ये तंत्रज्ञान विषयक आत्मनिर्भरतेच्या दिशेने भारताच्या प्रवासातील एक महत्त्वाचे यश होते. पाकिस्तानला पुरवण्यात आलेली चिनी हवाई संरक्षण प्रणाली भेदून भारतीय हवाई दलाने ती निकामी केली. अवघ्या 23 मिनिटांमध्ये मोहीम फत्ते करून भारताने आपल्या तंत्रज्ञान क्षमतेचे दर्शन घडवले. ऑपरेशन सिंदूरमध्ये प्रथम भारतीय लष्कराच्या कारवाईनंतर संतप्त

## स्वदेशीद्वारे आत्मनिर्भर होत असलेली संरक्षण प्रणाली

**38,424** कोटी रुपये निर्यातीची वर्ष-2025-26 मध्ये नोंद

**50,000** कोटी रुपये वर्ष 2029 पर्यंत निर्यातीचे लक्ष्य

**1,000** कोटी रुपयांहून कमी होती 10 वर्षांपूर्वी निर्यात

**3** लाख कोटी रुपयांच्या उत्पादनाचे लक्ष्य वर्ष -2029 पर्यंत

**1.54** लाख कोटी रुपयांचे वित्त वर्ष -2024-25 मध्ये स्वदेशी संरक्षण उत्पादन

**25%** वरून वाढवून पुढील तीन वर्षांमध्ये खाजगी क्षेत्रातील देशांतर्गत संरक्षण उत्पादन किमान 50% टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट



झालेल्या पाकिस्तानने ड्रोन आणि क्षेपणास्त्रांद्वारे भारतावर हल्ला केला. अवंतीपुरा , श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपूरथला, जालंधर, लुधियाना, आदमपूर, बठिंडा,चंदीगड आणि भुज यांसह उत्तर आणि पश्चिम भारतातील अनेक लष्करी तळांवरहल्ला करण्याचा प्रयत्न केला, मात्र भारतीय लष्कराने काउंटर-यूएएस ग्रिड या एकात्मिक मानवरहित हवाई प्रणाली आणि हवाई संरक्षण प्रणालीद्वारे हे प्रयत्न हाणून पाडले. यानंतर, प्रत्युत्तरादाखल कारवाई म्हणून, 8 मे रोजी सकाळी भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानमधील अनेक ठिकाणी हवाई सुरक्षा रडार आणि यंत्रणांना लक्ष्य केले.यानंतर, प्रत्युत्तरादाखल कारवाई करत , 8 मे रोजी सकाळी भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानमधील अनेक ठिकाणी हवाई सुरक्षा रडार आणि प्रणालींना लक्ष्य केले. लाहोरमधील एक हवाई सुरक्षा प्रणाली निष्प्रभ करण्यात आली. भारताच्या आक्रमक हल्ल्यांनी नूर खान आणि रहीमयार खान या प्रमुख पाकिस्तानी हवाई तळांना अचूकपणे लक्ष्य केले. विध्वंसक परिणामासाठी लोइटरिंग शस्त्रांचा वापर करण्यात आला, ज्यातील प्रत्येकाने शत्रूच्या रडार आणि क्षेपणास्त्र प्रणालींसह महत्त्वाच्या लक्ष्यांचा शोध घेऊन ती नष्ट केली.

### पहलगाम हल्ल्यापासून ते ऑपरेशन सिंदूरपर्यंतची कहाणी

22 एप्रिल 2025 रोजी पहलगाममध्ये एक भीषण दहशतवादी हल्ला झाला, ज्यात 26 निष्पाप लोकांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये 25 भारतीय आणि एका नेपाळी नागरिकाचा समावेश होता. घटनेनंतर गृहमंत्री अमित शाह श्रीनगरमध्ये दाखल झाले, त्यांनी घटनास्थळाला भेट दिली आणि त्याच रात्री सुरक्षा दल व यंत्रणांसोबत बैठक घेतली आणि हल्ल्यात सहभागी असलेले दहशतवादी देश सोडून पळून जाणार नाहीत याकडे लक्ष देण्याचे निर्देश दिले. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली 23 आणि 30 एप्रिल रोजी सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितीची बैठक झाली.

23 एप्रिल रोजी सर्वप्रथम सिंधू पाणी करार स्थगित करण्याचा आणि पाकिस्तानी नागरिकांचा सार्क व्हिसा निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला. पाकिस्तानी उच्चायुक्तालयात कार्यरत असलेल्या संरक्षण, लष्करी आणि नौदल सल्लागारांना अनावश्यक घोषित करण्यात आले. 6 आणि 7 मे च्या रात्री भारतीय लष्कराने सीमेपलिकडील दहशतवाद्यांसह त्यांचे नऊ दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. ऑपरेशन सिंदूर दरम्यान 125 हून अधिक दहशतवादी ठार झाले. सात मे च्या रात्री 1 वाजून 22 मिनिटांनी भारताच्या डीजीएमओ यांनी पाकिस्तानच्या



*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे दहशतवाद्यांच्या म्होरक्यांना ठार केले आणि 'ऑपरेशन महादेव' मध्ये पहलगाम हल्ल्यात सहभागी दहशतवाद्यांना धूळ चारली.*

***-अमित शाह, केंद्रीय गृहमंत्री***

डीजीएमओला कळवले की भारताने दहशतवाद्यांच्यातळ आणि त्यांच्या मुख्यालयांवर हल्ले केले. भारताला आत्मसंरक्षणाचा अधिकार आहे. 8 मे रोजी पाकिस्तानने भारतातील निवासी भागांवर आणि लष्करी तळांवर हल्ला केला. या हल्ल्यात एका गुरुद्वाराचे नुकसान झाले, एक मंदिर उद्ध्वस्त झाले आणि काही नागरिक मारले गेले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी भारतीय हवाई दलाने पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देत त्याचे 11 हवाई तळ उध्वस्त केले. भारताने पाकिस्तानचे हवाई तळ आणि हवाई सुरक्षा प्रणालीला लक्ष्य केले आणि त्यांची आक्रमण करण्याची क्षमताच कोलमडून टाकली. त्यानंतर पाकिस्तानकडे शरण येण्याखेरीज आणखी कोणताही मार्ग उरला नव्हता. म्हणूनच 10 मे रोजी पाकिस्तानच्या डीजीएमओ यांनी भारताच्या डीजीएमओ यांना दूरध्वनी केला आणि पाच वाजता भारताने युद्ध थांबवले.

## ऑपरेशन महादेव

ऑपरेशन महादेवची सुरुवात 22 मे , 2025 रोजी झाली होती. 22 मे , 2025 रोजी गुप्तचर विभागाला एक खबर मिळाली होती, ज्यात दाचीगाम क्षेत्रात दहशतवादी लपले असल्याचे म्हटले होते. कडाक्याची थंडी आणि उंचावरील खडतर भागात गुप्तचर विभाग, लष्कर आणि सीआरपीएफचे अधिकारी आणि जवान त्यांचे सिग्नल मिळवण्यासाठी पायी फिरत होते. 22 जुलै रोजी सेंसरच्या माध्यमातून यश मिळाले आणि दहशतवादी तिथे असल्याला दुजोरा मिळाला. सीआरपीएफ आणि जम्मू -काश्मीर पोलिसांच्या जवानांनी एकत्रितपणे दहशतवाद्यांना घेरले आणि या कारवाईत पहलगाम हल्ल्यात निष्पाप नागरिकांना मारणाऱ्या तीन दहशतवाद्यांना कंठस्नान घातले.

## ऑपरेशन सिंदूर मध्ये इस्रोचे योगदान

इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी या ऑपरेशननंतर एका कार्यक्रमात सांगितले होते की देशातील नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी ऑपरेशन दरम्यान किमान 10 उपग्रह सलग चोवीस तास कार्यरत होते. उपग्रह आणि ड्रोन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारत आपल्या सात हजार किलोमीटरहून अधिक सागरी किनारपट्टीवर देखरेख ठेवत होता.

## मिशन सुदर्शन चक्र

भारताच्या आक्रमण आणि निवारण क्षमता मजबूत करण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी भारताच्या समृद्ध सांस्कृतिक आणि पौराणिक वारशातून प्रेरणा घेत मिशन सुदर्शन चक्रचा प्रारंभ केला. शत्रूंद्वारे भारतावर हल्ला करण्याचे कोणतेही प्रयत्न हाणून पाडण्यासाठी एक शक्तिशाली शस्त्रास्त्रे प्रणाली तयार करण्यासाठी मिशन सुदर्शन चक्र सुरु करण्यात आले. ही मोहीम भारताची सामरिक स्वायत्तता बळकट करत तीव्र, अचूक आणि शक्तिशाली सुरक्षा कारवाया वाढवण्यासाठी तयार करण्यात आली आहे. वर्ष 2035 पर्यंत सर्व सार्वजनिक ठिकाणांना एका विस्तारित सुरक्षा कवच द्वारे संरक्षित केले जाईल. ▪

# 33% महिला आरक्षण

# लोकशाही

## वचनबद्धतेचा उद्‌घोष...



# ती कोणत्याही चाकोरीबद्ध चौकटीत बंदिस्त राहण्यासाठी बनलेली नाही... ती नवीन मार्ग बनवण्यासाठी बनलेली आहे...

याच संकल्पासह , नवा भारत उत्कृष्टतेचे नित्य नवे अध्याय लिहीत आहे. अनेक दशकांपासून, अर्ध्या लोकसंख्येच्या अधिकारांना सशक्त बनवण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले जात आहेत. 21व्या शतकाचे तिसरे दशक संपत येत असताना, महिलांचा सहभाग बळकट करण्याचा निर्धार अधिकच स्पष्ट झाला आहे. केवळ महिलांचे उत्थानच नव्हे तर महिला-नेतृत्वाखालील विकासाचा दृष्टिकोन गेल्या 12 वर्षांपासून राष्ट्रीय धोरणाचा एक महत्त्वपूर्ण आधारस्तंभ बनला आहे. शिक्षण, आरोग्य , आर्थिक समृद्धी आणि नेतृत्वाच्या संधी देऊन महिलांना सक्षम करण्यासाठीचे असंख्य उपक्रम या दिशेने मैलाचा दगड ठरले आहेत. याच दिशेने वाटचाल करत, केंद्र सरकारने 16 ते 18 एप्रिल दरम्यान आयोजित विशेष अधिवेशनात, लोकशाहीच्या या पवित्र मंदिरातून पुन्हा एकदा उद्‌घोष केला की, ते महिलाशक्तीच्या नेतृत्वाखालील विकासाच्या प्रवासासाठी कटिबद्ध आहे. नवा भारत आता त्या पहाटेच्या दिशेने वाटचाल करत आहे, जिथे प्रत्येक महिला केवळ स्वप्न पाहणार नाही, तर ती साकार करून आपल्या धैर्याने, दृढनिश्चयाने व सर्जनशीलतेने राष्ट्राचे भविष्य घडवेल....

ना***री तू नारायणी, तुमसे ही सामर्थ्य है, तुम्ही हो राष्ट्रशक्ति।*** या शब्दांमध्ये, नवा भारत नवा इतिहास घडवण्यासाठी कटिबद्ध आहे.विकसित भारताच्या संकल्प सिद्धीचा मंत्र आता महिलांच्या नेतृत्वाखाली जयघोष करण्यास सज्ज झाला आहे. हा केवळ एक विचार नाही, तर एका युगपरिवर्तनाचा साक्षीदार आहे , जिथे महिला केवळ सहभागीच नाहीत, तर परिवर्तनाच्या प्रणेत्या बनून राष्ट्राची दिशा आणि दशा निर्धारित करणार आहेत. वर्ष 2026 मध्ये 16 ते 18 एप्रिल दरम्यान आयोजित संसदेच्या विशेष अधिवेशनात राष्ट्रीय हिताच्या सरकारी निर्णयावर राजकारण वरचढ ठरले. केंद्र सरकारच्या वचनबद्धतेपेक्षा आकडा वरचढ ठरला. तीन दशकांहून अधिक काळ सुरू असलेल्या हक्कांचा लढा सध्या तरी पूर्णत्वास पोहचू शकला नाही.

हा निर्णय केवळ धोरणात्मक बदल किंवा अर्ध्या लोकसंख्येला हक्क देण्यापुरता सीमित राहणार नव्हता ,तर तो एका सामाजिक चेतनेच्या पुनर्जागरणाचा क्षण बनणार होता. परंतु इतिहास घडवण्याच्या जवळ पोहचलेल्या या निर्णयावर राजकीय हेतू उघड झाले. लोकसभा आणि विधानसभेत 33 टक्के आरक्षण 2029 च्या सार्वत्रिक निवडणुकांपासून लागू करण्याची केंद्र सरकारची प्रबळ इच्छा असली तरी, घटनात्मकदृष्ट्या अनिवार्य दोन-तृतीयांश खासदारांचा पाठिंबा मिळू शकला नाही. आता पुन्हा एकदा केंद्र सरकारने लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरातून स्पष्टपणे घोषणा केली आहे की, आकड्यांनी भले साथ दिली नसली तरी महिलांना आरक्षण देण्याचा निर्णय हा नव्या भारताची सांस्कृतिक कटिबद्धता आहे, ज्यावर केंद्र सरकार ठाम आहे.

जर लोकसभा आणि विधानसभेत महिलांना 33 टक्के आरक्षण देणारे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत पारित झाले असते, तर 2029 च्या सार्वत्रिक निवडणुकांपासून लागू होणारा हा ऐतिहासिक घटनात्मक निर्णय विकसित भारताच्या प्रवासाचा एक उज्ज्वल मार्ग बनला असता.यासाठी, केंद्र सरकारने संसदेचे विशेष अधिवेशन बोलावून नारी शक्ती वंदन अधिनियम 2023 मध्ये दुरुस्तीचा प्रस्ताव लोकसभेत मांडला ,जेणेकरून अनेक दशकांपासून प्रतीक्षेत असलेली मातृशक्ती केवळ घरातच नव्हे, तर देशाच्या धोरणनिर्मितीतही निर्णायक भूमिका बजावू शकेल.

नव्या भारताच्या नव्या संसदेने 20 आणि 21 सप्टेंबर 2023 रोजी हे विधेयक मंजूर करून इतिहास रचला होता . एके काळी राजकारण आणि सत्तेला सर्वोपरी मानून जे विधेयक अनेक दशके रखडवले गेले किंवा त्याबद्दल केवळ चर्चा केली गेली , त्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्यक्षात आणले होते. त्यासाठी त्यांनी प्रसंग देखील खास बनवला होता. संसदेच्या नव्या इमारतीत प्रवेशासाठी एका विशेष उद्देशाने विशेष अधिवेशन बोलावण्यात आले होते.



# नारी शक्तीमुळे होत आहे विकसित भारत साकार

*भारतातील नारी शक्तीचा ध्वज आज प्रत्येक क्षेत्रात फडकत आहे. हे परिवर्तन केवळ महिला सशक्तीकरणापुरते मर्यादित नाही; तर त्याबरोबर समाजाची विचारसरणी आणि क्षमताही बदलत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत, महिला सबलीकरणाच्या दिशेने एक क्रांतिकारी बदलाचा साक्षीदार ठरला आहे. महिला नेतृत्वाखाली विकास या अभियानांतर्गत विकसित भारत साकारण्यात नारी शक्तीची भूमिका लक्षात घेणारे प्रमुख उपक्रम...*

## अधिकार आणि कायदेशीर सुरक्षा...

*महिलांना अधिकार, सुरक्षा आणि संधी देण्यासाठी अनेक ऐतिहासिक पावले उचलली आहेत. नारी शक्ती वंदन अधिनियमाने लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांचे अधिकार निश्चित केले; तर पंचायतींना मजबूत करण्यासाठीही कार्यरत नारी शक्ती...*

**वर्ष 2029 च्या सार्वत्रिक निवडणुकांपासून 33 टक्के महिला आरक्षण लागू करण्यासाठी तीन विधेयके आणली**

- संविधान (131 वी दुरुस्ती) विधेयक 2026
- संघ-राज्यक्षेत्र कायदा (दुरुस्ती) विधेयक 2026
- परिसीमन विधेयक 2026



**1971-72 पासून आजपर्यंत संसदेतील जागांची संख्या कायम आहे. आज 127 जागा अशा आहेत की तिथे 20 लाखांहून अधिक मतदार आहेत. या जागांवर एक मत, एक मतदार आणि एक मूल्य या तत्त्वाचा पूर्ण भंग होतो.**

मात्र 2023 मध्ये बांधण्यात आलेल्या 2029 च्या लोकसभा निवडणुकीपासून कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी त्यात दुरुस्ती आवश्यक झाली होती. सरकारने 2026 नंतर होणाऱ्या जनगणनेनंतर परिसीमनाची प्रतीक्षा केली असती तर कायदा असतानाही महिलांना 2029 च्या निवडणुकीत हा हक्क मिळणे अवघड झाले असते. हे लक्षात घेऊन संसदेत तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावून केंद्र सरकारने नारी शक्तीला तिचा हक्क देण्यासाठी ऐतिहासिक पुढाकार घेत आपली दृढ इच्छाशक्ती राष्ट्रासमोर ठेवली.

### महिला नेतृत्व प्रतीकापुरते नव्हे; तर पूर्ण प्रतिनिधित्व

नारी शक्ती वंदन अधिनियमातील दुरुस्तीनुसार लोकसभेत जागांची संख्या 545 ऐवजी वाढवून 850 करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. हे संविधान दुरुस्ती विधेयक होते, त्यामुळे संसदेत केवळ बहुमत पुरेसे नसून दोन तृतीयांश बहुमत आवश्यक आहे. महिला आरक्षण 2029 पासून लागू करण्याच्या उद्देशाने हे विधेयक

## नारी शक्ती वंदन अधिनियम

**33%** महिला लोकप्रतिनिधी 2029 च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान निवडण्याची तरतूद होती.



तरतुदीनुसार लोकसभेत एकूण **850** जागा असणे आवश्यक होते.

त्याची राज्यांमधून 815 आणि केंद्रशासित प्रदेशांमधून **35** खासदार अशी विभागणी होती.

- उर्वरित जागा खुल्या ठेवल्या असून त्यावर पुरुष किंवा महिला कुणीही निवडणूक लढवू शकतात.
- वाढलेल्या जागांच्या प्रमाणात एससी-एसटी आरक्षण असलेल्या जागा 131 ऐवजी 205 झाल्या असत्या.
- सर्व राज्यांमध्ये जागांचे समान वितरण - 50% वाढीचे सूत्र निश्चित केले होते.
- जागांमध्ये राज्यनिहाय वाढ करताना कोणत्याही राज्याचे लोकसंख्येच्या निकषावर नुकसान होऊ नये यासाठी प्रमाण निश्चित केले.
- आरक्षण लागू झाल्याच्या तारखेपासून 15 वर्षांसाठी जागा आरक्षित राहतील, त्यानंतर संसदेच्या इच्छेनुसार आरक्षण वाढविण्याची तरतूद होती.
- लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना 33 टक्के आरक्षणाचे विधेयक 21-22 सप्टेंबर 2023 रोजी मंजूर झाले. 29 सप्टेंबर रोजी राष्ट्रपती स्वाक्षरीनंतर कायदा झाला.
- सप्टेंबर 2023 मध्ये झालेल्या कायद्याला 16 एप्रिल 2026 रोजी केंद्र सरकारने अधिसूचित केले.

## निर्णय प्रक्रियेत मजबूत भागीदारी

**14.5** लाख निवडून आलेल्या महिला प्रतिनिधी पंचायती राज संस्थांमध्ये आहेत.

- हे एकूण प्रतिनिधींच्या सुमारे 46 टक्के असून जगातील एक विशेष उदाहरण आहे.
- हे निर्णय प्रक्रियेत महिलांचा मजबूत सहभाग आणि सशक्त लोकशाहीचे उदाहरण आहे. आता भारतामध्ये महिला फक्त लाभार्थी नसून, धोरण निर्मितीमध्ये सहभागी आहेत.



## महिलांमध्ये राजकारणातील सहभागासाठी वाढती उत्सुकता

- पहिली लोकसभा 22 महिला सदस्य
- सहावी लोकसभा 19 महिला सदस्य
- आठवी लोकसभा 44 महिला सदस्य
- 14 वी लोकसभा 51 महिला सदस्य
- 17 वी लोकसभा 78 महिला सदस्य
- 18 वी लोकसभा 75 महिला सदस्य

> “आम्ही परिसीमन आयोग अधिनियमात कोणताही बदल केलेला नाही, जुना कायदा पूर्णविराम आणि स्वल्पविरामासह पुन्हा मांडला आहे. गतकाळात या अधिनियमाचा वापर कोणत्याही प्रकारे फेरफारासाठी झाला असेल तर त्यावर टिप्पणी करू शकत नाही. मात्र, सध्याच्या सरकारने असा कोणताही प्रयत्न केलेला नाही.”
>
> **अमित शाह, केंद्रीय गृह मंत्री**

मात्र लोकसभेत मतदान झाले तेव्हा विधेयकाच्या बाजूने 298 आणि विरोधात 230 मते पडली. संविधानात्मक तरतुदीनुसार आवश्यक दोन तृतीयांश बहुमतापेक्षा कमी मते मिळाली आणि हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. आता महिला शक्तीला आपल्या अधिकारासाठी पुन्हा एकदा संघर्ष करावा लागेल. राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व आता केवळ प्रतीकापुरते मर्यादित राहणार नाही; तर अर्ध्या लोकसंख्येला योग्य प्रतिनिधित्व प्रत्यक्षात मिळवून देण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे.

अनेक दशकांपासून प्रलंबित असलेल्या विधिमंडळातील महिला आरक्षणाच्या स्वप्नाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पाने वास्तवात आणले होते. मात्र, सर्वसंमतीच्या अभावी अडकलेले

# तीन दशकांचा प्रवास

## लवकर प्रत्यक्षात आणण्याप्रती वचनबद्ध



- 1975 मध्ये भारतात महिलांच्या स्थितीसंदर्भात एका समितीने महिलांच्या घटत्या प्रतिनिधित्वावर टिप्पणी केली होती.
- वर्ष 1981 च्या राष्ट्रीय समृद्धी आराखड्यात सर्व संस्थांमध्ये महिलांसाठी 30% आरक्षणाची शिफारस केली होती.
- 73 वी, 74 वी संविधान दुरुस्ती देखील झाली परंतु लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिला आरक्षणाचा विषय पुढे गेला नाही.
- महिला आरक्षणाचे सर्वात पहिले विधेयक 12 सप्टेंबर 1996 रोजी एचडी देवेगौडा यांच्या सरकारच्या काळात संविधानाच्या 81 व्या दुरुस्तीच्या स्वरूपात मांडले गेले. हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठविले. मात्र, समितीचा अहवाल आला तेव्हा 11 वी लोकसभा संपली आणि त्याबरोबर विधेयकही संपले.
- दुसऱ्यांदा अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये 14 डिसेंबर 1998 रोजी संविधानाच्या 84 व्या दुरुस्तीच्या स्वरूपात विधेयक मांडले गेले, पण 12 वी लोकसभा संपताच हा प्रयत्नही समाप्त झाला.
- तिसऱ्यांदा पुन्हा अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्येच 23 डिसेंबर 1999 रोजी संविधानातील 85 वी दुरुस्ती म्हणून विधेयक मांडले गेले. यावेळी राजकीय पक्षांमध्ये सहमती न झाल्यामुळे विधेयक पुढे जाऊ शकले नाही.
- चौथ्या प्रयत्नात डॉ. मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये 108 वी संविधान दुरुस्ती म्हणून विधेयक 6 मे 2008 रोजी राज्यसभेत मांडले, स्थायी समितीकडे पाठवले गेले. अहवाल आल्यानंतर 9 मार्च 2010 रोजी राज्यसभेत गदारोळाच्या वातावरणात विधेयक मंजूर झाले. लोकसभेकडे पाठवले गेले. परंतु, लोकसभा 18 मे 2014 रोजी विसर्जित होताच विधेयक निष्प्रभ झाले.
- विद्यमान सरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने 18 सप्टेंबर 2023 रोजी नारी शक्ती वंदन अधिनियम, 2023 ला मंजुरी दिली.
- 19 सप्टेंबर 2023 रोजी महिला शक्ती वंदन अधिनियम, 2023 (128 वी संविधान दुरुस्ती विधेयक) लोकसभेत विशेष अधिवेशन बोलावून मांडले. विधेयकाच्या बाजूने 454 मते आणि विरोधात फक्त 2 मते पडली.
- 20 सप्टेंबर 2023 रोजी नारी शक्ती वंदन अधिनियम, 2023 राज्यसभेत सादर झाले आणि बिनविरोध, 214 मतांनी मंजूर झाले.
- 28 सप्टेंबर 2023 रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी नारी शक्ती वंदन अधिनियम, 2023 वर स्वाक्षरी केली आणि त्यानंतर हा कायदा बनला.
- 16 ते 18 एप्रिल 2026 दरम्यान विशेष अधिवेशनात 131 वी संविधान दुरुस्ती विधेयक 2026, परिसीमन विधेयक 2026 आणि संघ राज्यक्षेत्र कायदा (दुरुस्ती) विधेयक 2026 ही विधेयके संसदेत मांडण्यात आली. सरकारने वचनबद्धता दर्शवली मात्र संविधान दुरुस्ती विधेयकासाठी आवश्यक दोन तृतीयांश मते मिळाली नाहीत.

विधेयक सप्टेंबर 2023 मध्येच संसदेच्या विशेष अधिवेशनात केंद्र सरकारच्या धाडसी निर्णय, ठाम निर्धार आणि प्रामाणिक पुढाकारामुळे सहज कायदा बनला. त्यामुळे लोकसभा, विधानसभांमध्ये 33 टक्के महिला आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला. पण ते प्रत्यक्षात लागू करण्यात तांत्रिक कारणांमुळे उशीर होत होता. अशा परिस्थितीत केंद्र सरकारने त्यात दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला आणि 16-18 एप्रिल या काळात संसदेत विशेष अधिवेशन बोलावून सप्टेंबर 2023 च्या कायद्यात दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव मांडला.

### संकल्पाप्रती वचनबद्धतेचे प्रतीक ठरले विशेष अधिवेशन

संसदेचे विशेष अधिवेशन इतिहास घडविण्यात कदाचित अपयशी ठरले असेल, मात्र हे अधिवेशन नारी शक्ती नेतृत्वासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या संकल्प आणि वचनबद्धतेचे चिन्ह ठरले. 2029 च्या सार्वत्रिक निवडणुकांपासून महिला आरक्षण प्रत्यक्षात आणण्यासाठी 2023 च्या महिला शक्ती वंदन अधिनियमात दुरुस्ती करण्याचे सरकारने ठरविले. त्यासाठी वचनबद्ध राहून केंद्र सरकारने विशेष अधिवेशन बोलावले आणि




प्रसिद्ध वाळू कलाकार सुदर्शन पटनाईक यांनी ओदिशातील पुरी समुद्र किनाऱ्यावर नारी शक्ती वंदनाच्या भावनेला समर्पित केलेली आकर्षक वाळू कला महिला सबलीकरण आणि वाढत्या सहभागाचा प्रेरणादायी संदेश देते.

आवश्यक विधेयके मांडली. इतकेच नव्हे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याला राजकारणाऐवजी राष्ट्रहिताचा निर्णय असे म्हटले, नारी शक्तीचा हक्क म्हटले, भारताच्या सांस्कृतिक बांधिलकीचे प्रतीक असल्याचे सांगितले, तरीही पुन्हा एकदा दशकांपासून चालत आलेले'जर तर... पण, परंतु' यांनी महिला आरक्षण 2029 पासून लागू करण्याच्या मार्गात अडथळा निर्माण झाला. पंतप्रधानांनीविशेष अधिवेशन बोलाविल्यापासून महिला आरक्षण प्रत्यक्षात आणण्यात आता एक दिवसही वाया जाऊ देऊ नये, असे सातत्याने देशासमोर मांडले आहे.

केंद्र सरकारला आशा होती की सप्टेंबर 2023 प्रमाणेच पुन्हा एकदा महिला आरक्षणाच्या विषयावर लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरातून लोकशाहीप्रती वचनबद्धतेचा जयघोष होईल. पण सहमती झाली नाही आणि विरोधकांच्या समर्थनाअभावी संविधान दुरुस्तीसाठी आवश्यक पुरेशी मते या विधेयकाच्या बाजूने पडली नाहीत.

पंतप्रधान मोदी यांची वचनबद्धता फक्त संसदेत दुरुस्ती विधेयक मांडण्यापुरती मर्यादित नव्हती, त्यांनी या विशेष चर्चेत सहभागी होत विरोधकांना या दुरुस्तीच्या समर्थनाच्या बदल्यात पूर्ण श्रेय देण्याची एकतर्फी घोषणा देखील केली. लोकसभेत चर्चेसाठी नियोजित वेळात वाढ करण्यात आली आणि पहिल्या दिवशी मध्यरात्री एक वाजेपर्यंत चर्चा झाली. दुरुस्तीशी संबंधित संभ्रम दूर करण्यासाठी केंद्र सरकारने तर्कसंगत उत्तरे देऊन समाधान केले. विरोधाचा स्वर आणि भावना दूर करण्याच्या हेतूने सर्व माहिती उपलब्ध करून दिली. पंतप्रधान मोदी यांनी ठामपणे सांगितले की महिला आरक्षणाचा मुद्दा जवळपास चार दशकांपासून राजकीय चर्चेचा विषय राहिला आहे आणि देशाच्या अर्ध्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महिलांना त्यांचे योग्य प्रतिनिधित्व मिळवून देण्याची वेळ आता आली आहे.

इतकेच नव्हे तर; पंतप्रधानांनी सर्व राजकीय पक्षांना विचारपूर्वक आणि पूर्ण संवेदनशीलतेने महिला आरक्षण दुरुस्तीच्या बाजूने मतदान करण्याचे आवाहन केले. देशातील महिलांच्या वतीने त्यांनी सर्व खासदारांना विनंती केली की असे काहीही करू नका ज्यामुळे नारी शक्तीच्या भावना दुखावल्या जातील. त्यांनी सांगितले की कोट्यवधी महिला संसद, तिचे उद्दिष्ट आणि तिचे निर्णय यांच्याकडे पाहात आहेत. पंतप्रधानांनी खासदारांना त्यांच्या घरातील आई – बहीण – लेकी - पत्नी यांचा विचार करून स्वतःच्या अंतःकरणाचा आवाज ऐकण्याचे आवाहन केले. पंतप्रधान मोदी यांनी या दुरुस्तीला देशातील महिलांची सेवा आणि सन्मान करण्याची एक महत्त्वपूर्ण संधी असल्याचे सांगितले आणि सदस्यांना भावनिक आवाहनही केले –

**"मी सर्व खासदारांना सांगतो...**

**आपण आपल्या घरातील आई – बहीण – लेकी - पत्नी यांचे स्मरण करून आपल्या अंतःकरणाचा आवाज ऐका...**

**देशातील नारी शक्तीची सेवा करण्याची, त्यांचा सन्मान करण्याची ही एक मोठी संधी आहे. त्यांना नव्या संधींपासून वंचित ठेवू नका.**

**हे दुरुस्ती विधेयक सर्वसंमतीने मंजूर झाले तर देशातील महिला शक्ती आणखी सक्षम होईल, देशाची लोकशाही अधिक मजबूत होईल. चला...**

**आपण सर्व मिळून आज इतिहास घडवूया. भारतातील महिलांना, देशाच्या अर्ध्या लोकसंख्येला त्यांचा हक्क देऊया."**

# जन्मापासून जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर
## काहीना काही सरकारी योजना

**बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ**
गर्भात मुलीची हत्या होऊ नये

**मातृ वंदना योजना**
...म्हणजे आईला योग्य पोषण मिळावे

**सुकन्या समृद्धि योजना**
मुलीच्या शिक्षणात अडथळा येऊ नये

**मिशन इंद्रधनुष**
मुलीला गंभीर आजारांपासून वाचविणाऱ्या लसी मिळाव्यात

**स्वच्छ भारत मिशन**
शाळेत शौचालयाची अडचण येऊ नये

**सैनेटरी पैड अभियान**
मुलींना मासिक पाळीदरम्यान गैरसोय होऊ नये

**खेलो इंडिया**
खेळात पुढे जाण्याची संधी, दरवर्षी 1 लाख रुपयांपर्यंत मदत



**उज्ज्वला योजना**
धुरापासून मुक्तता, मोफत गॅस जोडणी

**जल जीवन मिशन**
डोक्यावर पाणी वाहून न्यावे लागू नये

**मुफ्त राशन की योजना**
रेशनची चिंता संपली

**आयुष्मान योजना**
5 लाख रुपयांपर्यंत विनामूल्य उपचार, कुटुंबाला उपचाराची काळजी नको

**जन औषधि केंद्र**
आजारपणात 80 टक्क्यांपर्यंत स्वस्तात औषधे

**मातृत्व रजा 26 आठवडे**
कारकीर्दीवर विपरीत परिणाम होऊ नये; जगातील अनेक विकसित देशांतही ही सुविधा नाही

**सैनिक स्कूल – एनडीएचे दरवाजे खुलेद्वार**
मुलींना सैन्यात जाण्याचा पर्याय उपलब्ध

**स्किल इंडिया**
कौशल्य विकास व्हावा, व्यावसायिक प्रशिक्षणामुळे ड्रोन दीदी बनत आहेत लखपती दीदी



नारी शक्तीला तिचा हक्क मिळावा, यासाठी विनंतीसह पंतप्रधान मोदी यांनी या निर्णयाला राजकारणाऐवजी राष्ट्रहिताच्या तराजूत तोलण्याचे आवाहन केले होते. ते म्हणाले, "आपण सर्व भाग्यवान आहोत की आपल्याला राष्ट्रनिर्माणात देशाच्या अर्ध्या लोकसंख्येला सहभागी करून घेण्याचे सौभाग्य मिळाले आहे. आपली नारी शक्ती देशाच्या धोरणनिर्मितीत सहभागी व्हावी ही काळाची गरज आहे. गेल्या 25-30 वर्षांत लाखो महिला तळागाळाच्या पातळीवरील नेतृत्व आणि मते निर्मात्या बनल्या आहेत. त्यामुळे आता त्यांचा विरोध करणाऱ्यांना दीर्घकाळ त्याची किंमत मोजावी लागेल. देशातील नारी शक्तीला आरक्षण देणे हा राष्ट्रहिताचा निर्णय आहे, यामध्ये माता, भगिनी आणि कन्या आपले हेतू पाहतील. म्हणून याला राजकारणाच्या तराजूत तोलू नका. आपण देशातील महिला शक्तीला काही देत आहोत या भ्रमातही आपण राहू नये कारण हा त्यांचा हक्कच आहे. आपली भावना श्रेय घेण्याची नसून महिलांना अधिक सबल करण्याची आहे." केंद्र सरकारची भावना होती की 2029 च्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर लोकसभा स्थापन होईल तेव्हा किमान 33 टक्के खासदार महिला असाव्यात. म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी,म्हणाले, "हा माझ्या आयुष्यातील सर्वात विशेष क्षणांपैकी एक आहे. आता गरज आहे की 2029 च्या लोकसभा निवडणुका आणि पुढील काळातील राज्यांच्या विधानसभा निवडणुका महिला आरक्षणाच्या तरतुदींनुसार घेण्यात याव्यात." हे विधेयक मंजूर झाले नसले तरी केंद्र सरकारची आपल्या हेतूप्रती वचनबद्धता स्पष्ट झाली आहे. अमृतकालाकडे वाटचाल करणाऱ्या भारतात नारी शक्ती, नीती, निष्ठा, निर्णय क्षमता आणि नेतृत्वाचे प्रतिबिंब बनली आहे आणि केंद्र सरकारची इच्छा आहे की विकसित भारताच्या निर्मितीत नारी

## आगेकूच सुरू

- देशातील मुली योद्धा वैमानिक बनून गगनभरारी घेत आहेत.
- जगातील कोणत्याही देशाच्या तुलनेत भारतात महिला वैमानिकांची टक्केवारी सर्वाधिक आहे.
- पीएचडी प्रवेशात मुलींची संख्या 2014 च्या तुलनेत जवळपास दुप्पट झाली आहे.
- गणित आणि विज्ञान म्हणजेच स्टेम शिक्षणात मुलींची संख्या 43 टक्के झाली आहे.
- 21 राज्यांमध्ये पंचायतीमध्ये महिलांचा सहभाग जवळपास 50 टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे.



शक्ती नेतृत्व निर्माण करणारी बनावी, महिला सक्षम असाव्यात, समर्थ असाव्यात आणि त्यांनी राष्ट्राला दिशा द्यावी.

### महिला आरक्षण... प्रवास कायम सुरू

बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांनी म्हटले होते, "महिलांची प्रगती होत असेल तर माझ्या मते हे त्या समाजाच्या, राष्ट्र प्रगतीचे लक्षण आहे." हा विचार प्रत्यक्षात उतरवित केंद्र सरकारने 2023 मध्ये संविधान दुरुस्ती विधेयकाच्या माध्यमातून केंद्रशासित प्रदेश राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली, लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये 33 टक्के आरक्षण लागू करण्याची तरतूद केली. एससी-एसटी साठी जागांमध्ये असलेल्या आरक्षणात 33 टक्के महिला आरक्षण दिले जाणार होते. त्यासाठी 2023 मध्ये बनलेला कायदा 16 एप्रिल 2026 रोजी अधिसूचित करण्यात आला. म्हणजे 33 टक्के महिला आरक्षण लागू होणारच, फक्त त्यामध्ये प्रक्रियात्मक विलंब होईल.

वास्तविक, सर्वप्रथम 1996 मध्ये माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांच्या कार्यकाळात 11 व्या लोकसभेत महिला आरक्षण विधेयक आले होते. त्यानंतर डिसेंबर 1998 मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारने 12 व्या लोकसभेत हे विधेयक मांडले. त्यानंतर मनमोहन सिंह सरकारच्या काळात लोकसभेत नव्हे तर; मे 2008 मध्ये हे विधेयक राज्यसभेत सादर केले गेले. तेव्हा ते संसदेच्या स्थायी समितीकडे पाठविले गेले आणि समितीचा अहवाल आल्यानंतर 9 मार्च 2010 रोजी राज्यसभेत मंजूर करून लोकसभेकडे पाठविले गेले.

परंतु, 15 वी लोकसभा विसर्जित झाल्यानंतर हे विधेयकही संपले. आता 17 व्या लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने नवीन रूपात नारी शक्ती वंदन अधिनियम विधेयक सादर केले, ते जवळपास सर्वसंमतीने संसदेच्या दोन्ही सभागृहांत मंजूर झाले. सप्टेंबर 2023 मध्ये नारी शक्ती वंदन अधिनियम मंजूर झाल्यामुळे महिलांची 33 टक्के भागीदारी निश्चित झाली. इतकेच नव्हे तर; पंचायती राज संस्थांमध्ये 14.5 लाख निवडून आलेल्या प्रतिनिधी महिला आहेत. ही संख्या एकूण प्रतिनिधित्वाच्या सुमारे 46% असून हे निर्णय प्रक्रियेत महिलांचा मजबूत सहभाग आणि सशक्त लोकशाहीचे उदाहरण आहे.

> देशातील नारी शक्तीने आपले परिश्रम, धैर्य आणि आत्मविश्वासाने नवी उंची गाठली आहे. आता आपण सर्वांनी मिळून या शक्तीला नवीन ऊर्जा द्यायची आहे, त्यासाठी संधींचा विस्तार करावयाचा आहे. मी देशातील प्रत्येक आई, बहीण, मुलगी या सगळ्यांमध्ये मी विश्वास निर्माण करू इच्छितो की देशाला त्यांच्या आकांक्षा समजू लागल्या असून त्यांच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी प्रत्येक आवश्यक पाऊल उचलत आहे.
>
> ***नरेंद्र मोदी, पंतप्रधान***



# न्याय आणि सुरक्षा

*चुकीच्या सामाजिक रूढींवर आघात असो वा कार्यस्थळी सुरक्षित वातावरण, नवा भारत नारी शक्तीला न्याय आणि सुरक्षेचे कवच देत आहे.*



## तीन तलाक संदर्भातील कायदा

- मुस्लिम महिलांना कायदेशीर सुरक्षा आणि समानता.
- यामुळे तीन तलाकच्या कुप्रथेवर कडक प्रहार झाला.



## निर्भया निधी

**5,846.08**

कोटी रुपये खर्च महिलांच्या सुरक्षेसाठी निर्भया निधीतून करण्यात आला आहे.

**मातृत्व रजा**
12 वरून वाढवून 26 आठवडे पर्यंत

## फास्ट ट्रॅक न्यायालये



**774**
फास्ट ट्रॅक विशेष न्यायालये, 398 विशेष पॉक्सो न्यायालयांसह 31 जानेवारी 2026 पर्यंत कार्यान्वयित.

- बलात्कार आणि लैंगिक गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्ये त्वरित न्याय
- वन स्टॉप केंद्र आणि हेल्पलाइन
- गरजू महिलांना मदत

## भारतीय न्याय संहिता- 2023

- लैंगिक गुन्ह्यांवर कठोर शिक्षेची तरतूद
- महिला न्यायालयाच्या माध्यमातून ग्रामीण स्तरावर कौटुंबिक वादांचे निराकरण

## मिशन शक्ती

**सबल - सुरक्षा आणि संरक्षणावर केंद्रित**

**15,761**
कोटी रुपयांचे अंदाजपत्रक आर्थिक वर्ष 2025-26 पर्यंत निश्चित

13.37 लाख महिलांना 926 वन स्टॉप केंद्रांवर मिळाली मदत

**99.09** लाख महिलांना हेल्पलाइन क्रमांकावर मिळाली मदत

**सामर्थ्य - आर्थिक आणि सामाजिक सबलीकरणावर केंद्रित**

**4.26**
कोटी प्रधानमंत्री मातृवंदना योजनेचे लाभार्थी

**2,92,681**
शक्ती सदनातून मदत

**5,29,483**
शक्ती निवासामधून लाभ

**1,64,730**
पालनाद्वारे मदत

**4,15,174**
संकल्पातून मदत (महिलांच्या सबलीकरणाचे केंद्र)

**महिलांच्या विवाहाचे वय** → 18 वरून 21 वर्षे करण्याचा प्रस्ताव



**2001 मध्ये 84 वी संविधान दुरुस्ती झाली आणि 2026 पर्यंत जागांची संख्या कायम ठेवण्यात आली. 1976 ते 2026 या 50 वर्षांत देशातील जनतेला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले नाही.**

### योजनांमुळे महिलांच्या जीवनात सुलभता


महिला सबलीकरण हा आता केवळ सामाजिक न्यायाचा विषय नाही तर; संवेदनशील विचार आणि आर्थिक विकासासाठीही अत्यंत महत्त्वाचे आहे, असा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा विचार आहे. याचा परिणाम म्हणून आज महिला शिक्षण, प्रशासन, न्यायव्यवस्था, सेना, वैद्यक, विज्ञान, तंत्रज्ञान, कला आणि उद्योग या सर्व क्षेत्रांमध्ये अग्रणी भूमिकांमध्ये दिसत आहेत. ग्रामीण भागातील महिला बचत गटांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होत आहेत. त्या पंचायतींमध्ये ग्रामीण विकासाचे नेतृत्व करीत आहेत. अनेक महिला उद्योग, स्टार्ट-अप आणि कॉर्पोरेट क्षेत्रांत आपल्या क्षमता आणि गुणवत्तेच्या बळावर नेतृत्व करीत आहेत. क्रीडा क्षेत्रात महिला उत्कृष्ट कामगिरी करीत आहेत. संधी आणि पाठबळ मिळाले तर महिला प्रत्येक क्षेत्रात उत्कृष्टता साध्य करू शकतात, हा विश्वास या उदाहरणांमुळे निर्माण होतो.

याच विचाराने गेल्या 12 वर्षांत माता, भगिनींशी संबंधित प्रत्येक बंधन तोडण्याचा प्रयत्न झाला आहे. केंद्र सरकारने एकापाठोपाठ

## कामगार संरक्षण

- महिलांना खाणकामासह सर्व क्षेत्रांमध्ये रात्रीच्या पाळीत काम करण्याची परवानगी.
- महिला खाणकाम, धातू आणि यंत्रसामग्री यांसारख्या प्रमुख औद्योगिक क्षेत्रांमध्येही कार्यरत आहेत.
- अवजड उद्योग आणि उत्पादन कंपन्यांचे 2030 पर्यंत 30 टक्के लैंगिक विविधता साधण्याचे उद्दिष्ट.
- याव्यतिरिक्त, महिलांमधील बेरोजगारीचा दर सातत्याने घटत आहे, जे दर्शवते की महिलांसाठी नवीन संधी निर्माण होत आहेत आणि सर्वसमावेशकता वाढत आहे.

**26.9**
लाख महिला
2024-25 मध्ये
ईपीएफओमध्ये
सामील झाल्या






**2011 च्या जनगणनेचा उपयोग प्रादेशिक मतदारसंघांची पुनर्रचना किंवा विभाजन आणि अनुसूचित जाती-जमातींच्या जागांच्या वाटपासाठी केला जाणार होता. सरकारने सुधारणा विधेयकाच्या उद्दिष्टांमध्ये याचाही समावेश केला होता.**

एक अशा योजना तयार केल्या आहेत आणि कार्यक्रम सुरू केले आहेत, ज्यामुळे महिलांना सन्मान, सुविधा, सुरक्षितता आणि समृद्धीचे जीवन जगता येते. त्यांच्या जीवनचक्राशी संबंधित प्रत्येक समस्येचे निराकरण करण्याकडे गंभीरतेने लक्ष दिले गेले आहे. केंद्र सरकारने सुरू केलेल्या सर्व कल्याणकारी योजना महिलांचे जीवन सुकर करणे, महिलांसाठी

> “आपल्या संविधानात वेळोवेळी मतदारसंघ पुनर्रचनेची तरतूद आहे आणि याच तरतुदीमुळे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींची संख्या वाढते. मतदारसंघ पुनर्रचनेला विरोध करणारे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठीच्या जागांच्या वाढीला विरोध करत आहेत.”
>
> **अमित शाह, केंद्रीय गृह मंत्री**

रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देणे आणि महिलांना सक्षम करण्यावर केंद्रित आहेत. 'बेटी बचाओ बेटी पढाओ अभियान' मुलींच्या जन्म, शिक्षण आणि सुरक्षिततेला प्रोत्साहन देत आहे. 'सुकन्या समृद्धी योजना' मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी सुरक्षित बचतीच्या संधी उपलब्ध करून देत आहे. 'प्रधानमंत्री उज्ज्वला योजना' स्वयंपाकघरे धूरमुक्त करून महिलांच्या आरोग्याचे रक्षण करत आहे. 'प्रधानमंत्री मुद्रा योजना' महिलांना आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर बनण्यास मदत करत आहे. 'मिशन शक्ती' अंतर्गत, महिलांची सुरक्षा आणि सक्षमीकरणाला नवीन आयाम मिळत आहेत.

विकासित भारत रोजगार आणि आजीविका मिशन (ग्रामीण) मध्ये महिला-केंद्रित अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. इतकेच नाही, तर पूर्वी महिलांच्या नावावर मालमत्ता असण्याची कोणतीही परंपरा नव्हती. परंतु जेव्हा पीएम आवास योजना सुरू झाली, तेव्हा त्यात असा नियम करण्यात आला की पीएम आवास योजनेअंतर्गत मिळणाऱ्या घरांच्या मालक महिला असतील. महिलांच्या आरोग्याच्या समस्यांकडेही लक्ष दिले गेले आहे; आयुष्मान भारत योजनेअंतर्गत कोट्यवधी महिलांना 5 लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळत आहेत. गर्भवती महिलांसाठी मातृ वंदना योजना चालवली जात आहे, ज्याअंतर्गत पैसे थेट महिलांच्या खात्यात जमा केले जातात, जेणेकरून त्या 9 महिन्यांच्या काळात तिला चांगले पोषण मिळू शकेल आणि आई आणि गर्भातील बाळ दोघेही निरोगी राहतील.

आज भारत महिला-नेतृत्वाखालील विकासाच्या दिशेने वेगाने प्रगती करत आहे. गेल्या दशकाहून अधिक काळात महिलांसमोरील अडथळ्यांवर मात करण्यासाठी एक भक्कम पाया घातला गेला आहे. भारताने शालेय शिक्षणात लैंगिक समानता साधली आहे. उच्च शिक्षणातही हे प्रमाण दृष्टीने मुलींची संख्या अधिक आहे. विज्ञान,

# आत्मनिर्भरता आणि सक्षमीकरण

*भारतात असे भविष्य घडवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत, जिथे सक्षम महिला आत्मनिर्भर बनून प्रगतीला चालना देतील, धोरणे घडवतील आणि पिढ्यांना प्रेरणा देतील...*

## पीएम मुद्रा योजना

**40.07** लाख कोटी रुपयांची 57.79 कोटींहून अधिक कर्जे दिली गेली 31 मार्च, 2026 पर्यंत

**16.33** लाख कोटी रुपयांची कर्जे महिलांना 31 मार्च, 2026 पर्यंत वितरित केली गेली

**67%** हून अधिक कर्जे महिला उद्योजकांना दिली गेली

## बेटी बचाओ-बेटी पढाओ



**19,500** हून अधिक गावे 'संपूर्ण सुकन्या ग्राम' म्हणून घोषित करण्यात आली

- मुलींच्या जन्मदरात तसेच शिक्षण आणि आरोग्य पातळीत लक्षणीय सुधारणा झाली आहे.
- बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ: योजना लागू झाल्यापासून 10 वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या शिक्षित मुलींची संख्या 15 टक्क्यांनी वाढली आहे. जवळपास 95% संस्थात्मक प्रसूती झाल्या.
- सुकन्या समृद्धि योजना: 3.40 लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम सुमारे 4.61 कोटी सुकन्या खात्यांमध्ये 28 फेब्रुवारी, 2026 पर्यंत जमा झाली. दरवर्षी 8.2 टक्के व्याज मिळते.

## स्टार्टअप



**₹3100** कोटींहून अधिक गुंतवणूक गेल्या 6 वर्षांत सरकारने महिलांच्या नेतृत्वाखालील स्टार्टअप्समध्ये केली आहे.

- 1.02 लाख म्हणजेच जवळपास 48% स्टार्टअप्समध्ये किमान एक महिला संचालक किंवा भागीदार आहे.

**2.12** लाख स्टार्टअप्सना 31 जानेवारी, 2026 पर्यंत मान्यता देण्यात आली.

**75%** च्या आसपास कर्जे महिला उद्योजकांसाठी मंजूर करण्यात आली.

## स्टैंड-अप इंडिया

- या योजनेअंतर्गत, डिसेंबर 2025 पर्यंत महिलांना 48,000 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची 2.05 लाख कर्जे वितरित करण्यात आली. या योजनेअंतर्गत एकूण 62,790 कोटी रुपयांची 2.75 लाख कर्जे वितरित करण्यात आली.
- महिला उद्योजकांना 10 लाख ते 1 कोटी रुपयांपर्यंतची कर्जे दिली जातात.

## उद्योजकतेतील वाढता सहभाग

**7.83** कोटी नोंदणीकृत एमएसएमईमधील 3.07 कोटी एमएसएमई महिलांच्या नेतृत्वाखाली आहेत, 28 फेब्रुवारी, 2026 पर्यंत

- 2 लाख महिला नेतृत्वाखालील एमएसएमईंनी जेमच्या माध्यमातून 80,000 कोटींहून अधिकच्या ऑर्डर प्राप्त केल्या आहेत.
- आज महिला मोठे व्यवसाय उभारत आहेत. स्वयं सहायता गट - महिलांना उत्पन्नवाढीसोबतच उद्योजिकाही बनवत आहेत.






## लखपती दीदी योजना

**51,852** बँक सखी स्वयंसहायता गटांना कर्जपुरवठा सुलभ करण्यासाठी तैनात करण्यात आल्या आहेत.

- सरकारने मार्च 2027 च्या अंतिम मुदतीच्या एक वर्ष आधीच 3 कोटी लखपती दीदींचा महत्त्वपूर्ण टप्पा ओलांडला आहे.
- आता महिला आर्थिक विकासातील सशक्त भागीदार आहेत. ही योजना महिलांच्या आर्थिक सहभागासाठी एक नवीन शक्ती आहे.
- स्वयं-सहायता गटांच्या माध्यमातून महिलांचे उत्पन्न वाढवून त्यांना आत्मनिर्भर बनविले जात आहे.
- भारतात अंदाजे 12 कोटी स्वयं सहायता गट आहेत, त्यापैकी 88% पूर्णपणे महिलांचे बचत गट आहेत.
- डिसेंबर 2025 पर्यंत डीएवाय-एबीआरएलएम अंतर्गत 90.91 लाख बचत गटांमध्ये 10.05 कोटींहून अधिक महिला सहभागी.
- 11.86 लाख कोटी रुपये या स्वयं सहायता गटांना कर्ज उपलब्ध करून देण्यात आली.
- महिला बचत गटांना हमीयुक्त कर्ज देण्याची मर्यादा 10 लाख रुपयांवरून 20 लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे.
- मार्च 2029 पर्यंत 6 कोटी लखपती दीदींचे एक नवीन आणि महत्त्वाकांक्षी लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे, ज्यामुळे या उपक्रमाचे ध्येय आणि आकांक्षा दोन्ही दुप्पट झाल्या आहेत.

## पीएम उज्ज्वला

आता पर्यंत जवळजवळ **11** कोटी मोफत एलपीजी जोडण्या दिल्या गेल्या. धुराने भरलेल्या स्वयंपाकघरांच्या समस्या मागे सोडून दैनंदिन संघर्षामधून सुटका करण्यात आली.



- यामुळे महिलांना उत्तम आरोग्य तसेच दररोज सुमारे 3 तासांचा अतिरिक्त वेळेचा लाभ होऊन त्यांचे जीवन अधिक सुलभ झाले आहे.

## पीएम आवास



**3** कोटी घरांचे बांधकाम प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत 9 एप्रिल 2026 पर्यंत पूर्ण

- पीएम आवास योजना ग्रामीण मध्ये 72 टक्के घरे महिलांच्या एकल किंवा संयुक्त मालकीची, ज्यांनी त्यांच्यासाठी सुरक्षित घरांबरोबरच आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणाचा मजबूत पाया घातला आहे.
- आता घराच्या मालकीमध्ये महिलांची मजबूत भागीदारी आहे.
- 2 मार्च 2026 पर्यंत प्रधानमंत्री आवास योजना शहरी अंतर्गत वितरित केलेल्या 97.3 लाख घरांपैकी 6 लाख घरे महिलांच्या नावावर आहेत किंवा कुटुंबातील पुरुष सदस्यासोबत संयुक्त मालकीची आहेत.

## जनधनमुळे आर्थिक आत्मनिर्भरता

**57.99** कोटी खाती उघडली आहेत 1 एप्रिल, 2026 पर्यंत

**32.33** कोटी हून अधिक जनधन खात्यांमुळे महिला औपचारिक बँकिंगशी जोडल्या जात आहेत.



**56%** बँक खाती महिलांच्या नावावर आहेत आणि त्या आता बँकिंगच्या नायिका आहेत.

- आता बँकिंगची शक्ती महिलांच्या हातात आहे.
- संयुक्त राष्ट्रांनीही घोषित केले आहे की भारताचे मॉडेल जगासाठी एक प्रेरणा आहे. हा महिला आणि मुलींच्या आर्थिक सक्षमीकरणाचा नवीन मार्ग आहे.

## स्वच्छ भारत मिशन

**12** कोटींहून अधिक शौचालयांच्या बांधकामाने महिलांसाठी सुरक्षा, स्वच्छता और प्रतिष्ठा सुनिश्चित केली आहे.

- यामुळे सन्मान आणि प्रतिष्ठेची नवी सुरुवात झाली आहे. उघड्यावर शौचास जाण्याचा नाईलाज आता भूतकाळातील गोष्ट झाली आहे.



नवीन भारत आणि
महिला नेतृत्व
मुखपृष्ठ कथा



# निरोगी महिला सुरक्षेचा पाया

*कोणत्याही समाजाच्या सर्वांगीण आरोग्यासाठी आणि समृद्ध राष्ट्रासाठी मातांचे आरोग्य अत्यंत महत्त्वपूर्ण असते. महिला निरोगी असल्या की त्याचा थेट परिणाम कुटुंबांच्या आणि समाजाच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आर्थिक विकासावर होतो. या दिशेने नवीन भारत निरोगी मातृत्वाच्या माध्यमातून करत आहे एका निरोगी राष्ट्राची उभारणी...*

## पोषण

- 9 ते 23 एप्रिल 2025 दरम्यान पोषण पंधरवड्याच्या 8 व्या भागाचे आयोजन
- पोषण पंधरवडा 2026 ची संकल्पना 'आयुष्याच्या पहिल्या सहा वर्षांत मेंदूचा विकास जास्तीत जास्त करणे' ही होती.
- उत्तम पोषण परिणामांसाठी आता पोषण 2.0 सुरू करण्यात आले आहे.
- गेल्या 4 वर्षांत 11 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीचे वाटप करण्यात आले.
- **पोषण:** मोहिमेअंतर्गत 10.09 कोटी लाभार्थी. रिअल-टाइम देखरेख सुनिश्चित करण्यासाठी पोषण ट्रॅकर सुरू करण्यात आला आहे. 100% रिफाइंड तांदळाचे वितरण झाले आहे सुरू.

## प्रधानमंत्री मातृ वंदना योजना

**4.78** कोटी लाभार्थ्यांची नोंदणी

**4.26** कोटी लाभार्थ्यांना मिळाला लाभ

**₹20,073** कोटी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात आले

- 5,000 रुपयांची रक्कम लाभार्थ्यांना पहिल्या जिवंत अपत्यासाठी दोन हप्त्यांत दिली जाते.
- 6,000 रुपयांची रक्कम दुसरे अपत्य मुलगी असल्यास लाभार्थ्याला एकरकमी रक्कम दिली जाते.



## सॅनिटरी पॅड

**15** हजारहून अधिक पीएमबीजेपी केंद्रांवर 1 रूपयाला सॅनिटरी पॅडची विक्री

- 72 कोटी रुपयांच्या सॅनिटरी पॅडची विक्री 31 जानेवारी 2025 पर्यंत झाली आहे.

## गर्भपाताची मुदत

हिंसाचाराच्या बळी ठरलेल्या महिलांना दिलासा देण्यासाठी सरकारने अलीकडेच वैद्यकीय गर्भपात कायद्याला मंजुरी दिली आहे, ज्यात गर्भपाताची मुदत 20 आठवड्यांवरून 24 आठवड्यांपर्यंत वाढवण्यात आली आहे.

**1976 मध्ये देशाची लोकसंख्या 54.79 कोटी होती आणि आज 140 कोटी आहे. सभागृहाच्या सदस्यांची संख्या वाढत असताना, सभागृहाच्या कामकाजाचे दिवस वाढवणे ही सरकारची जबाबदारी आहे.**

तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित स्टेम शिक्षणामध्ये महिलांचा सहभाग झपाट्याने वाढत आहे. केंद्रीय अर्थसंकल्प 2026-27 मध्ये प्रत्येक जिल्ह्यात महिला वसतिगृह स्थापन करण्याची तरतूद आहे. ज्ञान अर्थव्यवस्थेतील नेतृत्वाच्या भूमिकांसाठी मुलींना तयार केले जात आहे. कार्यबलामध्ये महिलांचा सहभाग वाढत आहे. आज जेव्हा एखादी ग्रामीण महिला शेतांवरून ड्रोन उडवते, तेव्हा ती केवळ पिकांवर फवारणी करत नाही; तर ती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेत परिवर्तनही घडवत असते. जेव्हा एखादी महिला आपल्या उद्योजकतेच्या प्रयत्नांतून करोडपती बनते, तेव्हा ती तिच्या सभोवतालच्या अनेक महिलांसाठी प्रेरणास्रोत बनते. अशा सकारात्मक बदलांमध्ये शिक्षण, कौशल्य विकास, उद्योजकता आणि संरचनात्मक सुधारणा महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. 'स्किल इंडिया मिशन' महिलांना अपारंपरिक क्षेत्रांतील कौशल्यांनी सुसज्ज करत आहे. महिला नियोक्त्यांच्या भूमिकेतही पुढे येत आहेत. देशातील निम्म्याहून अधिक मान्यताप्राप्त स्टार्टअप्समध्ये किमान एक महिला संचालक आहे. सध्या जेम

## प्रसूतिपूर्व काळजी - सुरक्षित मातृत्वाच्या दिशेने पहिले पाऊल

- गर्भवती महिलांसाठी मोफत, विश्वसनीय, सर्वसमावेशक आणि दर्जेदार प्रसूतिपूर्व काळजी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने 2016 मध्ये 'प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान' (पीएमएसएमए) सुरू केले.
- 7 कोटींहून अधिक महिलांना मार्च 2026 पर्यंत या उपक्रमाचा लाभ मिळाला आहे.
- 22,000 हून अधिक आरोग्य केंद्रांवर प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानांतर्गत सेवा दिली जात आहे.

## जल जीवन मिशन



**15.84** कोटी (81.84%) घरांमध्ये मिळू लागले नळाने पाणी, 20 एप्रिल 2026 पर्यंत

- जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अभ्यासानुसार, प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला नळाचे पाणी उपलब्ध करून दिल्यास, पाणी वाहतुकीवर खर्च होणाऱ्या वेळेत लक्षणीय बचत होईल (दररोज 5.5 कोटी तास), विशेषतः महिलांच्या वेळेची कारण या कामाचा तीन-चतुर्थांश भाग त्याच करतात.
- एसबीआयच्या अभ्यासानुसार, घरांमध्ये बाहेरून पाणी आणणाऱ्या कुटुंबांच्या संख्येत 8.3 टक्क्यांची घट झाली आहे. जवळपास 9 कोटी महिलांना आता पाणी आणण्याची गरज उरली नाही. 7.4 टक्के महिलांचा सहभाग कृषी आणि संबंधित कामांमध्ये वाढला आहे.

## जन्माच्या वेळेस लिंग प्रमाण

(प्रति 1000 मुली)



**918** 2014-15

**929** 2024-25

## लसीकरण: माता आणि नवजात बालकांची सुरक्षा

- 2014 मध्ये मिशन इंद्रधनुष सुरू करण्यात आले.
- गर्भवती महिलांसह सर्वांसाठी सार्वत्रिक लसीकरण सुनिश्चित करणे, हा याचा उद्देश आहे.

**1.15** कोटी 14 वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या मुलींसाठी 28 फेब्रुवारी 2026 रोजी राजस्थानच्या अजमेर येथून देशव्यापी मोफत एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू करण्यात आली.

- देशातील महिलांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध करणे, हा यामागील उद्देश आहे.



वर दोन लाखांहून अधिक महिलांच्या मालकीचे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग सक्रिय आहेत. बचत गट आणि ग्रामीण महिलांनी बनवलेल्या उत्पादनांना उत्तम बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्प 2026-27 मध्ये 'शी-मार्ट' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत प्रत्येक जिल्ह्यात समुदाय-संचालित किरकोळ विक्री केंद्रे स्थापन केली जातील. गेल्या वर्षी लागू करण्यात आलेल्या कामगार कायद्यांमुळे महिला कामगारांसाठी अधिक समावेशक, सुरक्षित आणि सक्षमीकरण करणारे कामाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### सामाजिक न्याय आणि सुरक्षित वातावरण

जेव्हा महिला सुरक्षित आणि समृद्ध असतात, तेव्हा जग समृद्ध होते. त्यांचे आर्थिक सक्षमीकरण विकासाला चालना देते. शिक्षणापर्यंतची त्यांची झेप जागतिक प्रगतीला गती देते. त्यांचे नेतृत्व सर्वसमावेशकतेला प्रोत्साहन देते आणि त्यांच्या कल्पना सकारात्मक बदलासाठी प्रेरणा देतात. महिलांना सक्षम करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे महिला-नेतृत्वाखालील विकास दृष्टिकोन होय. भारताने या दिशेने निर्णायक पावले उचलली आहेत. भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू एक प्रेरणादायी उदाहरण आहेत. त्या एका सामान्य आदिवासी पार्श्वभूमीतून आल्या आहेत, तरीही आज त्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे नेतृत्व करत आहेत. जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या मोठ्या संरक्षण दलांच्या कमांडर-इन-चीफ या रूपात योगदान देणाऱ्या महिलांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी,

नवीन भारत आणि
महिला नेतृत्व
मुखपृष्ठ कथा


# नेतृत्व आणि सन्मान

*जेव्हा दोन महिला अधिकारी, कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी 'ऑपरेशन सिंदूर'बद्दल देशाला माहिती दिली, तेव्हा तो केवळ मोहिमेचा आढावा नव्हता; तो बदलत्या भारताच्या चैतन्याचे प्रतिबिंब दाखवणारा एक क्षण होता. तो एक असा क्षण होता ज्याने संपूर्ण देशाला प्रेरणा दिली आणि महिला शक्तीचा वाढता प्रभाव स्पष्टपणे दाखवून दिला.*

## सैन्य दले- सैनिकी शाळांमध्ये आता मुलींसाठीही प्रवेश

- 2002 पासून राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) मध्ये महिला कॅडेट्सची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.
- महिला आता भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलामध्ये कायमस्वरूपी कमिशनसाठी पात्र आहेत.
- गेल्या 10 वर्षांत भारतीय लष्करातील महिला अधिकाऱ्यांची संख्या 4 पटीने वाढली आहे.

**भारतीय लष्करातील महिलांची संख्या**






*महिला शक्ती भारतीय लष्कराला बळकट करत आहे.*

- महिला अधिकारी आता लेफ्टनंट जनरल, फायटर पायलट आणि यूनिट कमांडर यांसारखी महत्त्वाची नेतृत्व पदे भूषवत आहेत.
- महिलांना 12 विभाग आणि सेवांमध्ये स्थायी कमिशन ( पर्मनंट कमिशन) दिले जात आहे.
- राष्ट्रीय संरक्षण कॅडेट्सच्या (एनडीसी) समावेशनात प्रगती झाली आहे. मे 2025 मध्ये 17 महिला कॅडेट्स पदवीधर झाल्या आणि फेब्रुवारी 2025 मध्ये 15 महिला कॅडेट्स पदवीधर झाल्या.
- प्रथमच ,75 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त तिन्ही सेवांमधील संपूर्ण महिला तुकडीने संचलन केले. इतकेच नव्हे तर 'शांतता स्थापना मोहिमे'अंतर्गत 2007 ते 2016 या काळात संयुक्त राष्ट्रांच्या लायबेरियातील मोहिमेमध्ये (उन्मिल) संपूर्ण महिला पोलीस युनिट तैनात करणारा भारत हा जगातील पहिला देश असल्याचा भारताला अभिमान आहे.
- संयुक्त राष्ट्रांच्या लिंगभाव समानता धोरणानुसार, 2008 पर्यंत लष्करी तुकड्यांमध्ये 15% महिला आणि स्टाफ ऑफिसर किंवा पर्यवेक्षक पदांवर 25% महिला असाव्यात, या उद्दिष्टाच्या अनुषंगाने भारताने स्टाफ ऑफिसर आणि पर्यवेक्षक या श्रेणींमध्ये आधीच 22% प्रतिनिधित्व मिळवले आहे.




**154** हून अधिक महिला 2025 पर्यंत सहा संयुक्त राष्ट्र शांती रक्षा मोहिमांमध्ये कार्यरत



26 जानेवारी 2026 रोजी गणतंत्र दिवसाच्या संचलनात सहायक कमांडंट सिमरन बाला हिने पुरुष सीआरपीएफ तुकडीचे नेतृत्व करून इतिहास रचला. पहिल्यांदाच एका महिला अधिकाऱ्याने सीआरपीएफच्या पुरुष तुकडीचे नेतृत्व केले.

**महिला पायलट**




भारत या क्षेत्रात आयर्लंड (9.9%) आणि अमेरिका (5.5%) पेक्षा पुढे आहे.



## विज्ञान - तंत्रज्ञान



**12.5** लाख महिला विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कार्यबल म्हणून दरवर्षी जोडल्या जात आहेत.

- इस्रोच्या आदित्य एल-1 आणि चांद्रयान 3 सारख्या महत्त्वाच्या मोहिमांमध्ये महिलांची महत्त्वपूर्ण भूमिका
- भारतात स्टेम पदवीधरांमध्ये 43 टक्के महिला आहेत, हे प्रमाण जगातील सर्वाधिक टक्केवारीपैकी एक आहे.
- आज शासकीय आणि खाजगी क्षेत्र मिळून स्टेम-संबंधित क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण अंदाजे 18.6 टक्के आहे. अधिकाधिक महिला संशोधन, नवोपक्रम आणि उच्च-तंत्रज्ञान भूमिकांमध्ये प्रवेश करत असल्यामुळे हे प्रमाण सातत्याने वाढत आहे.
- अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण अहवाल 2021-22 नुसार, विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान शाखांमधील एकूण प्रवेशांमध्ये महिलांचे प्रमाण आता 41% आहे, जे विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील महिलांचा वाढता सहभाग आणि सक्रियता दर्शवते.
- अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण 2021-22 नुसार, देशातील उच्च शिक्षण स्तरावर विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (स्टेम) विषयांमध्ये प्रवेश घेणाऱ्यांमध्ये महिलांचे एकूण प्रमाण 13% आहे.
- संशोधन आणि विकास सांख्यिकी अहवाल, 2003 नुसार, देशातील संशोधन आणि विकास कार्यात स्टेम व्यावसायिक म्हणून कार्यरत असलेल्या एकूण मनुष्यबळात महिलांचे प्रमाण 18.6% आहे.
- भारताच्या आदित्य-एल मोहिमेचे नेतृत्व एक महिला करत आहे, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद (सीएस आय आर) आणि तिच्या 196 प्रयोगशाळांचे प्रमुखपद महिलांकडे आहे, तसेच चांद्रयान 3 मोहिमेतही एका महिलेने नेतृत्वाची भूमिका बजावली होती.
- संशोधन आणि नवोन्मेषामध्ये महिला संशोधक दरवर्षी 5,000 हून अधिक पेटंट दाखल करत आहेत, तर काही काळापूर्वी हा आकडा 100 पेक्षा कमी होता.

**25%**
**सेमीकंडक्टर क्षेत्रातील एकूण मनुष्यबळात महिलांची भागीदारी**



"अनेक अभ्यासांमधून असे दिसून आले आहे की निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांचा वाढलेला सहभाग हा यंत्रणांमधील अधिक संवेदनशीलतेस कारणीभूत ठरतो. ही एक प्रचंड मोठी ताकद असून याचा परिणाम म्हणजे पाणी, शिक्षण, आरोग्य आणि पोषण यांसारख्या विषयांवर अधिक समर्पण, अधिक संवेदनशीलता आणि अधिक उत्पादक कार्य दिसून येते."

***नरेंद्र मोदी, पंतप्रधान***

त्यांना सुरक्षित वातावरण आणि जगात समान सहभाग मिळवून देण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर अनेक प्रयत्न करण्यात आले आहेत. आज महिलांचे जीवनमान सुधारणे आणि भारताच्या विकास प्रवासात त्यांचा पूर्ण सहभाग सुनिश्चित करणे याला देशाचे प्राधान्य आहे. केंद्र सरकार मुलींच्या विवाहाचे वय 21 पर्यंत वाढवून त्यांना समान वागणूक देण्याचा विचार करत आहे. आज, देशात महिलांवरील गुन्ह्यांविरुद्ध कठोर कायदे आहेत ज्यात बलात्कारासारख्या घृणास्पद गुन्ह्यांसाठी मृत्युदंडाच्या शिक्षेचा समावेश आहे. देशभरात मोठ्या संख्येने जलदगती न्यायालये स्थापन केली जात आहेत आणि कायद्याची कठोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी यंत्रणा सुधारली जात आहे. पोलीस ठाण्यांमध्ये महिला सहाय्यता कक्षांची संख्या वाढवणे, 24-तास हेल्पलाईन आणि सायबर गुन्हेगारीचा सामना करण्यासाठी एक पोर्टल, ही सर्व पावले महिलांची सुरक्षा सुनिश्चित करत आहेत. सध्याचे केंद्र सरकार महिलांवरील गुन्ह्यांबाबत 'शून्य सहनशीलता' धोरणाचा पाठपुरावा करत आहे.

केंद्र सरकारने केवळ कायदेशीर संरक्षणासाठीच नव्हे, तर महिलांच्या आत्मसन्मानासाठीही एक मोहीम सुरू केली आहे. केंद्र सरकारच्या बहुतेक योजना कुटुंबातील महिलांना कागदपत्रे उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित करतात. याशिवाय, जम्मू आणि काश्मीरमध्ये, जर महिलांनी गैर-काश्मिरी पुरुषाशी लग्न केले, तर त्यांना आणि त्यांच्या मुलांना पूर्वी वडिलोपार्जित मालमत्तेच्या हक्कांपासून वंचित ठेवले जात असे. तथापि, 370 आणि 35 अ रद्द केल्यानंतर या क्षेत्रातील महिलांना त्यांचा



# उच्च शिक्षणापर्यंत महिला शक्तीची पोहोच

*उच्च शिक्षणापर्यंत महिला शक्तीची पोहोच जागतिक प्रगतीला प्रेरित करत आहे. त्यांचे नेतृत्व समावेशकतेला चालना देणारे आहे आणि त्यांचे विचार सकारात्मक बदलाला प्रेरित करत आहेत. गेल्या 12 वर्षांत समावेशक दृष्टीकोनातून पुढाकार घेण्यात आले आहेत...*

**उच्च शिक्षणामध्ये महिलांचे ढोबळ नोंदणी गुणोत्तर (जीईआर)**

**22.9%** 2014-15

**30.2%** 2022-23



## पीएचडी मधील महिला संशोधक

**64,724**

झाली महिला संशोधकांची संख्या, 2014 नंतर

- नोंदणीमध्ये 135.6% ची असाधारण वाढ (2014-15 ते 2022-23 पर्यंत)

## एआयसीटीई

**35,998**

मुलींपर्यंत एआयसीटीई 'प्रगती' शिष्यवृत्ती योजना पोहोचली 2024-25 मध्ये.

## पदव्युत्तर अभ्यासासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती

- केंद्र सरकारकडून या योजनेची सुरुवात आर्थिक वर्ष 2023-24 मध्ये करण्यात आली.
- 30% जागा मुलींसाठी आरक्षित.



## महिलांसाठी वरदान

- 72 लाखांपेक्षा जास्त महिला पंतप्रधान कौशल्य विकास योजनेद्वारे आतापर्यंत झाल्या प्रशिक्षित.

**45%** महिला आहेत संपूर्ण भारतातील एकूण प्रशिक्षित उमेदवारांमध्ये

## विज्ञान ज्योती योजना

**300** जिल्ह्यांमध्ये 80,000 पेक्षा जास्त गुणवंत मुलींना 'विज्ञान ज्योती' योजनेचा लाभ मिळाला.

अधिकार मिळाला आहे. अनिवासी भारतीयांकडून (NRIs) विवाह करून नंतर सोडून देण्यासारख्या प्रकरणांमध्येही कायदा अधिक कडक करण्यात आला आहे. सामाजिक स्तरावर देखील 'तीन तलाक' सारख्या ज्या अनिष्ट प्रथांमुळे महिलांवर अत्याचार होत होते, त्यांना कायदा करून रोखण्यात आले आहे. आज कोट्यवधी मुस्लिम महिलांना तीन तलाकच्या अमानवीय कुप्रथेपासून सुरक्षा मिळाली आहे. हा कायदा लागू झाल्यापासून अवघ्या काही वर्षांतच तीन तलाकच्या प्रकरणांमध्ये 80-82 टक्क्यांची घट झाली आहे.

भारतातील महिला आज स्वतंत्र आहेत, आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत, दृढ संकल्पाने सज्ज आहेत, त्यांच्यात सुरक्षेची भावना आहे आणि त्या केवळ स्वप्ने पाहत नाहीत, तर ती साकारही करत आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील दृढनिश्चयी सरकारचे प्रयत्न. त्यामुळे दशकांपासून चालत आलेल्या, मुलीला किंवा महिलेला दुय्यम मानण्याच्या मानसिकतेत क्रांतिकारी बदल झाला आहे.

सर्वसमावेशक दृष्टिकोनातून महिला शक्तीला मध्यवर्ती भूमिकेत आणण्यासाठी केंद्र सरकारने केलेल्या अथक प्रयत्नांचाच हा परिणाम आहे ज्यामुळे आज कर्तव्यपथावर प्रजासत्ताक दिन संचलनाचे नेतृत्व असो किंवा सर्वात आधुनिक लढाऊ विमान राफेल उडवणे असो किंवा सीमेवर शत्रूंचा सामना करणे असो किंवा क्रीडा क्षेत्रात देशाचे नाव उज्ज्वल करणे असो किंवा स्वयंरोजगाराच्या संधींचा लाभ घेऊन बरोबरीने देशाच्या आर्थिक प्रगतीला बळ देणे असो, महिला शक्ती पुरुषांच्या खांद्याला खांदा लावूनच नाही, तर त्यांच्याही पुढे जाऊन राष्ट्राचा अभिमान ठरत आहे.


# कृषी क्षेत्रातील महिला शक्ती

*भारतासारख्या कृषीप्रधान देशात ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मोठा भाग महिलांचे श्रम, कौशल्य आणि समर्पणावर आधारित आहे. शेतातील पेरणी, खुरपणी-निंदणी, कापणी, पशुपालन, बियाणे संरक्षण आणि अन्न प्रक्रिया यांसारख्या अनेक कामांमध्ये महिलांची सक्रिय भूमिका असते. म्हणूनच, तांत्रिक प्रशिक्षणाद्वारे महिलांचा विशेष गट तयार होत आहे आणि उत्पन्नाच्या नवीन संधी खुल्या होत आहेत.*



## संधीच संधी

- शेतातील पिकांचे काम असो किंवा पशुपालन, आज गावाच्या सुकन्यांसाठी संधीच संधी उपलब्ध आहेत.
- गावांमध्ये 'नमो ड्रोन दीदी' खते आणि कीटकनाशकांच्या फवारणीच्या आधुनिक पद्धतींचे नेतृत्व करत आहेत.
- 70,000 कृषी सख्या नैसर्गिक शेतीच्या संदर्भात शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी सज्ज आहेत.



**1,094** ड्रोन महिला स्वयंसाहाय्यता गटांना वितरित करण्यात आले, ज्यामध्ये 'नमो ड्रोन दीदी' उपक्रमांतर्गत 500 ड्रोनचे वाटप करण्यात आले.



## कृषी क्षेत्रात महिला शक्ती

**11.61** लाख महिला शेतकऱ्यांना फेब्रुवारी 26 पर्यंत कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्था (ATMA) योजनेअंतर्गत प्रशिक्षण देण्यात आले.

**2,377** कोटी रुपयांचे पाठबळ महिलांच्या नेतृत्वाखालील 8,190 प्रकल्पांना, कृषी पायाभूत सुविधा निधी (AIF) द्वारे 28 फेब्रुवारी 2025 पर्यंत, देण्यात आले आहे.

## FPOs योजना

- **10,000 FPOs योजने अंतर्गत (फेब्रुवारी 2026 पर्यंत) प्रत्येक FPO च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्स मध्ये किमान एक एक महिला सदस्य.**
- 1,175 **FPOs** मध्ये 100% महिला शेअरधारक आणि 1,084 **FPOs** मध्ये 50% पासून 99% महिला सदस्य.

**₹1.01 लाख कोटी** पेक्षा जास्त **PM-KISAN** योजनेच्या प्रारंभापासून आतापर्यंत महिला लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले आहेत.

**15,000** ड्रोन, महिला स्वयं सहायता समूहांना एकूण 1,261 कोटी रुपयांच्या तरतुदीने नमो ड्रोन दीदी योजने अंतर्गत देण्याची तरतूद.

त्या राष्ट्राचा अभिमान बनत आहेत. महिलांनी आपल्या अद्भुत क्षमतेने हे सिद्ध करून दाखवले आहे की, जर त्यांना समान संधी मिळाल्या तर त्या केवळ घरच नाही, तर एका समृद्ध आणि गौरवशाली राष्ट्राचीही निर्मिती करू शकतात.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालानुसार, पुरुषांच्या बरोबरीने महिलांचा कार्यबलातील सहभाग वाढल्यास भारताच्या जीडीपीमध्ये 27 टक्के वाढ होऊ शकते. जर 50 टक्के कुशल महिला कार्यबलात सामील झाल्या, तर विकास दर 1.5 टक्क्यांनी वाढून दरवर्षी 9 टक्के होऊ शकतो. नव्या भारतात महिलांना श्रमशक्तीमध्ये सामील करून घेण्याची गरज ओळखूनच, केंद्र सरकार त्यांना सातत्याने समान संधी आणि सुरक्षित वातावरण देण्यासाठी नवीन संकल्पांसह नवनवीन उपक्रम राबवत आहे. जेव्हा कोणत्याही संकल्पाला साधनेची जोड मिळते आणि मानवाप्रति ममत्व निर्माण होते, तेव्हा एका नवीन कालखंडाचा जन्म होतो, एक नवी पहाट होते. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' हाच अमृतभाव आज अमृत काळात नव्या भारतासाठी ओसंडून वाहत आहे.

याच कारणामुळे आज भारतात सुमारे एक चतुर्थांश महिला अंतराळ वैज्ञानिक आहेत. चंद्रयान, गगनयान आणि मिशन मंगळ यांसारख्या प्रमुख कार्यक्रमांच्या यशामागे महिला वैज्ञानिकांची प्रतिभा आणि कठोर परिश्रम आहेत. नागरी विमान वाहतूक क्षेत्रात महिला वैमानिकांच्या संख्येच्या बाबतीत भारत जगात सर्वाधिक


नवीन भारत आणि
महिला नेतृत्व
मुखपृष्ठ कथा

# क्रीडा जगतात उत्कृष्ट कामगिरी

*जेव्हा भारताच्या कन्यांनी महिला क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच विश्वचषक आपल्या नावावर केला, तेव्हा या झुंजार लेकींचे तोंड पंतप्रधान मोदींनी गोड केले. हे या गोष्टीचे प्रतीक आहे की, नवा भारत नारी शक्तीला सर्व क्षेत्रांत नेतृत्व देत आहे आणि भारताच्या महिला खेळाडू देशाच्या क्रीडा इतिहासात एक नवीन अध्याय लिहित आहेत...*



### ऑलिंपिकमध्ये महिला खेळाडूंची कामगिरी




- 2008 मध्ये सहभागी खेळाडूंची संख्या 25 होती, जी 2012 मध्ये 23 झाली होती.
- 2024 च्या पॅरिस ऑलिंपिकमध्ये 47 महिलांनी भाग घेतला

### खेलो इंडिया



**9.5** कोटी रुपये 'खेलो इंडिया-स्पोर्ट्स फॉर विमेन' योजने अंतर्गत आतापर्यंत जारी केले.

- योजने अंतर्गत 21 खेळांमध्ये 575 स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.
- 60,000 पेक्षा जास्त महिला खेळाडूंनी फेब्रुवारी 2024 पर्यंत भाग घेतला.

**आयसीसी महिला विश्वचषक 2025 जिंकून भारतीय संघाने इतिहास घडवला.**

### महिला खेळाडूंनी मिळवून दिली पदकं

**23** 

पदके महिला खेळाडूंनी मिळवून दिली, 2022 च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये भारताच्या एकूण 61 पदकांपैकी.

- 2023 आशियायी पॅरा क्रीडा स्पर्धांमध्ये 111 पैकी 40 पदकं जिंकून महिला खेळाडूंनी घडवला इतिहास
- पॅरिस 2024 ऑलिंपिकमध्ये 6 पैकी 2 पदकं आणि पॅरालिंपिकमध्ये 29 पैकी 11 पदके जिंकून चमक दाखवली.

### रचला इतिहास

- अवनी लेखरा 2024 च्या पॅरालिंपिक स्पर्धांमध्ये दोन सुवर्ण पदकं जिंकणारी पहिली भारतीय महिला बनली.
- वर्ष 2025 मध्ये भारतीय दृष्टिबाधित महिला क्रिकेट संघाने पहिला दृष्टिबाधित महिला T20 विश्वचषक जिंकून इतिहास रचला.
- टोक्यो ऑलिम्पिक-2020 मध्ये बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधूने इतिहास रचला. बॅडमिंटनच्या इतिहासात भारतासाठी दोन पदके जिंकणारी ती पहिली बॅडमिंटनपटू ठरली, तसेच वैयक्तिक खेळात अशी कामगिरी करणारी ती पहिली महिला ॲथलीटही ठरली.
- पॅरिस ऑलिम्पिक 2024 मध्ये दोन कांस्य पदके जिंकून इतिहास रचणारी मनू भाकर भारताची पहिली महिला नेमबाज ठरली.

टक्केवारी असलेल्या देशांमध्ये सहभागी आहे. तसेच, भारतीय हवाई दलात महिला पायलट आता लढाऊ विमानांचे उड्डाण करत आहेत. सर्व सशस्त्र दलांमध्ये महिला अधिकाऱ्यांना ऑपरेशनल भूमिकांमध्ये आणि लढाऊ आघाड्यांवर तैनात केले जात आहे.

गेल्या 10 वर्षांत भारतीय सैन्यदलातील महिला अधिकाऱ्यांची संख्या जवळपास 4 पटीने वाढून 3,000 वरून 11,000 पेक्षा जास्त झाली आहे. आज महिला फायटर पायलट, लेफ्टिनेंट जनरल आणि युनिट कमांडर यांसारख्या महत्त्वाच्या नेतृत्व पदांवर देशाची सेवा करत आहेत. सैनिकी शाळा आणि नॅशनल डिफेन्स अकादमी (NDA) चे दरवाजे मुलींसाठी खुले झाल्यामुळे बदलाची एक लाट आली आणि अनेक मुलींना संरक्षण क्षेत्रात येण्याची संधी मिळाली आहे.

### ...जेव्हा महिला सक्षमीकरण बनला संकल्प

नारी शक्ती वंदन अधिनियम भारताच्या विकासामध्ये महिला शक्तीची भूमिका निर्धारित करेल. वर्ष 2047 पर्यंतच्या अमृत काळात विकसित भारताच्या निर्मितीमध्ये हा एक मैलाचा दगड ठरेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाचा विचार संपूर्ण जगासमोर मांडला. G-20 चे अध्यक्षपद भूषवताना भारताने जगाला याची जाणीव करून दिली की, मातृशक्ती आणि कन्या केवळ धोरणांमध्ये सहभाग घेऊ शकत नाहीत, तर धोरण निश्चितीमध्येही स्वतःचे स्थान सुरक्षित करण्यास सक्षम आहेत. याचे कारण हे आहे की, वर्तमान केंद्र सरकारसाठी महिला सक्षमीकरण हा केवळ राजकीय मुद्दा नसून एक संकल्प आहे. याचे एक उदाहरण हे देखील आहे की पंतप्रधान मोदी जेव्हा

## वुमनिया उपक्रम ...
# महिला उद्योजकांना बाजारपेठेत सुलभ प्रवेश

- वुमनिया' हा समावेशकतेवर लक्ष केंद्रित करणारा एक उपक्रम आहे. महिलांच्या नेतृत्वाखालील सूक्ष्म आणि लघु उद्योगांना (एमएसई) उद्योग पडताळणी आणि आवश्यक कागदपत्रांच्या आधारे एका डिजिटल प्रक्रियेद्वारे प्लॅटफॉर्मशी जोडले जाते.
- तो महिला उद्योजक आणि स्वयंसाहाय्यता गटांना जेम पोर्टलच्या माध्यमातून आपली उत्पादने थेट सरकारी खरेदीदारांना विकण्यास सक्षम करतो.
- या उपक्रमांतर्गत हस्तशिल्प, हातमाग, जूट, काथ्या (नारळाच्या शेंडीचे तंतू), तसेच घरे आणि कार्यालयांच्या सजावटीसारख्या निर्धारित श्रेणीतील उत्पादनांचा समावेश करण्यात आला आहे.
- हा उपक्रम महिला उद्योजकांना बाजारपेठेत अधिक चांगली ओळख मिळवून देतो आणि खरेदीदार व विक्रेता यांच्यात पारदर्शक संवाद सुनिश्चित करतो, ज्यामुळे मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी होते.
- आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये जेम पोर्टलवर 2.1 लाख पेक्षा जास्त महिला सूक्ष्म उद्योजक नोंदणीकृत झाल्या, ज्यांना 13.7 लाख ऑर्डर्स प्राप्त झाल्या.



गुजरातचे मुख्यमंत्री होते, तेव्हा त्यांनी पगाराच्या रूपात मिळालेली सर्व रक्कम गुजरात सचिवालयातील कर्मचाऱ्यांच्या मुलींच्या शिक्षणासाठी दिली होती. इतकेच नाही तर, त्यांना मिळालेल्या सर्व भेटवस्तूंच्या लिलावातून मिळालेली रक्कमही मुलींच्या शिक्षणासाठी दान केली होती. कल्पना करा की तुम्ही 140 कोटी देशवासियांचे निवडून आलेले नेते आहात, ज्यांचा सोशल मीडियावर मोठा चाहता वर्ग आहे आणि पीएम मोदी यांनी त्यांचे सोशल मीडिया खाते पूर्ण दिवसासाठी 7 महिलांकडे सोपवले होते. तुम्हाला काय वाटत असेल? होय, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2019 मध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आपले ट्विटर खाते 7 महिलांकडे सोपवले होते. 2025 मध्येही या निमित्ताने त्यांनी आपले सोशल मीडिया खाते महिला शक्तीकडे सोपवले होते. बोलणे आणि करणे यातील समानतेचे हे अद्भुत उदाहरणच प्रत्यक्षात नव्या भारताच्या केंद्रस्थानी महिला शक्तीला समान अधिकार आणि संधी देत आहे.

निश्चितपणे, देशातील महिला शक्तीचे सक्षमीकरण ही आज राष्ट्राची सर्वोच्च प्राथमिकता आहे. म्हणूनच आज भारतात प्रत्येक जण महिला शक्तीचा गौरव करू लागला आहे. वाढत्या अर्थव्यवस्थेची लाभार्थी महिला आहे आणि तिला गती देण्यातही महिलाचे खूप मोठे योगदान आहे. स्टार्टअपपासून स्पेस सेक्टरपर्यंत मुलींचे वर्चस्व आहे. खेळाच्या मैदानात त्या आघाडीवर आहेत, सैन्यात चमकत आहेत; आज अभिमानाने महिला खांद्याला खांदा लावून देशाच्या विकासयात्रेत सहभागी होत आहे. भारताला 2047 पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्यासाठी देशाने वेगाने प्रगती करणे आणि नागरिकांच्या पूर्ण क्षमतेचा राष्ट्रहितासाठी उपयोग होणे आवश्यक आहे. यासाठी मुलींना केवळ मोठमोठी स्वप्ने पाहण्यासाठी प्रेरित करणे पुरेसे नाही, तर ती स्वप्ने पूर्ण करण्यासाठी त्यांना प्रत्येक पावलावर सहकार्य करणेही आवश्यक आहे.

भय आणि भेदभावमुक्त वातावरणात महिला राष्ट्रनिर्माणात आपले सर्वोत्तम योगदान देऊ शकतात. अमृत काळात नवीन संसद भवनातील पहिले विधेयक नारी शक्ती वंदनाचे होते आणि याच संसदेतून ते प्रत्यक्षात उतरवण्याचे ऐतिहासिक पाऊल उचलून सरकारने आपली वचनबद्धता दाखवली. भारताचे प्रधान सेवक, सच्चे कर्मयोगी, साधक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली लोकशाहीच्या प्रवासात नवा इतिहास रचण्यासाठी भारत कटिबद्ध आहे, कारण भारताचे ग्रंथ आणि भारताची संस्कृती सांगते...

"यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ।।




# महिला आरक्षण

## तुमच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर

**Q** **16 एप्रिल 2026 रोजी केंद्र सरकारने लोकसभेत कोणकोणती विधेयके मांडली ?**

**A** 16 एप्रिल 2026 रोजी केंद्र सरकारने लोकसभेत तीन प्रमुख विधेयके मांडली:

- संविधान (एकशे एकतिसावी सुधारणा) विधेयक, 2026
- परिसीमन विधेयक, 2026
- संघराज्य क्षेत्र विधि (सुधारणा) विधेयक, 2026

**Q** **केंद्र सरकारने ही तिन्ही विधेयके सध्याच्या काळात का आणली?**

**A** नारीशक्ती वंदन अधिनियमात अशी तरतूद करण्यात आली आहे की, 2026 नंतर होणाऱ्या जनगणनेनंतर, होणाऱ्या परिसीमनाच्या (मतदारसंघ पुनर्रचना) आधारावर महिलांसाठी आरक्षण सुनिश्चित केले जाईल. जर केंद्र सरकारने 2026 ची जनगणना आणि त्यानंतर त्यावर आधारित परिसीमनाची प्रतीक्षा केली असती, तर महिलांना 33 टक्के आरक्षणाचा लाभ 2029 च्या सार्वत्रिक निवडणुकीतही मिळू शकला नसता. म्हणूनच, देशाच्या निम्म्या लोकसंख्येला लवकरात लवकर लाभ मिळवून देण्यासाठी, याला 2026 च्या जनगणनेवर आधारित होणाऱ्या परिसीमनापासून वेगळे (**Delink**) करणे गरजेचे होते.

**Q** **नारी शक्ती वंदन अधिनियमासोबतच आता परिसीमनाचा मुद्दा का मांडण्यात आला? सरकार एवढ्या मोठ्या प्रमाणावर जागा का वाढवत आहे?**

**A** परिसीमन म्हणजे एखाद्या मतदारसंघाच्या सीमांमध्ये होणारा बदल. नारी शक्ती वंदन अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी परिसीमन आवश्यक आहे.

लोकसभेतील जागांची संख्या 1976 मध्ये 550 निर्धारित करण्यात आली होती. 1971 मध्ये भारताची लोकसंख्या अंदाजे 54 कोटी होती. आज ही लोकसंख्या 140 कोटी आहे. म्हणूनच लोकसभेतील जागांची संख्या वाढवून 850 करणे महत्त्वाचे आहे. यामुळे संसदेत योग्य प्रतिनिधित्व सुनिश्चित होऊ शकेल.

**Q** **जर ही तिन्ही विधेयके सभागृहात मंजूर झाली असती, तर याचा देशाला काय फायदा झाला असता?**

**A** जर ही तिन्ही विधेयके सभागृहात मंजूर झाली असती, तर राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर त्यांचे कायद्यात रूपांतर झाले असते आणि देशातील महिलांना 2029 च्या लोकसभा निवडणुकीतच 33 टक्के आरक्षणाचा लाभ मिळू शकला असता, ज्यामुळे त्यांचा प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेला अधिकार त्यांना प्राप्त झाला असता.

**Q** **केंद्र सरकारला Delimitation Commission Act बदल करून राजकीय लाभ मिळवायचा होता का? जेव्हा काही राज्यांमध्ये निवडणुका सुरू आहेत, तेव्हा सरकारने हे विधेयक का आणले? तामिळनाडू किंवा पश्चिम बंगालसारख्या राज्यांत होणाऱ्या निवडणुकांवर याचा परिणाम होईल का?**

**A** केंद्र सरकारने **Delimitation Commission Act** मध्ये कोणताही बदल केलेला नाही, उलट जुना कायदा तसाच (जैसे थे) ठेवला आहे. परिसीमन आयोगाच्या शिफारशी तेव्हाच लागू होतात, जेव्हा संसद त्यांना मंजुरी देते आणि राष्ट्रपतींची स्वीकृती मिळते. सध्या सुरू असलेल्या निवडणुकांवर, म्हणजे तामिळनाडू किंवा पश्चिम बंगाल, या प्रक्रियेचा कोणताही परिणाम होणार नाही; कारण 2029 पर्यंतच्या सर्व निवडणुका सध्याच्या व्यवस्थेनुसार आणि विद्यमान मतदारसंघांच्या आधारावरच घेतल्या जातील.

**Q** **लोकसभेतील जागांची संख्या वाढवून 850 करण्यामागील मुख्य कारणे आणि तर्क काय होते?**

**A** हा प्रस्ताव लोकसंख्येच्या प्रमाणात जागांच्या विस्तारावर आधारित होता. सर्व राज्यांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांच्या जागांमध्ये समान 50 टक्के वाढ केल्यामुळे त्यांचे (प्रतिनिधित्वाचे) प्रमाण सध्याच्या स्थितीप्रमाणेच कायम राहिले असते. या सिद्धांताच्या आधारावर, लोकसभेतील जागांची संख्या सध्याच्या 543 वरून वाढून अंदाजे 815 झाली असती. म्हणूनच लोकसभेतील जागांची महत्तम मर्यादा 550 वरून वाढवून 850 केली जात होती.



**Q** **नवीन परिसीमन प्रस्तावात लोकसंख्या नियंत्रणात राखणाऱ्या राज्यांचे नुकसान झाले असते का?**


**A** नाही, नव्या परिसीमन प्रस्तावामुळे लोकसंख्या नियंत्रणात राखणाऱ्या राज्यांचे कोणतेही नुकसान झाले नसते. या प्रस्तावात सर्व राज्यांच्या जागांमध्ये समान प्रमाणात वाढ (50%) करण्याचे म्हटले होते, ज्यामुळे कोणत्याही राज्याचे प्रतिनिधित्व टक्केवारी कमी होण्याऐवजी आहे तशीच राहिली असती किंवा थोडी वाढली असती.


**Q** **नवीन परिसीमन प्रस्तावामुळे अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) यांच्या प्रतिनिधित्वाला आणि अधिकारांची हानी झाली असती का?**


**A** आपल्या संविधानात वेळोवेळी परिसीमनाची तरतूद आहे आणि याच प्रक्रियेद्वारे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसह विविध वर्गांसाठी जागांचे पुनर्निर्धारण आणि वाढ होते. जर ही तिन्ही विधेयके मंजूर झाली असती, तर जवळपास 850 जागा असलेल्या सभागृहात आरक्षित जागांची संख्या 131 वरून वाढून सुमारे 205 झाली असती, ज्यामुळे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या प्रतिनिधित्वात आणि अधिकारांत वाढ झाली असती, कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नसते.

**Q** **नवीन परिसीमन प्रस्तावात दक्षिण भारतीय राज्यांचे किंवा लहान राज्यांचे नुकसान झाले असते का?**

**A** नाही, सर्व राज्यांच्या जागांमध्ये समान 50 टक्के वाढ झाली असती. दक्षिण भारतीय राज्यांच्या प्रतिनिधित्वात कोणतीही घट झाली नसती. खालील तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे, दक्षिण भारतीय राज्यांकडे सध्या लोकसभेत 23.76 टक्के जागा आहेत. विधेयके मंजूर झाल्यानंतर हे प्रमाण वाढून अंदाजे 23.87 टक्के झाले असते. उदाहरणार्थ, तामिळनाडूच्या जागाही याच प्रमाणात वाढल्या असत्या आणि राज्याचे कोणतेही नुकसान झाले नसते.



**Q** **विरोधी पक्षाच्या निरंतर मागणीनंतरही महिला आरक्षणांतर्गत मुस्लिम महिलांसाठी स्वतंत्र कोटा का देण्यात आला नाही?**

**A** भारताच्या संविधानात धर्माच्या आधारावर आरक्षणाची कोणतीही तरतूद नाही. आरक्षणाची धोरणे संविधानात निर्धारित केलेल्या सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणावर आधारित आहेत.

**Q** **सरकारने महिला आरक्षण वर्ष 2029 पर्यंत पुढे ढकलण्याऐवजी 2024 च्या सार्वत्रिक निवडणुकीतच त्वरित का लागू केले नाही, आणि हे 2011 च्या आधारावरच का लागू केले गेले नाही?**



**A** आरक्षण लागू करण्यासाठी परिसीमन आवश्यक आहे. परिसीमन ही एक व्यापक चर्चेवर आधारित प्रक्रिया आहे. परिसीमन पूर्ण करण्यासाठी साधारणपणे दोन वर्षे लागतात. म्हणूनच महिला आरक्षण लागू करण्यासाठी परिसीमन विधेयकासोबत ही तिन्ही विधेयके आणली गेली होती.

**Q** **जर 2024 च्या सार्वत्रिक निवडणुकीत महिला आरक्षण लागू होणार नव्हते, तर 2023 मध्ये महिला आरक्षण विधेयक का आणले गेले?**

**A** 2023 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार महिला आरक्षण विधेयक घेऊन आले. नवीन संसद भवनात हे विधेयक सर्वसंमतीने मंजूर झाले आणि राज्यसभेकडूनही याला मंजुरी मिळाली. सर्वांनी महिला आरक्षण विधेयकाचे समर्थन केले आणि अशा प्रकारे नारी शक्ती वंदन विधेयकाचे अधिनियमात रूपांतर झाले.



**Q** **जातीनुसार जनगणना पुढे ढकलण्यासाठी सरकारने हे संविधान दुरुस्ती विधेयक आणले होते का?**

**A** केंद्र सरकारने तीन महिन्यांपूर्वीच जातीनुसार जनगणनेची कालबद्ध प्रक्रिया सुरू केली आहे, त्यामुळे ती पुढे ढकलण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. सध्याच्या जनगणना प्रक्रियेत आधी घरांची गणना केली जात आहे आणि त्यानंतर जेव्हा व्यक्तींची गणना होईल, तेव्हा जातीशी संबंधित माहिती देखील पूर्णपणे नोंदवली जाईल.

**Q** **महिला आरक्षण जम्मू-काश्मीर, दिल्ली आणि पुडुचेरी यांसारख्या केंद्रशासित प्रदेशांमध्ये लागू करण्यासाठी स्वतंत्र 'केंद्रशासित प्रदेश विधेयक' का आणले गेले होते?**

**A** जम्मू-काश्मीर, दिल्ली आणि पुद्दुचेरीच्या विधानसभा स्वतंत्र '**UT Act**' द्वारे संचालित होतात. या विधानसभांमध्येही महिलांसाठी अनुक्रमे जवळपास 38, 23 आणि 10 जागा आरक्षित करण्यासाठी ही तांत्रिक सुधारणा अनिवार्य होती, म्हणूनच स्वतंत्र 'केंद्रशासित प्रदेश विधेयक' आणले गेले होते.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राष्ट्राला उद्देशून संबोधन

# "माझे देशातील प्रत्येक महिलेला आश्वासन आहे की, महिला आरक्षणाच्या मार्गात येणारा प्रत्येक अडथळा आम्ही दूर करूनच राहू"

*नारी शक्ती वंदन अधिनियम दुरुस्ती कोणाकडून काहीही हिरावून घेण्यासाठी नव्हती. उलट देशातील महिलांना त्यांचा अधिकार प्रदान करण्याचा तो एक महायज्ञ होता. ती केवळ काळाची गरज नाही, तर विकसित भारताच्या प्रवासात महिलांच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्राला एका नव्या उंचीवर नेण्याचा सक्षम आधार आहे. यात कोणतेही राजकारण नव्हते तर राष्ट्रहिताचाच विचार होता, ज्याला लोकसभेतील संख्याबळाच्या अभावामुळे अल्पविराम लागला. राष्ट्रीय धोरणांवर राजकारणाचे वर्चस्व पाहून व्यथित झालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 18 एप्रिल, 2026 रोजी देशाला संबोधित केले आणि राष्ट्र आणि महिलांप्रति आपली तीव्र व्यथा व्यक्त केली. त्यांनी महिला आरक्षणाच्या मार्गात येणारे सर्व अडथळे दूर करण्याचे आश्वासनही दिले... त्यांच्या राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणातील संपादित अंश:*

**पक्षाच्या हितापेक्षा राष्ट्रीय हित हेच सर्वोच्च:** आमच्यासाठी देशहित सर्वोच्च आहे, परंतु जेव्हा काही लोकांसाठी पक्षहित सर्व काही बनते, आणि पक्षहित हे देशहितापेक्षा मोठे होते, तेव्हा त्याचा फटका नारीशक्तीला आणि देशहिताला सहन करावा लागतो. या वेळीही तेच झाले आहे. काँग्रेस, डीएमके, टीएमसी आणि समाजवादी पक्ष यांसारख्या पक्षांच्या स्वार्थी राजकारणामुळे होणारे नुकसान देशातील नारी शक्तीला सहन करावे लागत आहे.

**महिला आपला अपमान कधीही विसरत नाही:** महिलांच्या हिताचा प्रस्ताव फेटाळला गेला, तेव्हा काँग्रेस, डीएमके, टीएमसी, समाजवादी पक्ष यांसारख्या घराणेशाही असलेल्या पक्षांनी आनंदाने टाळ्या वाजवल्या. महिलांचे अधिकार हिरावून घेऊन हे लोक बाकं वाजवत होते. त्यांनी जे केले ती केवळ बाकांवरची थाप नव्हती, तर तो नारीच्या स्वाभिमानावर, तिच्या आत्मसन्मानावर केलेला आघात होता. स्त्री सर्व काही विसरू शकते, पण आपला अपमान कधीही विसरत नाही, म्हणूनच संसदेत काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या वर्तनाची आठवण प्रत्येक स्त्रीच्या मनात कायम राहील.

**विरोधातून संविधान निर्मात्यांच्या अपमान:** संसदेत नारी शक्ती वंदन दुरुस्तीला ज्या पक्षांनी विरोध केला आहे, त्यांना मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, ते नारी शक्तीला गृहीत धरत आहेत. ते विसरत आहेत की 21 व्या शतकातील महिला देशातील प्रत्येक घडामोडीवर लक्ष ठेवून आहे, ती त्यांचा हेतू ओळखून आहे आणि सत्यही पूर्णपणे जाणून आहे. म्हणूनच, महिला आरक्षणाला विरोध करून विरोधकांनी जे पाप केले आहे, त्याची शिक्षा त्यांना नक्कीच मिळेल. या पक्षांनी संविधान निर्मात्यांच्या भावनांचाही अपमान केला आहे आणि जनतेकडून मिळणाऱ्या शिक्षेपासूनही ते वाचू शकणार नाहीत.

**हिरावून घेण्यासाठी नाही तर देण्यासाठीचे विधेयक होते:** सभागृहातील नारी शक्ती वंदन दुरुस्ती कोणाकडून काहीही हिरावून घेण्यासाठी नव्हती. नारी शक्ती वंदन दुरुस्ती प्रत्येकाला काही ना काही देण्यासाठी होती. 40 वर्षांपासून प्रलंबित असलेले महिलांचे हक्क 2029 च्या लोकसभा निवडणुकीपासून त्यांना मिळवून



देणारी ही दुरुस्ती होती. नारी शक्ती वंदन दुरुस्ती विधेयक हा 21 व्या शतकातील भारतातील महिलांना नवीन संधी देण्यासाठीचा, नवीन भरारी देण्यासाठीचा, त्यांच्या मार्गातील अडथळे दूर करण्यासाठीचा एक महायज्ञ होता.

**नारी शक्ती वंदन दुरुस्ती ही काळाची गरज:** नारी शक्ती वंदन दुरुस्ती हा उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम अशा सर्व राज्यांच्या सामर्थ्यात समान वाढ करण्याचा प्रयत्न होता. संसदेत सर्व राज्यांच्या आवाजाला अधिक ताकद देण्याचा हा प्रयत्न होता. राज्य लहान असो वा मोठे, राज्याची लोकसंख्या कमी असो वा जास्त, सर्वांची ताकद समान प्रमाणात वाढवण्याचा हा प्रयत्न होता. परंतु या प्रामाणिक प्रयत्नाची काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सभागृहात संपूर्ण देशासमोर भ्रूणहत्या केली आहे. काँग्रेस, टीएमसी, समाजवादी पक्ष, डीएमके सारखे पक्ष या भ्रूणहत्येचे दोषी आहेत. हे देशाच्या संविधानाचे अपराधी आहेत, हे देशाच्या नारी शक्तीचे अपराधी आहेत.

**महिलांच्या बाजूने उभे राहण्याची संधी गमावली:** मला वैयक्तिकरित्या आशा होती की काँग्रेस आपली गेल्या कित्येक दशकांपासूनची चूक सुधारेल.

काँग्रेस आपल्या पापांचे प्रायश्चित्त करेल, परंतु काँग्रेसने इतिहास घडवण्याची, महिलांच्या बाजूने उभे राहण्याची संधी गमावली. काँग्रेस स्वतः देशाच्या बहुतांश भागांत आपले अस्तित्व गमावून बसली आहे. काँग्रेस एखाद्या बांडगुळाप्रमाणे प्रादेशिक पक्षांच्या पाठीवर स्वार होऊन स्वतःला जिवंत ठेवून आहे. पण काँग्रेसला हे देखील नको आहे की प्रादेशिक पक्षांची ताकद वाढावी, म्हणूनच काँग्रेसने या दुरुस्तीला विरोध करून अनेक प्रादेशिक पक्षांचे भवितव्यही अंधारात ढकलण्याचे राजकीय कारस्थान रचले आहे.

**घराणेशाही असलेल्या पक्षांच्या मनातील असुरक्षा:** नारी शक्ती वंदन अधिनियमाला विरोध करण्याचे एक मोठे कारण म्हणजे या घराणेशाही असलेल्या पक्षांची भीती. त्यांना भीती वाटते की महिला सशक्त झाल्या, तर या घराणेशाहीवर जगणाऱ्या पक्षांचे नेतृत्व धोक्यात येईल. आपल्या कुटुंबाबाहेरील महिलांनी पुढे यावे, हे त्यांना मान्य नाही. घराणेशाही असलेल्या पक्षांच्या मनात त्यांच्याबद्दल असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. मतदारसंघांच्या पुनर्रचनेनंतर महिलांसाठी अधिक जागा उपलब्ध होतील, महिलांचा प्रभाव वाढेल, म्हणून या लोकांनी नारी शक्ती वंदन दुरुस्तीला विरोध केला आहे. देशाची नारीशक्ती, काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांना या पापासाठी कधीही माफ करणार नाही.

**पुनर्रचनेबाबत संभ्रम निर्माण केला:** काँग्रेस आणि त्यांचे सहकारी पक्ष मतदारसंघ पुनर्रचनेबाबत सातत्याने खोटे दावे करत आहेत. या निमित्ताने त्यांना विभाजनाची आग पेटवायची आहे. कारण, 'फोडा आणि राज्य करा' ही राजकारणाची पद्धत काँग्रेस इंग्रजांकडून वारसाहक्काने शिकून आली आहे आणि काँग्रेस आजवर त्याच आधारावर चालत आहे. काँग्रेसने नेहमीच देशात दरी निर्माण करणाऱ्या भावनांना खतपाणी घातले आहे. म्हणूनच, हा खोटा प्रचार केला गेला की डिलिमिटेशन म्हणजेच मतदारसंघ पुनर्रचनेमुळे काही राज्यांचे नुकसान होईल! प्रत्यक्षात सरकारने पहिल्या दिवसापासून स्पष्ट केले आहे की, कोणत्याही राज्याच्या भागीदारीचे प्रमाण बदलणार नाही, किंवा कोणाचे प्रतिनिधित्वही कमी होणार नाही. उलट, सर्व राज्यांच्या जागा समान प्रमाणातच वाढतील.

**नकारात्मक राजकारण:** महिला आरक्षणाला विरोध करून काँग्रेसने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की तो एक सुधारणा-विरोधी पक्ष आहे. 21व्या शतकातील विकसित भारतासाठी जे काही निर्णय, ज्या काही सुधारणा आवश्यक आहेत , देश जे काही निर्णय घेत आहे, त्याला काँग्रेस विरोध करते, ते नाकारते आणि त्यात अडथळा आणते. हा काँग्रेसचा इतिहास आहे आणि हेच काँग्रेसचे नकारात्मक राजकारण आहे.

**प्रत्येक सुधारणेला विरोध करणे हे विरोधी पक्षांचे धोरण:** ही तीच काँग्रेस आहे, जिने जनधन-आधार-मोबाईल या त्रिशक्तीला विरोध केला. काँग्रेसने डिजिटल पेमेंटला विरोध केला, काँग्रेसने जीएसटीला विरोध केला, काँग्रेसने सामान्य वर्गातील गरिबांच्या आरक्षणाला विरोध केला, काँग्रेसने तिहेरी तलाक विरुद्धच्या कायद्याला विरोध केला. काँग्रेसने कलम 370 हटवण्यास विरोध केला. आपले संविधान, आपले न्यायालय जो 'समान नागरी कायदा' आवश्यक मानते, काँग्रेसने त्यालाही विरोध केला. 'सुधारणा' हे नाव ऐकताच काँग्रेस विरोधाची पाटी घेऊन धावू लागते. देशाची ताकद वाढवणारे असे कोणतेही काम असो, त्यात अडथळे निर्माण करण्यासाठी काँग्रेस आपली सर्व शक्ती पणाला लावते. काँग्रेस 'एक देश एक निवडणूक' ला विरोध करते, काँग्रेस देशातून घुसखोरांना हाकलून देण्यास विरोध करते, काँग्रेस मतदार यादीच्या शुद्धीकरणाला, एसआयआरला विरोध करते, काँग्रेस वक्फ बोर्डातील सुधारणांना विरोध करते. काँग्रेसने निर्वासितांना सुरक्षा देणाऱ्या सीएए (CAA) कायद्यालाही विरोध केला. देशातील नक्षलवादी हिंसाचार संपवण्याच्या प्रयत्नांमध्येही काँग्रेसने अडथळे आणले आहेत. काँग्रेसचा एकच पॅटर्न राहिला आहे – कोणतीही सुधारणा आली की खोटे बोला आणि भ्रम पसरवा. इतिहास साक्षी आहे, काँग्रेसने नेहमीच हा नकारात्मक मार्ग निवडला आहे.



## 100% नारी शक्तीचे आशीर्वाद

विधेयक मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेली 66% मते आज आपल्याला मिळाली नसली, तरी मला खात्री आहे की, देशातील 100% नारी शक्तीचे आशीर्वाद आमच्या पाठीशी आहेत. मी देशातील प्रत्येक नारीला विश्वास देतो की, महिला आरक्षणाच्या मार्गात येणारा प्रत्येक अडथळा आम्ही संपवू, तो दूर करूनच राहू. आमचा निर्धार ठाम आहे, आमची हिंमतही अढळ आहे आणि आमचा संकल्पही ठाम आहे.

**अडकवून ठेवणे – लक्ष विचलित करणे – टाळाटाळ करणे हेच तत्व होते:** जो जो निर्णय देशासाठी आवश्यक असतो, तो काँग्रेसने कायमच कार्पेटच्या खाली दडपून ठेवला. काँग्रेसच्या याच वृत्तीमुळे भारताला अपेक्षित विकासाची उंची गाठता आली नाही. स्वातंत्र्याच्या काळात आपल्याबरोबर इतरही अनेक देश स्वतंत्र झाले होते. त्यातील बहुतेक देश आपल्यापेक्षा खूप पुढे निघून गेले आणि त्याचे कारण हेच होते की काँग्रेसने प्रत्येक सुधारणा रोखून धरली. विलंब करणे, दिशाभूल करणे, टाळाटाळ करणे, हेच काँग्रेसचे तत्व राहिले आहे, हीच काँग्रेसची कार्यसंस्कृती राहिली आहे. काँग्रेसने शेजारील देशांबरोबरचे सीमाप्रश्न रखडवले, पाकिस्तानबरोबरच्या पाणीवाटपाचे वाद लटकवून ठेवले, काँग्रेसने ओबीसी आरक्षणाचा निर्णय 40 वर्षांपर्यंत रखडवून ठेवला. काँग्रेसने सैनिकांसाठी 'एक पद एक निवृत्तीवेतन'चा निर्णय 40 वर्षांपर्यंत रोखून ठेवला.

**आम्ही महिला आरक्षणाची प्रतिज्ञा पूर्ण करू:** महिला आरक्षणाला विरोध करणारे पक्ष, देशातील नारी शक्तीचा संसद आणि विधानसभांमधील सहभाग वाढण्यापासून कधीही रोखू शकणार नाहीत, आता फक्त योग्य वेळेची प्रतीक्षा आहे. काल आपल्याकडे संख्याबळ नव्हते, पण याचा अर्थ असा नाही की हा आपला पराजय आहे. आमचे आत्मबळ अजेय आहे. आमचे प्रयत्न थांबणार नाहीत, आमचे प्रयत्न मंदावणार नाहीत. आमच्याकडे भविष्यात आणखी संधी येतील, आपल्याला निम्म्या लोकसंख्येच्या स्वप्नांसाठी, देशाच्या भविष्यासाठी हा संकल्प पूर्ण करायचाच आहे. ■

पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

# खरीप हंगाम 2026 साठी खतांवरील अनुदान

# जयपूर मेट्रोच्या विस्ताराला मंजुरी

***केंद्रीय मंत्रिमंडळाने शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन खरीप हंगाम 2026 साठी फॉस्फेटिक आणि पोटॅसिक (पी अँड के) खतांवरील पोषक तत्त्व आधारित अनुदान दरांच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. शेतकऱ्यांना किफायतशीर दरात खते उपलब्ध करून देण्यासह कृषी क्षेत्राला सक्षम करण्याच्या दिशेने घेतलेला हा महत्त्वपूर्ण निर्णय आहे. यासोबतच जयपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यालाही मंजुरी देण्यात आली. यामुळे शहरात वाहतूक आणि पर्यटनाला नवीन गती लाभेल तसेच रोजगार निर्मिती आणि व्यापारउदीमाला प्रोत्साहन मिळेल. याव्यतिरिक्त, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना-III मार्च 2028 पर्यंत सुरू ठेवण्याच्या प्रस्तावाला मंजुरीसह इतर अनेक महत्त्वाच्या प्रस्तावांनाही मंजुरी देण्यात आली....***



*"जागतिक संघर्षाच्या काळात देखील शेतकरी बंधू भगिनींच्या हिताला आपले सरकार सर्वोच्च प्राधान्य देत आहे. याचाच एक भाग म्हणून वर्ष 2026 च्या खरीप हंगामासाठी पोषक तत्त्व आधारित अनुदान दरांच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे आपल्या अन्नदात्यांना पूर्वीप्रमाणेच किफायतशीर दरांमध्ये खते मिळत राहतील.* **–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

**निर्णय : खरीप हंगाम 2026 साठी फॉस्फेटिक आणि पोटॅसिक खतांवरील पोषक तत्त्व आधारित अनुदान दरांच्या प्रस्तावाला मंजुरी.**

**परिणाम :** शेतकऱ्यांना अनुदानित, परवडणाऱ्या आणि वाजवी दरात खते उपलब्ध होतील याची खात्री केली जाईल.

- डीएपी आणि एनपीकेएस ग्रेडसह फॉस्फेटिक आणि पोटॅसिक खते शेतकऱ्यांना वाजवी दरात मिळत राहतील.
- खरीप हंगाम 2026 साठी अंदाजित अर्थसंकल्पीय आवश्यकता सुमारे 41,533.81 कोटी रुपये असेल. ही रक्कम खरीप 2025 हंगामाच्या अर्थसंकल्पीय आवश्यकतेपेक्षा अंदाजे 4,317 कोटी रुपयांनी अधिक आहे.

**निर्णय : जयपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी. या टप्प्याअंतर्गत 13,037.66 कोटी रुपये खर्चाचा 41 किलोमीटर लांबीचा उत्तर-दक्षिण कॉरिडॉर बांधला जाणार आहे.**

**परिणाम :** दुसऱ्या टप्प्याअंतर्गतची सेवा कार्यान्वित झाल्यानंतर मेट्रो रेल्वे सेवेचा वापर करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत अनेक पटींनी वाढ होण्याची अपेक्षा आहे. यामुळे जयपूरमधील वाहतूक सुविधांअंतर्गतचा मेट्रो सेवेचा वाटाही मोठ्या प्रमाणात वाढेल आणि खाजगी वाहनांवरील अवलंबित्व कमी व्हायलाही मदत होईल.

- या परिसरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने प्रदूषणाचे प्रमाण कमी होईल तसेच इथले रहिवासी, कामगार आणि पर्यटकांसाठी वाहतूक सुलभ होईल. या प्रकल्पामुळे आधुनिक आणि भविष्य काळासाठी सज्ज असलेले शहर म्हणून जयपूरचे स्थान अधिक

मजबूत होईल. हा प्रकल्प विकसित भारत आणि विकसित राजस्थानच्या दिशेने टाकलेले एक पाऊल ठरणार आहे.

- प्रल्हादपुरा ते तोडी मोडपर्यंतच्या मार्गावर 36 स्थानके असतील. जयपूर मेट्रोच्या पहिल्या टप्प्यावरील मार्गाचा दररोज सरासरी सुमारे 60,000 प्रवासी लाभ घेत आहेत.

**निर्णय : राजस्थानमधील बालोत्रा जिल्ह्यातील पाचपद्रा येथील एचपीसीएल राजस्थान रिफायनरी लिमिटेड (एचआरएल) या कंपनीच्या 79,459 कोटी रुपयांच्या खर्च सुधारणेस आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) द्वारे 8,962 कोटी रुपयांच्या अतिरिक्त भांडवली गुंतवणुकीस मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.**

**परिणाम :** देशाच्या ऊर्जेच्या वाढत्या गरजा, पेट्रोकेमिकलची आवश्यकता आणि विशेष उत्पादनांची निर्मिती लक्षात घेता, एचआरएल हा एक महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे. यामुळे देशाचे आयातीवरील अवलंबित्व कमी होईल आणि परकीय चलनात बचत होईल. याशिवाय, हा प्रकल्प मागास प्रदेशांच्या औद्योगिकीकरणास, स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या मंगला या कच्च्या तेलाच्या वापराला चालना देईल आणि भारताला एक रिफायनिंग केंद्र म्हणून उदयाला येण्यासाठी मोठे योगदान देईल.



- या प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान, एचआरएलने रिफायनरी युनिट्सच्या बांधकामात गुंतलेल्या विविध भागधारकांच्या माध्यमातून सुमारे 25,000 कामगारांसाठी रोजगाराच्या विविध संधी निर्माण केल्या आहेत.
- स्थानिक लोकांना नुकसान भरपाई, रोजगार आणि सीएसआर (**CSR**) उपक्रमांचाही फायदा होईल.

**निर्णय : अरुणाचल प्रदेशातील कमले, क्रा दादी आणि कुरुंग कुमे जिल्ह्यांमध्ये कमला जलविद्युत प्रकल्पाच्या बांधकामासाठी 26,069.50 कोटी रुपये खर्चाच्या गुंतवणुकीच्या प्रस्तावाला मंजुरी**

**परिणाम:** 1,720 मेगावॅट स्थापित क्षमतेच्या या प्रकल्पातून 6870 दशलक्ष युनिट ऊर्जा निर्मितीची अपेक्षा आहे. या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज राज्यातील वीजपुरवठा स्थिती मजबूत करेल. सर्वाधिक मागणीच्या काळात व्यवस्थापनास मदत करेल, राष्ट्रीय ग्रीडचे संतुलन राखण्यास हातभार लावेल आणि ब्रह्मपुत्रा खोऱ्यातील पूर नियंत्रणात मदत करेल. हा प्रकल्प पूर्ण होण्याचा अंदाजित कालावधी 96 महिने आहे.

- या प्रकल्पामुळे अरुणाचल प्रदेशातील कामले, क्रा दादी आणि कुरुंग कुमे जिल्ह्यांमधील पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा होईल, ज्यामध्ये प्रकल्पासाठी सुमारे 196 किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचा आणि पुलांचा विकास समाविष्ट आहे.
- जिल्ह्याला रुग्णालये, शाळा, बाजारपेठा इत्यादींसारख्या अत्यावश्यक पायाभूत सुविधांच्या बांधकामाचाही लाभ होईल.

**निर्णय : अरुणाचल प्रदेशातील अंजॉ जिल्ह्यात 1200 मेगावॅट क्षमतेच्या कलाई-2 जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीसाठी गुंतवणूक प्रस्तावाला मंजुरी.**

**परिणाम :** या प्रकल्पातून वार्षिक 4852.95 दशलक्ष युनिट ऊर्जा निर्माण होण्याची अपेक्षा आहे. लोहित खोऱ्यातील पहिला जलविद्युत प्रकल्प असल्याने तो राज्यातील वीजपुरवठा मजबूत करेल, मागणीच्या उच्चांकी वेळेचे व्यवस्थापन करण्यास मदत करेल आणि राष्ट्रीय ग्रीड संतुलित ठेवण्यास हातभार लावेल.

- या प्रकल्पाचा अंदाजे खर्च 14105.83 कोटी रुपये आहे. हा प्रकल्प पूर्ण होण्याचा अंदाजित कालावधी 78 महिन्यांचा आहे.
- या प्रकल्पांतर्गत राज्यातील नामसाई आणि अंजॉ जिल्ह्यांमधील पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा होईल, याअंतर्गत 29 किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची आणि पुलांची निर्मिती केली जाईल
- स्थानिक लोकांना विविध प्रकारची भरपाई, रोजगार आणि सीएसआर उपक्रमांमधूनही फायदा होईल.

मंत्रिमंडळाच्या निर्णयांवरील पत्रकार परिषद पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

**निर्णय : केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी महागाई भत्ता आणि निवृत्तीवेतन धारकांसाठी महागाई दिलासा म्हणून अतिरिक्त हप्त्याला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी.**


**परिणाम :** हा निर्णय 01 जानेवारी 2026 पासून लागू होईल. मूळ वेतन/निवृत्तीवेतनाच्या सध्याच्या 58% दरामध्ये 2% वाढ होणार आहे. महागाई भत्ता आणि महागाई दिलासा या दोन्हीतील वाढीमुळे सरकारी तिजोरीवर दरवर्षी एकूण 6791.24 कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. याचा फायदा सुमारे 50.46 लाख केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांना आणि 68.27 लाख निवृत्तीवेतनधारकांना होईल.

**निर्णय : 'भारत सागरी विमा संकोष' (बीएमआय संकोष ) तयार करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी.**

**परिणाम :** सातत्यपूर्ण सागरी विमा संरक्षण सुलभ करण्यासाठी 12,980 कोटी रुपयांची सार्वभौम हमी देण्यात आली आहे. देशांतर्गत विमा संकोष जागतिक चढउतार, भू राजकीय अस्थिरता या आव्हानांपासून संरक्षण देण्यासह भारतीय जहाजांचे बाहेरील विमा संरक्षणावर असलेले अवलंबित्व कमी करेल. हा संकोष 'जहाजाचे भाग आणि यंत्रसामग्री, माल, संरक्षण आणि नुकसानभरपाई आणि युद्धाची जोखीम' यांसारख्या सर्व सागरी जोखमींपासून आर्थिक संरक्षण करेल. यामध्ये कोणत्याही आंतरराष्ट्रीय ठिकाणाहून भारतीय बंदरांकडे किंवा उलट दिशेने माल वाहून नेणाऱ्या जहाजांचाही समावेश होतो, जहाजे अस्थिर सागरी मार्गांवरून जात असली तरीही याचा लाभ त्यांना मिळू शकेल.

**निर्णय : उत्तर प्रदेश आणि आंध्र प्रदेशातील 15 जिल्ह्यांचा समावेश असलेल्या दोन मल्टिट्रॅकिंग प्रकल्पांना मंजुरी.**

**परिणाम:** भारतीय रेल्वेच्या सध्याच्या जाळ्यात अंदाजे 601 किलोमीटर इतकी वाढ होईल. या प्रकल्पांसाठी अंदाजे 24,815 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हे प्रकल्प 2030-31 पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. यामुळे भारतीय रेल्वेची परिचालन कार्यक्षमता आणि सेवा विश्वसनीयता वाढेल. या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाद्वारे तेथील लोकांना सक्षम करणे, आणि त्याद्वारे त्यांच्या रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी वाढवणे, हा यामागील उद्देश आहे. हे प्रकल्प लोकांची, वस्तूंची आणि सेवांची अखंड वाहतूक सुनिश्चित करतील.






**निर्णय : प्रधानमंत्री ग्राम सडक योजना-3 (पीएमजीएसवाय-3) मार्च 2025 पासून मार्च 2028 पर्यंत सुरू ठेवण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी.**

**परिणाम :** पीएमजीएसवाय-3 च्या मुदतवाढीमुळे ग्रामीण रस्त्यांच्या लक्ष्यित सुधारणेचे काम पूर्ण होईल. यामुळे कृषी आणि बिगर-कृषी उत्पादनांना बाजारपेठ मिळणे सुलभ होईल, ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था आणि व्यापाराला चालना मिळेल. शिवाय, वाहतुकीचा वेळ आणि खर्च कमी झाल्यामुळे ग्रामीण उत्पन्न सुधारेल. सुधारित दळणवळणीय जोडणीमुळे शैक्षणिक संस्था आणि आरोग्य केंद्रांपर्यंत पोहोचणे सोपे होईल. या योजनेच्या सातत्यपूर्ण अंमलबजावणीमुळे रोजगाराच्या संधीही निर्माण होतील.

**मंत्रिमंडळाने मंजुरी दिलेले इतर महत्त्वपूर्ण प्रकल्प:**

- मैदानी भागातील रस्ते आणि पूल तसेच डोंगराळ भागातील रस्त्यांच्या बांधकामाचे कार्य पूर्ण करण्यासाठी मार्च 2028 पर्यंत मुदतवाढ दिली आहे.
- डोंगराळ भागातील अवघड भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता, पुलांचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी हा कालावधी मार्च 2029 पर्यंत वाढवण्यात आला आहे.
- 31.03.2025 पूर्वी मंजूर झालेली परंतु अद्याप कंत्राट न दिलेली कामे, निविदा आणि कंत्राटासाठी खुली करण्यात आली आहेत.
- आधीच मंजूर झालेल्या मार्गावर येणाऱ्या 161 नवीन लांब पुलांच्या बांधकामास 961 कोटी रुपये अंदाजित खर्चाने मंजुरी देण्यात आली आहे.
- योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी, एकूण आर्थिक तरतूद मूळ मंजूर रक्कम 80,250 कोटी रुपयांवरून वाढवून 83,977 कोटी रुपये करण्यात आली आहे. ■

मंत्रिमंडळाच्या निर्णयांवरील पत्रकार परिषद पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

विमा – निवृत्तीवेतनाचे सामाजिक सुरक्षा कवच

पीएमएसबीवाय, पीएमजेजेबीवाय, एपीवाय यांची 11 वर्षे

# कुटुंब सुरक्षित भविष्य सुनिश्चित

*स्वप्नांचे रक्षण करण्यापासून ते आत्मसन्मान परत मिळवून देण्यापर्यंत, 'सर्वांसाठी सुरक्षा' म्हणजेच प्रत्येकाचा आधार, प्रत्येकाचा विकास हे सध्याच्या सरकारचे प्राधान्य आहे. याचाच एक भाग म्हणून ,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 9 मे 2015 रोजी प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि अटल पेन्शन योजना सुरू केल्या, ज्यांना आता 11 वर्षे पूर्ण होत आहेत... आतापर्यंत यामध्ये 92 कोटींहून अधिक नोंदण्या झाल्या आहेत. यावरुन या तीन सार्वजनिक सुरक्षा योजनांची व्याप्ती लक्षात येते.*

भारतातील 80 ते 90 टक्के लोकांकडे 2014 पर्यंत, विमा संरक्षण नव्हते किंवा निवृत्तीवेतन मिळण्याची शक्यता नव्हती. स्पष्टच सांगायचे तर,1 अब्जाहून अधिक लोक विमा आणि निवृत्तीवेतन संरक्षणाशिवाय होते. या परिस्थितीत, 9 मे 2015 रोजी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालच्या भूमीवरून एकाच वेळी दोन विमा योजना आणि एक निवृत्तीवेतन योजना सुरू करून गरीब आणि गरजूंप्रति सरकारची जबाबदारी आणि संवेदनशीलता दाखवून दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यावेळीही म्हणाले होते की गरिबांना मदतीची गरज

**प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना**
**57.11** कोटी नोंदणी
अमेरिकेच्या लोकसंख्येपेक्षा जास्त

**प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना**
**26.31** कोटी नोंदणी
पाकिस्तानच्या लोकसंख्येपेक्षा जास्त

**अटल निवृत्तीवेतन योजना**
**8.71** कोटी नोंदणी
जर्मनीच्या लोकसंख्येपेक्षा जास्त



# प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना

## 20 रुपयांमध्ये एक वर्षाचा अपघात विमा

*मध्य प्रदेशातील हरदा जिल्ह्यातील एका गावातील 27 वर्षीय ज्योती निहाल यांनी एका अपघातात कुटुंबाचे एकमेव कमावते सदस्य असलेले पती मुरलीधर निहाल यांना गमावले. ज्योती यांना दोन लहान मुले होती. मुरलीधर यांनी 12 रुपये (आता 20 रुपये) भरून प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेसाठी (PMSBY) नोंदणी केली होती. मुरलीधरने घेतलेल्या एका छोट्याश्या निर्णयामुळे या कठीण काळात कुटुंबाला सहाय्य झाले. ही एक सरकारी अनुदानित वैयक्तिक वार्षिक अपघात विमा योजना आहे. मुरलीधर यांचे निधन झाल्यावर, त्यांच्या पत्नी ज्योती यांना या योजनेतून 2 लाख रुपये मिळाले.*

मोदी म्हणाले होते की, एका चित्रपटात असा एक मन हेलावणारा संवाद आहे की 12 रुपयांमध्ये एक कफनसुद्धा विकत घेता येत नाही, मात्र सरकारने एक विमा योजना आणली आहे, ज्यामुळे समाजातील आर्थिकदृष्ट्या सर्वात दुर्बळ घटकांना फायदा झाला आहे.




### पीएमएसबीवाय विषयी

- प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना ही एक वैयक्तिक वार्षिक अपघात विमा योजना आहे, जिचे दरवर्षी नूतनीकरण करता येते.
- या योजनेअंतर्गत अपघातामुळे मृत्यू किंवा कायमस्वरूपी संपूर्ण अपंगत्व आल्यास 2 लाख रुपयांचे आणि कायमस्वरूपी आंशिक अपंगत्वासाठी 1 लाख रुपयांचे संरक्षण दिले जाते.
- 20 रुपये वार्षिक प्रीमियम आहे.
- ही योजना 18 ते 70 वर्षे वयोगटातील व्यक्तींसाठी आहे.
- अर्जदाराचे बँक खाते असणे आवश्यक आहे.




*नोटः पीएमएसबीआय लाभार्थी*

50% महिला | 72% ग्रामीण भागातील लाभार्थी




*टीपः आकडे कोटींमध्ये, आर्थिक वर्ष 2025-26 ची 25 फेब्रुवारी 2026 पर्यंतची माहिती*

# पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना

## जीवन ज्योती विमा फक्त रु. 436 प्रति वर्ष किंवा रु. 1.20 प्रति दिवस

*राधाचा नवरा हा रोजंदारीवर काम करणारा मजूर होता. त्याचे अचानक निधन झाले. तिच्याकडे कोणतीही बचत नव्हती, जमीन नव्हती आणि तिला आर्थिक मदत करणारे कोणीही नव्हते. अशातच काही दिवसांनी विमा कंपनीचा एक प्रतिनिधी तिच्याकडे आला, आणि त्याने तिला सांगितले की तिच्या नवऱ्याचे नाव 'प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजने' मध्ये समाविष्ट आहे. 2 लाख रुपयांच्या विमा भरपाईमुळे राधाला पुन्हा उभे राहण्याची आणि आपले आयुष्य नव्याने सुरू करण्याची आशा मिळाली.*

9 मे 2015 रोजी ही विमा योजना सुरू करण्यात आली. देशातील एकूण लोकसंख्येपैकी केवळ 20% लोकांकडेच विमा संरक्षण असल्याचे लक्षात आल्यानंतर, 2015 सालच्या केंद्रीय अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा करण्यात आली. या योजनेच्या शुभारंभावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले होते की अशा विम्यासाठी सामान्यतः वैद्यकीय तपासणी आवश्यक असते आणि त्यानंतर, कोणाला विमा मिळेल, हे कंपनी ठरवते. मात्र, पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत तुम्हाला फक्त एक अर्ज भरायचा आहे. तुम्ही आजारी असलात तरीही तुम्हाला या विम्याचा मिळू शकतो.




### पीएमजेजेबीवाय बद्दल जाणून घ्या

- या विमा योजनेत सामील होण्याची पात्रता 18 ते 50 वर्षे आहे.
- नोंदणी बँकेच्या शाखांमध्ये, पोस्ट ऑफिसमध्ये आणि ऑनलाइन उपलब्ध आहे.
- वार्षिक प्रीमियम 436 रुपये आहे.
- विमा कालावधीत कोणत्याही कारणामुळे मृत्यू झाल्यास 2 लाख रुपयांची नुकसान भरपाई दिली जाते.
- पात्रतेसाठी, बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये खाते असणे आणि ऑटो डेबिटला परवानगी देणे अनिवार्य आहे.



*नोट: पीएमजेजेबीवाई लाभार्थी*

**53%** महिला | **74%** लोक ग्रामीण भागातील आहेत.




नसते, गरिबांना सामर्थ्य हवे असते आणि जर त्यांना सामर्थ्य प्राप्त झाले तर ते स्वतःच गरिबीविरुद्ध लढा देतात. आज, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत 57 कोटींपेक्षा जास्त, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत 26 कोटींपेक्षा जास्त आणि अटल पेन्शन योजनेअंतर्गत 8.71 कोटींपेक्षा जास्त लोकांपर्यंत ही शक्ती पोहोचली आहे. या दोन्ही विमा योजनांअंतर्गत, अंदाजे 11 लाख कुटुंबांना


# अटल पेन्शन योजना

## वयाच्या 60 वर्षांनंतर तुम्हाला मिळेल एक हजार ते पाच हजार रुपयांपर्यंत निवृत्तीवेतन

2014 सालापूर्वी देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी केवळ 10-15 टक्के लोकांनाच निवृत्तीवेतन मिळत होते. 9 मे 2015 रोजी सरकारने दीर्घकालीन अटल निवृत्तीवेतन योजना सुरू केली. या योजनेच्या शुभारंभाच्या वेळी पंतप्रधान मोदी म्हणाले होते की ही योजना तरुणांसाठी आहे, जेणेकरून वयाच्या 60 व्या वर्षी पोहोचल्यावर त्यांना कोणाच्याही मदतीची गरज भासणार नाही. ही अटल निवृत्तीवेतन योजना (**APY**) 2030-31 पर्यंत सुरू ठेवण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने अलीकडेच मंजुरी दिली आहे.



**मागच्या 5 वर्षांमध्ये सुमारे 3 पट अटल पेंशन योजना नामांकन**




**48.76%** महिला लाभार्थी आहेत, 31 जानेवारी, 2026 पर्यंत या योजनेत सहभागी

### अटल पेन्शन योजनेबद्दल माहिती

- हीच पहिली पेन्शन योजना आहे, ज्यामध्ये सरकार हमी देते.
- तुमच्याकडे कमी पैसे असले तर ते देण्याची जबाबदारी सरकार घेते.
- 1 ऑक्टोबर 2022 पासून आयकरदाते या योजनेअंतर्गत लाभ मिळण्यास पात्र नाहीत.
- रु. 1000 ते रु. 5000 पर्यंत मासिक पेन्शनची हमी मिळते.
- निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यूनंतर, तेच निवृत्तीवेतन त्याच्या पत्नीला किंवा पतीला मिळेल.
- पती-पत्नीच्या मृत्यूनंतर, वयाच्या 60 वर्षांपर्यंत जमा झालेली पेन्शनची रक्कम परत केली जाईल.
- वय आणि पेन्शनच्या रकमेनुसार सध्या दरमहा 42 रुपयांपासून 1,454 रुपये इतकी रक्कम भरावी लागते.



*आमच्या सामाजिक सुरक्षा योजना दोन संकल्पनांवर आधारित आहेत – सर्वांसाठी विमा संरक्षण आणि सर्वात परवडण्याजोग्या दरात विमा.*

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

21,500 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे दावे निकाली काढण्यात आले आहेत. या विमा आणि पेन्शन योजना सुरू करताना पंतप्रधान मोदींनी विश्वास व्यक्त केला होता की ही अशी सुरक्षा व्यवस्था आहे, जी प्रामुख्याने गरिबांसाठी आणि सर्वसामान्य माणसासाठी आहे. ही सरकारी योजना श्रीमंतांच्या माध्यमातून गरिबांच्या सेवेचे कारण ठरू शकते. एका संकल्पासह सरकार ही योजना राबवत आहे. या व्यवस्थेचा लाभ घ्या आणि तिला एका सार्वजनिक कल्याणकारी उपाययोजनेत रूपांतरित करा. ■




# प्रगती, निसर्ग आणि संस्कृतीचा दिल्ली-देहरादून एक्सप्रेसवे

*उत्तम कनेक्टिव्हिटी आणि सुधारित पायाभूत सुविधांमुळे केवळ व्यापारालाच चालना मिळत नाही, तर प्रवाससुद्धा सुलभ होतो. वेळेची बचत होते, इंधनाचा वापर कमी होतो आणि प्रदूषणही कमी होते. 14 एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्ली- देहरादून आर्थिक कॉरिडॉरचे उद्घाटन केले, जो प्रगती, निसर्ग आणि संस्कृती यांचा संगम साधणारा जोडणीचा एक मार्ग आहे. याचा फायदा दिल्ली, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडच्या लोकांबरोबरच, पर्यटनासाठी उत्तराखंडला भेट देणाऱ्या लाखो पर्यटकांनाही होईल...*

उत्तराखंडने स्थापनेच्या 26व्या वर्षी दिल्ली- देहरादून द्रुतगती मार्गाचे उद्घाटन करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. देहरादून-दिल्ली द्रुतगती मार्ग हा केवळ एक आर्थिक कॉरिडॉर नाही, तर तो प्रवास जास्त जलद आणि स्वस्तही करेल. यामुळे पेट्रोल आणि डिझेलचा खर्च, भाडे आणि मालवाहतुकीचा खर्च कमी होईल. पर्यटनाबरोबरच रोजगाराच्या संधीही वाढतील. त्याच वेळी, देवभूमी उत्तराखंडला स्वच्छ ठेवणे अतिशय गरजेचे आहे. या सुंदर राज्याला प्लास्टिक आणि कचऱ्यापासून वाचवणे, ही, या भागाला भेट देणारे पर्यटक आणि स्थानिक या दोघांचीही जबाबदारी आहे. असे केले तरच आपण आपली तीर्थक्षेत्रे स्वच्छ आणि सुंदर ठेवू शकू.

दिल्ली- देहरादून द्रुतगती मार्गाच्या उद्घाटन समारंभात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तराखंड स्थापनेपासूनच्या 26व्या वर्षात पदार्पण करत असताना, या प्रवासाची नोंद घेताना, या शतकाचे तिसरे दशक हे उत्तराखंडचे दशक असेल, या आपल्या आधीच्या घोषणेची आठवण करून दिली. ते म्हणाले की सध्याच्या सरकारच्या धोरणांमुळे आणि लोकांच्या कठोर परिश्रमामुळे, हे युवा राज्य आपल्या विकासाला नवीन पैलु पाडत आहे. हा द्रुतगती मार्ग उत्तराखंडच्या विकासाला नवीन चालना देईल. कोणत्याही राष्ट्राचे भविष्य हे त्याचे रस्ते, महामार्ग, द्रुतगती मार्ग, हवाई मार्ग, रेल्वे मार्ग आणि जलमार्ग यांवर अवलंबून असते. 2014 सालापूर्वी पायाभूत सुविधांवरील खर्च दरवर्षी

**हिवाळी चार धाम यात्रेतील यात्रेकरूंची संख्या 2024 मधील 80,000 वरून 2025 मध्ये 1.5 लाखांपेक्षा जास्त झाली आहे.**

## प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

**12,000**

कोटी रूपयांपेक्षा जास्त खर्चाने विकसित करण्यात आला आहे 213 किलोमीटर लांबीचा, सहा पदरी, प्रवेश-नियंत्रित दिल्ली-देहरादून आर्थिक कॉरिडॉर.

**2.5** तासात देहरादून
पूर्वी 6 तास लागत होते

- या कॉरिडॉरमध्ये आठ प्राणी मार्ग, हत्तींसाठी 200 मीटर लांबीचे दोन भुयारी मार्ग आणि काली मंदिराजवळील 370 मीटर लांबीच्या बोगद्याचा समावेश आहे.
- अखंडित हाय-स्पीड कनेक्टिव्हिटीची खातरजमा करण्यासाठी 10 इंटरचेंजेस, तीन रेल्वे ओव्हरब्रिज (आरओबी), 4 मुख्य पूल आणि रस्त्यालगत 12 सार्वजनिक सुविधांचे बांधकाम.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.



## माजी सैनिकांसाठी कल्याणकारी योजना

सुमारे **1.25** लाख कोटी रूपये
वितरित करण्यात आले आहेत वन रँक वन पेन्शन योजनेअंतर्गत.

**36%**
वाढ करण्यात आली आहे माजी सैनिकांसाठीच्या आरोग्य योजनेच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये.

**70**
वर्षांपेक्षा जास्त वयाच्या माजी सैनिकांसाठी घरपोच औषधांची सेवा.



मुलांच्या शिक्षणासाठीचे अनुदान दुप्पट करण्यात आले

- मुलींच्या विवाहासाठीची मदत 50,000 रूपयांवरून एक लाख रूपयांपर्यंत वाढवण्यात आली.

“

*आपले पर्वत... ही वनक्षेत्रे... देवभूमीचा हा वारसा... ही अत्यंत पवित्र स्थळे आहेत. अशी ठिकाणे स्वच्छ ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. प्लास्टिकच्या बाटल्या... कचऱ्याचे ढिगारे... या देवभूमीचे पावित्र्य भंग करतात. त्यामुळे, देवभूमीची ही ठिकाणे, आपली तीर्थक्षेत्रे, स्वच्छ ठेवा... सुंदर ठेवा.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

2 लाख कोटी रुपयांपेक्षा कमी होता, तो आता सहा पटींपेक्षा जास्त वाढून दरवर्षी 12 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाला आहे. एकट्या उत्तराखंडमध्ये सध्या 2.25 लाख कोटी रूपयांपेक्षा जास्त खर्चाचे पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू आहेत.

दिल्ली- उत्तर प्रदेशचा पश्चिम भाग -उत्तराखंड भागात अलीकडेच अनेक पायाभूत सुविधा आणि वाहतूक प्रकल्प पूर्ण झाले आहेत, ज्यात दिल्ली मेट्रोचा विस्तार, मेरठमध्ये मेट्रो सेवेचा प्रारंभ, दिल्ली-मेरठ नमो भारत रेल्वेचे उद्घाटन, नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि एमआरओ सुविधेचे उद्घाटन यांचा समावेश आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की दिल्ली-देहरादून आर्थिक कॉरिडॉरमुळे शेतकरी आणि पशुपालकांनाही फायदा होईल, ज्यामुळे त्यांचे उत्पादन मोठ्या बाजारपेठांमध्ये अधिक वेगाने पोहोचू शकेल. गाझियाबाद, बागपत, बारौत, शामली आणि सहारनपूरमधून जाणारा हा कॉरिडॉर उत्तर प्रदेशातील या शहरांना पुनरुज्जीवित करण्यासही मदत करेल. पंतप्रधान मोदी म्हणाले, “हा केवळ एक रस्ता नाही, या संपूर्ण भागात व्यापार, उद्योग, गोदाम आणि लॉजिस्टिक्ससाठी नवीन संधी निर्माण करणारा हा राजमार्ग आहे.”

या कॉरिडॉरच्या उद्घाटनामुळे देहरादून, हरिद्वार, ऋषिकेश, मसुरी आणि चार धाम यात्रेचे मार्ग अधिक सुलभ होतील. हिवाळी पर्यटन, हिवाळी खेळ आणि डेस्टिनेशन वेडिंगसाठी उत्तराखंड हे एक महत्वाचे ठिकाण म्हणून नावारूपाला येत आहे. उत्तराखंडच्या अर्थव्यवस्थेत पर्यटनाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे, ज्यामुळे हा कॉरिडॉर अत्यंत महत्त्वाचा ठरतो. पर्यटनातील वाढीमुळे हॉटेल्स, ढाबे, टॅक्सी, होमस्टे या सर्वांना मिळून संपूर्ण स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. ■

१ मे, कामगार दिन विशेष

# भारतासाठी आता श्रमेव जयते

'सत्यमेव जयते' या घोषणेमध्ये जशी ताकत आहे, त्याचप्रमाणे राष्ट्राच्या विकासासाठी श्रमेव जयते या घोषणेमध्ये सुद्धा शक्ती आहे. म्हणूनच 'श्रमेव जयते' या भावनेसह केंद्र सरकार श्रमाचा सन्मान आणि कामगारांच्या समृद्धीसाठी कटिबद्ध आहे. कामगार वर्गाला समृद्ध करण्यासाठी सरकारने चार कामगार कायद्यांच्या अंमलबजावणीच्या माध्यमातून सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासह इतर उपाययोजनाही राबवल्या आहेत. 1 मे रोजी आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त, कामगारांना सक्षम करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांबाबत सादर आहे एक विशेष अहवाल...



कामगार आणि उद्योगांचे यश यांच्यात एक घनिष्ठ संबंध आहे. दोघेही एकमेकांशिवाय भरभराटीस येऊ शकत नाहीत. उद्योग विकसित होतात, तेव्हा ते कामगारांसाठी शाश्वत रोजगार, योग्य वेतन आणि सामाजिक सुरक्षा निर्माण करतात. त्याचप्रमाणे, प्रेरित आणि सुरक्षित मनुष्यबळ उत्पादकता आणि नवनिर्मितीला चालना देते, ज्यामुळे उद्योगाचे दीर्घकालीन अस्तित्व सुनिश्चित होते. संघटित आणि असंघटित अशा दोन्ही क्षेत्रांतील कामगारांना त्यांच्या कष्टासाठी 'समान आदर आणि हक्क' मिळावेत, याची खातरजमा करण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध आहे. विश्वनाथ धामच्या उद्घाटनावेळी कामगारांवर पुष्पवृष्टी करून, प्रयागराज कुंभमेळ्यात स्वच्छता कर्मचाऱ्यांचे पाय धुऊन आणि नवीन संसदेत कामगारांसाठी एक विशेष दालन स्थापन करून सर्वोच्च नेतृत्व देशाच्या विकासातील 'श्रमेव जयते'च्या शक्तीचा सन्मान करत आहे, यावरून सुद्धा हे सहज समजू शकते आहे.

## सरकारने लागू केल्या चार कामगार संहिता

केंद्र सरकारने 29 केंद्रीय कामगार कायद्यांमधील प्रासंगिक तरतुदींचे एकत्रीकरण, सुलभता आणि सुसूत्रीकरण करून, 21 नोव्हेंबर 2025 पासून वेतन संहिता 2019, औद्योगिक संबंध संहिता 2020, सामाजिक सुरक्षा संहिता 2020, आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कार्यस्थिती संहिता 2020 अशा चार कामगार संहिता लागू केल्या आहेत. कामगार नियमांचे आधुनिकीकरण करून, कामगारांच्या हिताची जास्त काळजी घेऊन, आणि कामगार परिसंस्थेला बदलत्या कार्यविश्वाशी जुळवून घेणारे हे ऐतिहासिक पाऊल भविष्यासाठी सज्ज मनुष्यबळ आणि एका मजबूत, उद्योगस्नेही अर्थव्यवस्थेचा पाया घालणारे आहे. देशातील अनेक कामगार कायदे स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्योत्तर सुरुवातीच्या काळात (1930 - 1950) लागू करण्यात आले होते, जेव्हा अर्थव्यवस्था आणि कार्यविश्व प्रत्यक्षात खूप वेगळे होते.

## ई-श्रम पोर्टल – वन स्टॉप सॉल्यूशन

श्रम आणि रोजगार मंत्रालयाने असंघटित कामगारांचा आधार-सत्यापित राष्ट्रीय डेटाबेस तयार करण्यासाठी 26 ऑगस्ट 2021 रोजी ई-श्रम पोर्टल सुरू केले. विविध सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी योजनांना एकाच पोर्टलमध्ये एकत्रित करून 21 ऑक्टोबर 2024 रोजी ई-श्रम हे 'वन स्टॉप सॉल्यूशन' सुरू करण्यात आले. यामध्ये आतापर्यंत 14 सामाजिक योजना समाविष्ट करण्यात आल्या आहेत. ही सुविधा ई-श्रम कार्डधारकांचा यंत्रणेतील प्रवेश सुलभ करते.

## नवीन संसद भवनाच्या बांधकामात सहभागी झालेल्या कामगारांचा सन्मान

28 मे 2023 रोजी, नवीन संसद भवन राष्ट्राला समर्पित करण्याच्या कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बांधकाम कामगारांच्या एका गटाची भेट घेतली. या संसद भवनाच्या बांधकामात अंदाजे 60,000 कामगार कार्यरत होते. पंतप्रधान मोदी म्हणाले, 'मला आनंद आहे की त्यांच्या श्रमाला समर्पित एक डिजिटल दालन संसदेत तयार करण्यात आले आहे, जे कदाचित जगातील पहिलेच असेल. संसदेच्या बांधकामातील त्यांचे योगदान आता अमर झाले आहे.



*"आमचा कामगार हा श्रमयोगी आहे. आपल्या अनेक समस्या एका श्रमयोगीमुळे सुटतात, आपल्या अनेक गरजा पूर्ण होतात. त्यामुळे जोपर्यंत आपण त्याच्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलत नाही, जोपर्यंत त्याच्याबद्दलच्या आपल्या भावना बदलत नाहीत, तोपर्यंत आपण त्याला समाजात आदर देऊ शकणार नाही."*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## विश्वनाथ धाम येथे कामगारांवर पुष्पवृष्टी

13 डिसेंबर 2021 रोजी वाराणसी येथील श्री काशी विश्वनाथ कॉरिडोरच्या उद्घाटनावेळी पंतप्रधान मोदींनी बांधकाम कामगारांवर पुष्पवृष्टी केली. त्यांनी त्यांच्यासोबत भोजनही केले. आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी म्हणाले, "आज या भव्य संकुलाच्या बांधकामात योगदान देणाऱ्या सर्व कष्टकरी बंधू-भगिनींप्रति मी कृतज्ञता व्यक्त करू इच्छितो. कोविड-19 साथरोगाच्या काळातही त्यांनी काम थांबवले नाही. मला या सहकारी कामगारांना भेटण्याची आणि त्यांचे आशीर्वाद घेण्याची संधी मिळाली."



## कामगारांचे आभार

13 फेब्रुवारी 2026 रोजी सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवन 1 आणि 2 च्या उद्घाटनावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कामगारांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले, "या इमारतींच्या बांधकामात सहभागी असलेल्या सर्व अभियंत्यांप्रति आणि कामगारांप्रति मी कृतज्ञता व्यक्त करतो."







## कुंभमेळ्यात पाय धुतले

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2019 मध्ये कुंभमेळ्यात काम करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांचा आणि स्वच्छाग्रहींचा सन्मान केला आणि त्यांच्याप्रती आदर व्यक्त केला. इतकेच नाही, तर त्यांनी पाच स्वच्छता कर्मचाऱ्यांचे पाय धुतले आणि पुसले. पंतप्रधानांनी त्यांच्याशी संवादही साधला.

## पंतप्रधान मोदींचा बांधकाम कामगारांशी संवाद

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 26 सप्टेंबर 2021 रोजी सायंकाळी नवीन संसद भवनाच्या बांधकाम स्थळाला भेट दिली. त्यांनी कामाचा आढावा घेतला, कामाच्या प्रगतीची चौकशी केली आणि प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्याच्या गरजेवर भर दिला. त्यांनी बांधकाम कामगारांशी संवाद साधला आणि त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. पंतप्रधानांनी सर्व बांधकाम कामगारांना कोविड-19 साठी पूर्णपणे लसीकरण करण्याचे निर्देश दिले. सर्व कामगारांची मासिक आरोग्य तपासणी करण्याचे निर्देशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. बांधकाम पूर्ण झाल्यावर, बांधकाम स्थळावर काम करणाऱ्या सर्व कामगारांची नावे, ठिकाणे, छायाचित्रे आणि वैयक्तिक तपशिलांसह एक डिजिटल संग्रह तयार केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. बांधकामातील त्यांच्या योगदानाची दखल घेतली पाहिजे. या प्रयत्नातील त्यांची भूमिका आणि सहभाग मान्य करणारे प्रमाणपत्रही सर्व कामगारांना दिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.





## कामगारांना आता 125 दिवसांच्या रोजगाराची हमी

विकसित भारत - रोजगार आणि जीविका मिशन (ग्रामीण) (विकसित भारत जी राम जी) अधिनियम 2025, हा हमीचा आराखडा बळकट आणि विस्तारित करतो. हा अधिनियम प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला प्रति आर्थिक वर्ष किमान 125 दिवसांच्या मजुरीच्या रोजगाराची वैधानिक हमी देतो, जी पूर्वी 100 दिवस होती. यामुळे ग्रामीण उत्पन्न आणि उपजीविकेची सुरक्षा वाढेल. यामध्ये एका उत्तम वैधानिक बेरोजगारी भत्त्याचाही समावेश आहे, जो विहित वेळेत काम उपलब्ध न झाल्यास दिला जाईल. त्याचे दर अधिसूचित मजुरी दराशी जोडलेले असतील. हा अधिनियम कौटुंबिक उत्पन्नाची स्थिरता सक्षम करतो, ज्यामुळे ग्रामीण कुटुंबांसाठी अन्न सुरक्षा आणि उपभोगाची स्थिरता सुद्धा खात्रीशीर होते.

# स्थलांतरित कामगारांसाठी कल्याणकारी योजना

*कौशल्य विकास, वित्तीय साहाय्य आणि सामाजिक सुरक्षेच्या संधींपर्यंत पोहोच प्रदान करून श्रमिकांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी रोजगार योजना सुरू केल्या गेल्या आहेत. श्रमिकांना सक्षम करणे, त्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ व्हावी यासाठी साहाय्य, मदत पुरवणे, हा या उपायांचा उद्देश आहे. यातून त्यांच्या भविष्यासाठी अधिक सुरक्षितता सुनिश्चित केली जाते. अशाच काही योजनांबद्दल जाणून घेऊया :*

## पीएम स्वनिधी

दिनांक 1 जून 2020 रोजी सुरू करण्यात आलेल्या या योजनेचा उद्देश पदपथावरील विक्रेत्यांना कुठल्याही तारणाशिवाय खेळते भांडवल कर्ज उपलब्ध करून देण्याचा आहे. कोविड 19 महामारीचा मोठा परिणाम सोसणाऱ्या विक्रेत्यांना आपला व्यवसाय पुन्हा सुरू करण्यासाठी मदत म्हणून ही योजना सुरू करण्यात आली होती.

## आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 23 सप्टेंबर 2018 रोजी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (एबी पीएम-जेएवाय) सुरू केली. देशातील सर्वाधिक वंचित लोकांना आरोग्य सुरक्षा प्रदान करून सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा देणे, हा या योजनेचा उद्देश आहे.

## प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना (पीएमएसवायएम)


श्रम आणि रोजगार मंत्रालयाद्वारे 15 फेब्रुवारी 2019 रोजी सुरू करण्यात आलेल्या या योजनेचा उद्देश स्थलांतरित मजुरांसह असंघटित क्षेत्रातल्या कामगारांना 60 वर्ष झाल्यानंतर किमान हमी असलेले निवृत्तीवेतन प्रदान करणे, हा आहे.

## प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना (पीएमजीकेएवाय)

अन्न सुरक्षेविषयी सरकारची वचनबद्धता प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेद्वारे दृढ करण्यात आली आहे. या योजनेची मुदत 1 जानेवारी 2024 पासून पुढील पाच वर्षांसाठी वाढवण्यात आली आहे. ही योजना स्थलांतरित मजुरांसह दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना मोफत अन्नधान्य उपलब्ध करते.

## कामगार दिनाचे महत्त्व

जगभरातल्या परिश्रमी आणि समर्पित वृत्तीने काम करणाऱ्यांच्या सन्मानार्थ आणि कामगारांच्या हक्कांविषयी जागरूकतेसाठी दरवर्षी 1 मे रोजी कामगार दिवस असतो. कामगार दिवस हा केवळ सुट्टीचा दिवस नाही, तर हा कामगारांच्या योगदानाचा सन्मान करण्याचा दिवस आहे. या दिवशी आपण त्यांच्या संघर्षाचे स्मरण करतो. कामगारांच्या अधिकारांबाबत जनता आणि कामगारांमध्ये जागृती केली जाते.






# राज्यसभेमध्ये जवळपास 110% आणि लोकसभेमध्ये 93% कामकाज

*संसदेच्या विशेष अधिवेशनाच्या अंतिम दिवशी 18 एप्रिल रोजी लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज अनिश्चित काळासाठी संस्थगित करण्यात आले. यासोबतच संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सांगता झाली. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी लोकसभेचे कामकाज स्थगित करत अधिवेशनाच्या सांगतेची घोषणा केली. तर राज्यसभेचे सभापती उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी त्यानंतर थोड्या वेळातच वरिष्ठ सदनाचे कामकाज स्थगित केले. अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान सदनात अनेक विधेयके मंजूर झाली. राज्यसभेत जवळपास 110 आणि लोकसभेत 93% कामकाज झाले.*

## 18 व्या लोकसभेचे 7 वे अधिवेशन संस्थगित

लोकसभेचे सातवे अधिवेशन 28 जानेवारी 2026 रोजी सुरू झाले. यात सुमारे 151 तास आणि 42 मिनिटांच्या एकूण 31 बैठका झाल्या. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे 28 जानेवारी 2026 रोजी दोन्ही सदनातल्या सदस्यांसमोर अभिभाषण झाले आणि वित्तमंत्र्यांनी 1 फेब्रुवारी 2026 रोजी सदनात वर्ष 2026-2027 साठीचा केंद्रीय अर्थसंकल्प मांडला. केंद्रीय अर्थसंकल्प 2026-2027 वर सुमारे 13 तास चर्चा चालली, 63 सदस्यांनी त्यात भाग घेतला. वित्तमंत्र्यांनी 11 फेब्रुवारी, 2026.रोजी चर्चेला उत्तर दिले. 25 मार्च 2026 रोजी सभागृहाने वित्त विधेयक मंजूर केले.

- सर्व सदस्यांच्या सहकार्यामुळे, लोकसभेच्या या अधिवेशनाची उत्पादकता अंदाजे 93 टक्के राहिली. या अधिवेशनादरम्यान 12 सरकारी विधेयके सादर करण्यात आली आणि एकूण 9 विधेयके मंजूर करण्यात आली.
- सदनाने 16 आणि 17 एप्रिल 2026 रोजी, 'संविधान (131 वी सुधारणा) विधेयक,2026', 'केंद्रशासित प्रदेश कायदे (सुधारणा) विधेयक, 2026' आणि 'मतदारसंघ फेररचना विधेयक, 2026' यांवर चर्चा केली. ही चर्चा 21 तास 27 मिनिटे चालली. यात 131 सदस्यांनी आपले विचार मांडले.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 23 मार्च, 2026 रोजी, पश्चिम आशियात सध्या सुरू असलेला संघर्ष आणि भारताला भेडसावणारी आव्हाने याविषयी निवेदन दिले.
- नियम 193 अन्वये 30 मार्च, 2026 रोजी, "देशाला डाव्या विचारसरणीच्या अतिरेकापासून मुक्त करण्याचे प्रयत्न" या विषयावर अल्पकालीन चर्चा झाली.





## राज्यसभेच्या 270 व्या अधिवेशनाच्या समारोपबरोबरच संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सांगता

राज्यसभेच्या 270 व्या अधिवेशनाच्या सांगतेसोबतच संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचीही सांगता झाली. या अधिवेशनात मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदी, अनुमोदित धोरणे आणि निर्धारित प्राधान्ये देशाच्या प्रत्येक नागरिकाच्या जीवनावर थेट परिणाम घडवतात. अधिवेशनाच्या सुरुवातीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावर आभारदर्शक प्रस्तावावर चार दिवस चर्चा झाली. यात 79 सदस्यांनी भाग घेतला. आभारदर्शक चर्चेला पंतप्रधान मोदी यांनी दिलेल्या उत्तरामुळे, दोन्ही बाजूच्या खासदारांनी उपस्थित केलेल्या अनेक मुद्द्यांविषयी स्पष्टता निर्माण केली तसेच त्यासाठी अधिक संदर्भ देण्यात आले.

- चार दिवस चाललेल्या या चर्चेत 97 सदस्यांनी भाग घेतला.याव्यतिरिक्त सदनात दोन प्रमुख मंत्रालयांच्या कामकाजावरही सविस्तर चर्चा झाली.
- भारत-अमेरिका द्विपक्षीय व्यापार करारासंदर्भात वाणिज्य आणि उद्योग मंत्र्यांनी, तसेच पश्चिम आशियातील परिस्थितीबाबत परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी आपणहून दिलेल्या निवेदनांची सदनाने दखल घेतली.
- पश्चिम आशियामध्ये सुरू असलेला संघर्ष आणि परिणामी भारताला भेडसावणारी आव्हाने, विशेषतः ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासंदर्भात पंतप्रधान मोदी यांनी निवेदन दिले.
- अधिवेशनादरम्यान सदस्यांनी 50 'खाजगी विधेयके' सादर केली.
- सदनात 157:40 तास आणि 109.87% कामकाज झाले.



# विश्वास आधारित व्यवस्थेला बळकटी देणारे विधेयक

*जन विश्वास (तरतुदींमधील सुधारणा) विधेयक 2026, लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांनी मंजूर केले. या विधेयकाद्वारे 23 मंत्रालयांच्या अखत्यारीतील 79 केंद्रीय कायद्यांमध्ये समाविष्ट 784 तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली. यातील 717 तरतुदींचे फौजदारी स्वरूप रद्द करून व्यवसाय सुलभता वृद्धिंगत करण्याचा, तसेच उर्वरित 67 तरतुदींमध्ये सुधारणा करून जीवन सुगमता उंचावण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यामुळे संतुलित आणि विश्वासावर आधारित नियामक व्यवस्थेला चालना मिळेल. व्यक्ती आणि व्यवसायांवरील अनुपालनाचा बोजा कमी करण्यासाठी किरकोळ स्वरूपाचे गुन्हे फौजदारी कक्षेतून वगळण्याचा, तसेच विद्यमान कायदेशीर तरतुदींना तर्कसंगत बनवण्याचा हा प्रयत्न आहे.*

## विधेयकाचे चार प्रमुख स्तंभ

चार प्रमुख स्तंभावर आधारित हे विधेयक अनुपालनाला प्रोत्साहन देणारे नियामक वातावरण तयार करण्याच्या उद्देशाने मंजूर करण्यात आले आहे. कायदेशीर यंत्रणांसह नागरिक आणि व्यवसायांचा दैनंदिन संवाद सुलभ आणि सोपा व्हावा, या उद्देशाने ते तयार करण्यात आले आहे.

- शिक्षेपूर्वी इशारा
- प्रमाणबद्ध दंड
- त्वरित आणि न्याय्य निवाडा
- गतिमान दंड प्रणाली



## किरकोळ किंवा प्रक्रियात्मक उल्लंघनासाठी आता कठोर दंड नाही

**जन विश्वास (तरतुदींमधील सुधारणा) विधेयक 2026 मध्ये फौजदारी तरतुदी हटवून अधिक सामंजस्यपूर्ण, नागरिक-स्नेही आणि सोप्या अनुपालनात त्यांचे रूपांतर करण्यात आले आहे. लोकांना अनावश्यक कायदेशीर बोज्यातून दिलासा मिळावा, हा यामागचा हेतू आहे...**

- 317 तरतुदींचे रूपांतर फौजदारी दंडातून दिवाणी दंडात करण्यात आले.
- 158 तरतुदींमधून दंड पूर्णपणे काढून टाकण्यात आला.
- 113 तरतुदींमध्ये कारावास आणि दंड काढून टाकून दिवाणी दंड लागू करण्यात आला.
- 57 तरतुदींमधून कारावास आणि दंड दोन्ही काढून टाकण्यात आला.
- 63 तरतुदींमध्ये पहिल्यांदाच चूक झाल्यास केवळ इशारा/नोटीस देण्याची तरतूद करण्यात आली.
- 17 तरतुदींमध्ये कारावासाची शिक्षा कमी करण्यात आली.
- 17 तरतुदींमध्ये तडजोडीची तरतूद करण्यात आली
- 29 तरतुदींमधून कारावासाची शिक्षा काढून टाकण्यात आली
- 2 तरतुदींमध्ये कारावासाचे रूपांतर दिवाणी दंडात करण्यात आले
- 1 तरतुदीमध्ये कारावासाचे स्वरूप तर्कसंगत करण्यात आले
- 6 तरतुदींमध्ये गुन्ह्यांची व्याप्ती मर्यादित करण्यात आली

## लोकसभेत मंजूर झाली काही महत्त्वपूर्ण विधेयके

**अर्थसंकल्पीय अधिवेशनात लोकसभेत 12 सरकारी विधेयके सादर करण्यात आली आणि 9 विधेयके मंजूर करण्यात आली. मंजूर झालेली काही महत्त्वपूर्ण विधेयके पुढीलप्रमाणे :**

1. औद्योगिक संबंध संहिता (सुधारणा) विधेयक, 2026
2. तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) सुधारणा विधेयक, 2026
3. वित्त विधेयक, 2026
4. दिवाळखोरी आणि नादारी संहिता (सुधारणा) विधेयक, 2026
5. आंध्र प्रदेश पुनर्रचना (सुधारणा) विधेयक, 2026
6. जन विश्वास (तरतुदींमधील सुधारणा) विधेयक, 2026
7. केंद्रीय सशस्त्र पोलीस दले (सामान्य प्रशासन) विधेयक, 2026

## हरिवंश यांची राज्यसभेच्या उपसभापतीपदी निवड

अधिवेशनात हरिवंश यांची तिसऱ्यांदा राज्यसभेचे उपसभापती म्हणून निवड झाली. पंतप्रधान मोदी यांनी 17 एप्रिल रोजी राज्यसभेला संबोधित करताना, हरिवंश यांची सलग तिसऱ्यांदा राज्यसभेचे उपसभापती म्हणून निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन केले. हरिवंश यांची निवड, सदनाचा त्यांच्यावरील दृढ विश्वास आणि त्यांचा अनमोल अनुभव दर्शवतो, असे पंतप्रधानांनी त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीचा उल्लेख करताना सांगितले. सलग तिसऱ्यांदा निवड होणे, हा त्यांच्या अनुभवाचा, सर्वसमावेशक दृष्टिकोनाचा आणि सन्माननीय कार्यशैलीचा सभागृहाने केलेला गौरवच ठरतो.

## संसदेत आवाजी मतदानाने सीएपीएफ (सामान्य प्रशासन)विधेयक 2026 मंजूर

लोकसभेने 2 एप्रिल रोजी, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (सामान्य प्रशासन) विधेयक, 2026 आवाजी मतदानाने मंजूर केले. राज्यसभेने हे विधेयक यापूर्वीच मंजूर केले होते. या विधेयकात सीएपीएफ अर्थात केंद्रीय सशस्त्र पोलीस दलात महानिरीक्षक श्रेणींत 50 टक्के पदे आणि अतिरिक्त महासंचालक श्रेणीची किमान 67 टक्के पदे प्रतिनियुक्तीद्वारे भरण्याची तरतूद आहे. त्याचसोबत विशेष महासंचालक आणि महासंचालक या श्रेणीची सर्व पदे केवळ प्रतिनियुक्तीद्वारेच भरली जातील. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलातील ग्रुप ए जनरल ड्युटी अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांच्या भरती व सेवाशर्तींशी संबंधित सामान्य नियमांचे नियमन करणे, हा या विधेयकाचा मुख्य उद्देश आहे.

# तत्त्वज्ञान आणि तंत्रज्ञान दोहोंनी समृद्ध कर्नाटक

*कर्नाटक तत्त्वज्ञान आणि तंत्रज्ञान दोहोंनी समृद्ध आहे. तत्त्वज्ञानातील अंतर्दृष्टी आणि तंत्रज्ञानाची ताकद दोन्ही येथे आहे. कर्नाटक येथील श्री आदि चुंचनगिरी महासंस्थान मठ, आपल्या गौरवशाली आध्यात्मिक परंपरेचे जीवंत प्रतीक आहे. या मठाद्वारे केली जाणारी समाजसेवा खरोखरच प्रेरणादायी आहे. कर्नाटकमधल्या मांड्या येथे असलेल्या या मठात बांधण्यात आलेल्या श्री गुरु भैरवैक्य मंदिराचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 15 एप्रिल रोजी उद्घाटन केले. तत्पूर्वी, त्यांनी ज्वाला पीठ येथे सभेला संबोधित केले आणि श्री कालभैरव मंदिरात पूजा-अर्चना केली.*

> आपल्या गुरूच्या सन्मानार्थ श्री गुरु भैरवैक्य मंदिर उभारणे केवळ एक वास्तुनिर्माण नाही तर हे भावनेला मूर्त रूप देणे आहे. येणाऱ्या काळात हे स्थान निश्चितपणे सेवा, साधना आणि प्रेरणेचे केंद्र बनेल.
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



भारत हजारो वर्षांपासून चालत आलेली एक जीवंत परंपरा आहे. परंपरा इतक्या प्रदीर्घ काळापर्यंत निरंतर सुरू असल्याची जगात अशी खूपच कमी उदाहरणे आढळतात. जेव्हा आपण श्री आदि चुंचनगिरी महासंस्थानच्या मठाला भेट देतो तेव्हा या निरंतरतेचे साक्षात दर्शन घडते. समाजात वेळोवेळी अशा महान विभूतींचा जन्म झाला आहे, ज्यांचे मार्गदर्शन केवळ आध्यात्मिक म्हणून सीमित नसते. जगतगुरू श्री श्री श्री डॉ. बालगंगाधरनाथ महास्वामीजीदेखील असेच एक दिव्य व्यक्तिमत्त्व होते.

## पंतप्रधानांचे विकसित कर्नाटक आणि विकसित भारतासाठी नऊ संकल्प

1. **पाणी** : पाण्याची बचत आणि त्याच्या अधिक प्रभावी व्यवस्थापनाचा संकल्प घेऊ.
2. **निसर्ग** : एक पेड माँ के नाम, आपल्या आईच्या सन्मानार्थ झाड अवश्य लावा.
3. **स्वच्छता**: गाव असो किंवा शहर, प्रत्येक ठिकाणी स्वच्छता राखा, ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी-कर्तव्य आहे.
4. **स्वदेशी**: भारतीय उत्पादने वापरा; 'वोकल फॉर लोकल' मंत्र अंगीकारा.
5. **स्वदेशी पर्यटन**: आपला देश जाणून घेऊ, देशांतर्गत पर्यटनाला चालना देऊ.
6. **शेतकरी** : शेतकऱ्यांनी रसायनमुक्त, नैसर्गिक शेतीचा अवलंब करावा.
7. **पौष्टिक आहार**: युवा पिढीनेही आपल्या आहारात भरड धान्यांचा समावेश करावा. लठ्ठपणाच्या आव्हानावर मात करण्यासाठी आपल्या आहारात तेलाचे प्रमाण 10टक्क्यांनी कमी करण्याचा प्रयत्न करा.
8. **खेळ आणि सुदृढपणा** : आपल्या दैनंदिन जीवनात समावेश करा.
9. **सेवाभाव** : गरजूंची सेवा केल्याने समाज बळकट होतो, यातून जीवन एका मोठ्या उद्देशाशी जोडले जाते.

## पंतप्रधान मोदी यांची राष्ट्रीय पक्षी मोराशी मैत्री

जगतगुरू श्री श्री श्री डॉ. बालगंगाधरनाथ महास्वामीजी यांची करुणा केवळ मनुष्यांपुरता सीमित नव्हती, तर ती सर्व जीवांसाठी होती, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. मोरांच्या संरक्षणासाठी त्यांनी सामाजिक आंदोलन उभारले. आपल्या सांस्कृतिक चेतनेशीही हे संबंधित आहे. मोर आपला राष्ट्रीय पक्षी आहे. भगवान सुब्रमण्यम यांचे वाहन आहे. आपल्या सरकारी निवासातदेखील पुष्कळ मोर असून काहींसोबत चांगली मैत्रीदेखील झाली आहे, असे त्यांनी सांगितले. मोर शांत आणि सुंदर पक्षी आहे. ■

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.



# ज्यांना घाबरून पळून गेले होते पाकिस्तानी सैन्य

*1971 च्या भारत-पाकिस्तान युद्धात मेजर होशियार सिंह यांचे शौर्य पाहून शत्रूदेखील आश्चर्यचकित झाले होते. गोळ्यांचा वर्षाव, भेदक रणगाडे ... चहूबाजूंनी मृत्यूचा धोका, तरीही युद्धभूमीवर ते तळ ठोकून राहिले. हल्ल्यात गंभीर जखमी होऊनही आपल्या सैन्याचे मनोबल ते उंचावत राहिले. त्यांचे शौर्य आणि पराक्रम पाहून शत्रूने पळ काढला. युद्धभूमीवर शत्रूला पराभूत करणाऱ्या, परमवीर चक्र सन्मानित मेजर होशियार सिंह यांची साहसी गौरवगाथा युवांना सदैव मातृभूमीच्या सेवेसाठी प्रेरणा देत राहील...*

**जन्म : 5 मे, 1937 ■ मृत्यू : 6 डिसेंबर, 1998**

“शूरवीर केवळ एकदाच मरतात. तुम्हाला युद्ध करायचेच आहे. तुम्हाला विजयी व्हायचे आहे.” युद्धभूमीत आपल्या सैनिकांचे मनोबल वाढवणारे हे शब्द आहेत बसंतर येथे आघाडी सांभाळणारे मेजर होशियार सिंह यांचे. त्यांच्या नेतृत्वात भारतीय सैनिकांनी शत्रूला धूळ चारली. 5 मे 1937 रोजी हरियाणामध्ये जन्मलेले होशियार सिंह हे अत्यंत शिस्तप्रिय होते आणि अत्यंत निश्चयी होते. अभ्यासात उत्कृष्ट कामगिरी करण्यासोबतच, खेळांमध्येही ते आघाडीवर होते. 1957 मध्ये होशियार सिंह 'जाट रेजिमेंट'मध्ये दाखल झाले आणि मग 3 ग्रेनेडियर्स या पायदळाच्या बटालियनमध्ये ते अधिकारी झाले.

1971 च्या भारत-पाक युद्धादरम्यान, 3 ग्रेनेडियर्स बटालियनवर बसंतर नदीवर पूल उभारण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. हा परिसर नदीच्या दोन्ही तीरांवर भूसुरुंगांनी मोठ्या प्रमाणावर भरलेला होता. त्यानंतर, त्यांच्या तुकडीला तो पूल ओलांडून 'जरपाल' हा लष्करी बालेकिल्ला हाती घेण्याचा आदेश देण्यात आला. या ठिकाणी शत्रुसैन्याची स्थिती मजबूत होती. 15 डिसेंबर 1971 रोजी, 3 ग्रेनेडियर्सच्या एका कंपनीचे नेतृत्व करत ते आगेकूच करत होते. शत्रूच्या तुफान गोळीबारासमोर ते डगमगले नाहीत. भीषण चकमकीनंतर लक्ष्य साध्य करण्यात ते यशस्वी झाले. शत्रूसैन्याने 16 डिसेंबरला तीन वेळा हल्ला केला. प्रचंड गोळीबार आणि रणगाड्यातून मारा यांची पर्वा न करता ते आपल्या सैनिकांना आघाडीवर तळ ठोकून उभे राहण्यासाठी आणि शत्रूला नामोहरम करण्यासाठी प्रोत्साहित करत राहिले. त्यांच्या साहस आणि नेतृत्वाने प्रेरित होऊन त्यांच्या कंपनीने सगळे हल्ले हाणून पाडले. शत्रूची मोठी हानी झाली. शत्रूने 17 डिसेंबरला मोठ्या तोफांनी पुन्हा एकदा हल्ला केला. शत्रूच्या गोळ्यांनी गंभीररीत्या जखमी होऊनही आपल्या जीवाची पर्वा न करता ते एका खंदकातून दुसऱ्या खंदकात फिरत राहिले आणि सैनिकांचे मनोबल उंचावत राहिले. दरम्यान शत्रूच्या गोळ्यामुळे त्यांचा मीडिअम मशीन गनचालक जखमी झाला. मशीनगनचे महत्त्व जाणून असलेले मेजर होशियार सिंह स्वतः तिथे पोहोचले आणि त्यांनी आघाडी सांभाळली. शत्रूचे मोठे नुकसान झाले. शत्रूच्या आक्रमणाला सर्वशक्तीनिशी उत्तर देऊन त्यांनी शत्रूला मागे हटायला लावले.

शत्रूसैन्याने आपल्या कमांडिंग ऑफिसरसह 85 मृतांना मागे ठेवत तिथून माघार घेतली. तर संपूर्णरित्या जखमी असूनही मेजर होशियार सिंह यांनी युद्धविरामापर्यंत तिथून हलण्यास नकार दिला. त्यांचे उच्चकोटीचे शौर्य, दुर्दम्य मनोबल आणि भारतीय सैन्याच्या उच्च परंपरेला अनुरूप निडर नेतृत्वासाठी त्यांना त्यांच्या हयातीत परमवीर चक्राने सन्मानित करण्यात आले. 6 डिसेंबर 1998 रोजी त्यांचे निधन झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 23 जानेवारी 2023 रोजी अंदमान आणि निकोबार द्वीपसमूहातील 21 सर्वात मोठ्या अनाम बेटांचे नामकरण 21 परमचक्र विजेत्यांच्या नावावरून केले. यातील एक बेट परमवीर चक्र विजेते मेजर होशियार सिंह यांना समर्पित आहे. ■



Narendra Modi
@narendramodi

आपली नारीशक्ती सशक्त भारताची ओळख आहे. देशातील माता-भगिनी आणि मुली आपली अतूट संकल्पशक्ती, निष्ठा आणि सेवाभाव यांद्वारे आज प्रत्येक क्षेत्रात भारताचा गौरव वृद्धिंगत करत आहेत.



Rajnath Singh
@rajnathsingh

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात आजचा दिवस अत्यंत दुर्दैवी आहे. संसदेच्या विशेष अधिवेशनात रालोआ सरकारद्वारे लोकसभेत 131 वे घटनादुरुस्ती विधेयक महिलांना एक तृतीयांश आरक्षण देण्यासाठी मांडण्यात आले होते. काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडी आघाडीने आज लोकसभेत या विधेयकाच्या विरोधात मतदान करून आपले महिलाविरोधी रूप दाखवून दिले आहे.



Amit Shah
@AmitShah

इतिहास हजारो वर्ष योगदान आणि विघ्न दोन्हीचे स्मरण ठेवतो....
रामसेतूतील खारीचे योगदान असो किंवा हवन-होमामध्ये हाडे टाकणाऱ्या ताडकाचे विघ्न.



Nitin Gadkari
@nitin_gadkari

भारतीय लोकशाहीच्या इतिहासातला दुर्दैवी दिवस ...
संसदेच्या विशेष अधिवेशनात आज महिलांना एक तृतीयांश आरक्षण देण्यासाठी लोकसभेत मांडण्यात आलेले 131 वे घटनादुरुस्ती विधेयक मंजूर न होणे, यातून विरोधी पक्षांची महिलाविरोधी मानसिकता दिसून येते.

Har Ghar Swadeshi
Ghar-Ghar Swadeshi

Nirmala Sitharam...
@nsitharaman

लोकसभेत गृहमंत्र्यांनी हे स्पष्ट सांगितले. विरोधी पक्ष या मुद्द्यावर अधिक जोर देत असताना गृहमंत्री @AmitShah यांनी आपण तासाभरात (प्रक्रियेसाठी अध्यक्षांनी सभागृहाचे कामकाज स्थगित करून ) दुरुस्तीच्या माध्यमातून हा मुद्दा घालण्यास तयार असल्याचे सांगितले. तरीही विरोधी पक्षांनी महिला आरक्षणाला विरोध करण्याचे ठरवलेच होते. 'इंडी' आघाडीची दांभिकता उघड झाली आहे.



Arjun Ram Meghwal
@arjunrammeghwal

नारी सन्मानाबाबत संसदेत विरोधी पक्षांच्या निंदनीय दृष्टिकोनामुळे आज मातृशक्तीची स्वप्ने भंग पावली आहेत आणि आजचा दिवस भारतीय लोकशाहीसाठी अत्यंत दुर्दैवी ठरला आहे.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात, महिलांचे अधिकार आणि भागीदारी बळकट करणाऱ्या नारीशक्ती वंदन अधिनियमात सुधारणा करणाऱ्या विधेयकाला विरोधकांनी पाठिंबा दिला नाही.



महिला आरक्षण से जुड़ा बिल
पारित होने के लिए जरूरी थे 352 वोट | मिले 298 | विरोध में 230
12 साल में पहली बार कोई विधेयक पास नहीं करा पाई मोदी सरकार
संविधान संशोधन विधेयक लोकसभा में गिरा

ऑस्ट्रिया के चांसलर और प्रधानमंत्री मोदी के बीच वार्ता के दौरान छह समझौतों पर हस्ताक्षर
भारत-ऑस्ट्रिया सेमीकंडक्टर, रक्षा क्षेत्र में सहयोग बढ़ाएंगे

प्रधानमंत्री मोदी और गृह मंत्री शाह ने भी दी श्रद्धांजलि
जीवन में हमेशा गूंजते रहेंगे आशा ताई के गीत

पंचायती राज में 14 लाख से अधिक महिलाएं सक्रिय, 50% तक भागीदारी; 'लखपति दीदी' और स्वयं सहायता समूहों से बढ़ी आर्थिक आत्मनिर्भरता
पंचायत से पायलट तक: हर क्षेत्र में आगे बढ़ रहीं महिलाएं

महज तीन घंटे में पहुंच जाएंगे दिल्ली से देहरादून
इंतजार खत्म, देहरादून-दिल्ली एक्सप्रेसवे कल जनता को समर्पित करेंगे प्रधानमंत्री मोदी
11,963
120 की रफ्तार से भर सकेंगे फर्राटा
12 किमी लंबा वाइल्डलाइफ कॉरिडोर

वंदे भारत एक्सप्रेस ने मुसाफिरों को अपना मुरीद बनाया

महात्मा ज्योतिराव फुले दिव्य पथ-प्रदर्शक...लोगों में जगाया आशा और आत्मविश्वास

सीमा रस्ते संघटना(बीआरओ) 67 वा स्थापना दिवस (7 मे 2026 )

# रस्ते निर्माणातून राष्ट्र निर्माण

*हिमालयातल्या हिमनद्यांपासून नद्यांच्या खोऱ्यांपर्यंत, तप्त वाळवंटापासून दुर्गम क्षेत्रापर्यंत सीमा रस्ते संघटना साहसाचा अमीट ठसा उमटवते. सीमेवर तैनात सैनिकांसाठी बीआरओने बांधलेले रस्ते सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत, तर दूरदूरवरच्या खोऱ्यात वसलेल्या नागरिकांसाठी ते आशेचे सेतू आहेत. 7 मे 1960 ला स्थापित बीआरओचे प्रेरणादायी ब्रीदवाक्य आहे, 'श्रमेण सर्वं साध्यम्', अर्थात परिश्रमातून सर्व काही शक्य आहे....'*

**बीआरओद्वारे भारताच्या सीमावर्ती क्षेत्रात आणि शेजारी मित्र देशातील निर्माणकार्य**

**64,100** किलोमीटर रस्ते निर्माण | **1,179** पुलांचे बांधकाम | **7** बोगदे आणि 22 हवाई पट्ट्यांचे बांधकाम

- भूतान, म्यांमार, अफगाणिस्तान आणि तजिकिस्तानमध्ये पायाभूत सुविधांच्या माध्यमातून क्षेत्रीय संपर्क आणि धोरणात्मक भागीदारीला बळकटी.

**250** पायाभूत सुविधा 2024 आणि 2025 मध्ये बीआरओने राष्ट्रार्पण केल्या.



*आमचा संकल्प आहे राष्ट्र प्रथम.. राष्ट्राची सुरुवात त्याच्या सीमेपासून होते. त्यामुळे सीमेवर पायाभूत सुविधांचा विकास देशाच्या सर्वोच्च प्राधान्यांपैकी एक आहे. सीमा रस्ते संघटना (बीआरओ) देशाच्या वेगवेगळ्या भागात बोगदे बांधण्याचे काम वेगाने पूर्ण करत आहे.* **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

न्यू इंडिया समाचार पाक्षिक

आर.एन.आय, DELHIN/2020/78812, 1-15 मई, 2026

आर.एन.आय DELHIN/2020/78812 (प्रकाशनाची तारीख- 20 एप्रिल 2026, एकूण पृष्ठे-58 )

मुख्य संपादक
धीरेंद्र ओझा, प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक
कंचन प्रसाद , महासंचालक,
केंद्रीय संचार ब्युरो

खोली क्रमांक - 278, केंद्रीय संचार ब्युरो,
सूचना भवन, दुसरा मजला,
नवी दिल्ली-110003 इथून प्रकाशित